म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २५८३७

# केशवसुत

## पांच चिंतनिका

REFBK-0011556

भ. श्री. पंडित

महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

३७३८
सं. शा
१२७११
निबंध
१४३९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१९

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

22 JUN 1975

[कु. मा. प.]

# केशवसुत

## पांच

## चिन्तनिका

भवानीशंकर
श्रीधर
पंडित

ग्र. क्र. ११५५६

REFBK-0011556

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ५८३८९ ...... वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: १२-२२८

# केशवसुत

## पांच चिन्तनिका

लेखक

**भवानीशंकर श्रीधर पंडित**

महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

मूल्य रुपये सहा

© महाराष्ट्र प्रकाशन १९६१

प्रथमावृत्ति : मे १९६१

प्रकाशक
प्र. दि. बेदरकर
महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

माझे पितृव्य

**जनार्दन नरसिंह खांडेकर**

यांस

अत्यंत आदरपूर्वक

# प्रा स्ता वि क

अगदीं पोरवयांत केशवसुतांची कविता माझ्या कानीं पडली. तें वय नादलुब्धतेचें होतें. शब्दाच्या अर्थापेक्षां त्याच्या रचनेच्या जादूकडे व नादाकडे त्या वयांत अधिक लक्ष होतें. माझ्या वडिलांना जुन्या नव्या मराठी कवितेच्या वाचनाचा छंद होता. त्यावेळीं अजमेरला गोविंद पांडुरंग देवधर हे प्रसिद्ध कवि होते. ते इंग्रजी भाषा व वाङ्मयाचे एम्. ए. होते. पुढें वकिली करण्याकरितां ते बैतूलला गेले व तेथें स्थायिक झाले. अभिनव काव्यमालेच्या दुसऱ्या भागांत त्यांची कविता आहे. केशवसुतांच्या 'झपूर्झा' ह्या कवितेचा अर्थ लावण्याकरितां ते माझ्या वडिलांशीं चर्चा करीत. त्या चर्चेत

“ सूर्य, चंद्र आणिक तारे
नाचत सारे हे प्रेमभरें
खुडित खपुष्पें फिरति जिथें
आहे जर जाणें तेथें
धरा जरा निःसंगपणा
मारा गिरके
मारा फिरके
नाचत, गुंगत म्हणा म्हणा
‘ झपूर्झा गडे ! झपूर्झा ’

ह्या कडव्यांतील ओळी व शब्द माझ्या कानीं पडले म्हणजे मला एका अननुभूत आनंदाची प्रतीति येई. पुढें रतलामला रेल्वेच्या नोकरींत असलेले इलेक्ट्रिशियन श्री. कुमठेकर हे अधून-मधून अजमेरला आमच्याकडे येत. ते आधुनिक मराठी कवितेचे अभिमानी होते. वृत्ति काव्यलोलुप असल्यामुळें त्यांच्याजवळ आधुनिक कवींच्या कवितांचीं हस्तलिखितें असत. एका नोटपेपरवर सुंदर व सुवाच्य अक्षरांत लिहिलेली ‘ झपूर्झा ’ ही चिंतनिका त्यांच्या संग्रहीं होती. ती समोर ठेवून ते व माझे वडील तासन् तास चर्चा करीत. मला त्या वयांत त्या चर्चेंतलें कांहींच कळत नव्हतें. परंतु ‘ झपूर्झा गडे ! झपूर्झा ’ हे ध्वन्यनुकारी शब्द मात्र माझ्या कर्णकुहरांत एकसारखे घुमत राहत.

ह्यानंतर १९२१ च्या उन्हाळ्यांत अजमेरास मेयो कॉलेजांत कविवर्य तांबे ह्यांचें नोकरीनिमित्त आगमन झालें. आतां मला कवितेच्या अर्थाचें आकलन होऊं लागलें होतें आणि मधून मधून मीहि टला ट व पला प जुळविण्याचा खटाटोप करूं लागलों होतों. त्या उमेदवारीच्या काळांत परिणतप्रज्ञ तांब्यांशीं माझी ओळख झाली. माझ्या समवयस्क स्नेह्यांबरोबर मी तांब्यांकडे जाऊं लागलों आणि त्यांच्या मुखानें कवितेवरलीं रसरंजक भाष्यें ऐकूं लागलों. तांबे हे रससिद्ध कवि होते. स्वतःच्या कवितांप्रमाणें ते इतरांच्या कविताहि अतिशय तन्मयतेनें म्हणून दाखवत आणि त्यांवर तासन् तास रसाळ प्रवचन करत. केशवसुतांची ‘ झपूर्झा ’ ही चिंतनिका त्यांना प्रिय नव्हती. ‘ प्रीति ’वर ते ‘ प्रीति कां मिळे बाजारीं ’ । मिळे शेजारीं । सोड मीमांसा ’ असा कवितेंतच शेरा मारीत. ‘ तुतारी ’ला ते व्याख्यान म्हणत. परंतु ‘ पुष्पाप्रत ’, ‘ वातचक्र, ’ ‘ फुलपांखरूं, ’ ‘ घुबड ’ इत्यादि केशवसुतांच्या कविता त्यांच्या अत्यंत आवडीच्या होत्या. ‘ कोणीकडून ? कोणीकडे ? ’ ह्या केशवसुतांच्या चिन्तनिकेवर ते ‘ अव्यक्तादीनि भूतानि ’ ह्या गीतेंतील श्लोकाच्या आधारें सरसरमणीय भाष्य करीत. तें संस्मरणीय होत असे. केशवसुतांच्या कांहीं कवितांना श्रीमद्भगवद्गीतेचा आधार असावा असें तेव्हांपासून मला वाटूं लागलें. कारण तांब्यांचें विवेचन पद्धतशीर व मूलग्राही असे.

अनुक्रम 36328 दि: ..................
क्रमांक .............................. नों: दि: 22-11-6

पुढें दहा अकरा वर्षांनीं मी नागपुरास हिस्लॉप कॉलेजांत मराठी विषयाचा दुय्यम प्राध्यापक झालों. ह्याच सुमारास दत्तात्रेय वासुदेव हर्णे ह्या तरुण कवींशीं माझा परिचय झाला. हर्ण्यांच्या ग्रंथसंग्रहांत इमर्सन्च्या कवितांची व निबंधांची एक जुनाट आवृत्ति होती. त्यांच्या बोलण्यांत इमर्सन्च्या विचारांची फार प्रशंसा असे. केशवसुत वारल्यानंतर जानेवारी १९०६ च्या मासिकमनोरंजनांत त्यांचा मृत्युलेख आला होता. त्यांत 'त्यांच्या आवडीचे आंग्लकवि म्हटले म्हणजे एमर्सन, शेले, कीटस् व वर्डस्वर्थ हे होत' असा उल्लेख आहे. त्या उल्लेखाच्या अनुरोधानें मी हर्ण्यांकडील इमर्सनच्या कवितांची व निबंधांची आवृत्ति चाळूं लागलों. तों मला तिच्यांत व केशवसुतांच्या कवितासंग्रहांत बरींच साम्यस्थळें आढळलीं. ह्या स्थळांची मीं नोंद करून ठेवली. पुढील पंधरा वर्षांत मी नागपूर विद्यापीठ, हिस्लॉप कॉलेज व मॉरिस कॉलेज ह्यांत मला इमर्सन्चे जे जे ग्रंथ हस्तगत झाले, ते ते वाचून काढले. त्यांत The works of Ralph Waldo Emerson Vols I, II and III (1922) By Macmillan Co., The Complete Prose Works of Ralph Waldo Emerson By G. T. Bettary. आणि English Traits and Representative Men Edited By Earnest Rhys हे ग्रंथ प्रमुख आहेत. केशवसुतांना इमर्सन्च्या लेखांवरून आणि इतर ज्या इंग्रजी कवितांवरून कवितालेखनाची स्फूर्ति झाली आहे, त्यांवर मीं जानेवारी १९४८ च्या 'उन्मेषां'त 'केशवसुतांच्या कांहीं कवितांचे आणि कल्पनांचे उगम' ह्या मथळ्याचा एक लेख लिहिला. तो त्यावेळीं मराठी जगांत बराच गाजला. ह्या लेखावर 'उन्मेषा'च्या संपादकांनीं 'केशवसुतांवर आजपर्यंत विपुल वाङ्मय निर्माण झालें. परंतु त्यांत चर्वितचर्वणाचाच प्रकार बहुधा झाला' अशी मखलाशी केली आहे. प्रस्तुत पुस्तकांत थोडी अधिक भर घालून 'केशवसुत व इमर्सन्' ह्या निबंधांत मीं त्या लेखाचा उपयोग केला आहे. मात्र इतर इंग्रजी कविता अप्रस्तुत असल्यामुळें त्यांचा निर्देश टाळला आहे.

१९४३ पासून म्हणजे गेलीं सतरा वर्षे मी नागपूर विद्यापीठांतील एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना आधुनिक मराठी कविता शिकवीत आहें. ती शिकवीत असतांनाच बी. ए. या विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वरीचे अध्याय शिकवावे लागत. त्या निमित्तानें श्रीमद्भगवद्गीतेची उजळणी होई. 'झपूर्झा', 'सतारीचे बोल,' 'कोणीकडून ? कोणीकडे ?' 'म्हातारी' आणि 'हरपलें श्रेय' ह्या केशवसुतांच्या पांच चिंतनिकांत गीतेंतील कांहीं तत्त्वें अनुस्यूत असावीं असें मला आतां वाटूं लागलें. तांबे 'कोणीकडून ? कोणीकडे ?' वर 'अव्यक्तादीनि भूतानि' ह्या श्लोकाच्या आधारें भाष्य करीत हें मी विसरलों नव्हतों. इमर्सन्च्या Nature, The Over-soul, Self-reliance, The Transcendentalist, Immortality इत्यादि निबंधांत प्राच्य तत्त्वज्ञानाचा अनुवाद झाला आहे हें माझ्या लक्षांत आलें होतें. त्याच्या ह्या निबंधांतून विष्णुपुराण, ब्रह्म, मनु, यम, नचिकेता इत्यादिकांचे निर्देश आले आहेत. 'ब्रह्म' हा त्याच्या एका कवितेचा विषय आहे आणि 'गीता' हा सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे असें त्याचें मत आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा आतां पूर्वीप्रमाणें अभ्यास होत नाहीं म्हणून त्यानें एके ठिकाणीं खेद व्यक्त केला आहे.

तो म्हणतो, "It is the surest sign of national decay, when the Brahmins can no longer read or understand the Brahminical Philosophy." तेव्हां केशवसुतांच्या वर निर्दिष्ट केलेल्या पांच चिंतनिकांचा मी गीतेंतील तत्त्वज्ञानाच्या अनुरोधानें अर्थ लावूं लागलों. त्या चिंतनिकांपैकीं 'हरपलें श्रेय' ही शेवटची चिंतनिका वगळल्यास बाकीच्या चार सार्थ चिंतनिका 'छंदां' त प्रसिद्ध झाल्या आहेत. शेवटच्या चिंतनिकेसह त्या सर्व आतां ह्या पुस्तकांत समाविष्ट केल्या आहेत.

वॉरन हॅस्टिंग्स हा गव्हर्नर जनरल असतांना संस्कृतांतील ग्रंथांचीं प्रथमच इंग्रजींत भाषांतरें झालीं. विल्किन्स ह्यानें भगवद्गीतेचें भाषांतर केलें आहे. गीतेबद्दल गौरवपर उद्गार काढतांना हॅस्टिंग्स म्हणतो, "With the deductions or rather the qualifications which I have thus premised, I hesitate not to pronounce the 'Gita' a performance of great originality, of a sublimity of conception, reasoning and diction almost unequalled among all the known religions of mankind, of a theology accurately corresponding with that of the Christian Dispensation and most powerfully illustrating its fundamental doctrines." हीं भारतीय तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांचीं भाषांतरें इमर्सन व त्याचे समकालीन अमेरिकन लेखक ह्यांच्या हातीं पडलीं. त्यामुळें त्यांच्या विचारांवर भारतीय तत्त्वज्ञानाची छाप दिसते. Thoreau, Alcott, Margaret Fuller प्रभृति इमर्सनच्या मित्रमंडळीस भारतीय तत्त्वज्ञान अतिशय प्रिय होतें ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. त्यांचा अतींद्रियवाद (Transcendentalism) हा फ्रेंच utopianism किंवा जर्मन Mysticism ह्यांच्यापासून उत्स्फूर्त झाला आहे असें म्हणण्यापेक्षां तो भारतीय तत्त्वज्ञानापासून स्फुरला आहे हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होईल. कारण फ्रान्समध्यें व जर्मनीमध्यें त्या त्या वादांचे पुरस्कर्ते हे सार्वजनिक जीवनापासून अलिप्त राहूं लागले. पंतु अतींद्रियवादी अमेरिकन मात्र भारतीयांप्रमाणेंच जीवनांत राहून कर्मयोगाचें अनुसरण करण्यांत धन्यता मानूं लागले. ह्या अतींद्रियवाद्यांपैकीं थोरोनें गीतेसंबंधीं प्रदर्शित केलेलें मत मोठें मननीय आहे. तो म्हणतो, "Beside the vast and cosmogonal philosophy of the Bhagvadgita even our Shakespeare seems sometimes youthfully green and merely practical." थोरोला गौतमबुद्धाविषयीं विलक्षण आदर होता. महात्मा गांधींनीं 'सविनय कायदेभंगा'ची कल्पना थोरोच्या 'Civil Disobedience' वरूनच घेतली होती. Whittier च्या अनेक कवितांचे विषय हे पौरस्त्य पुराणें व उपनिषदें यांवरून स्फुरले आहेत. Whitman ला स्वामी विवेकानंद 'अमेरिकी संन्यासी' म्हणून संबोधीत. त्याच्या 'Leaves of Grass' वर गीतेची बरीच छाया आहे. Carl Sandburg व Eugene o' Neill ह्यांच्या लेखनांवरहि प्राच्य विचारांचा थोडा फार प्रभाव आहे. T. S. Eliot ह्यांच्या 'The Waste Land' ह्या काव्याला जर बृहदारण्यकोपनिषदाचा आधार नसता, तर तें अगदींच वेगळ्या स्वरूपाचें काव्य झालें असतें. Reverend Ware, Arthur Christy, Miss Adrienne Moore प्रभृतींचा पौरस्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास अभिनंदनीय आहे.

प्रस्तुत पुस्तकांत प्रारंभीं रॅल्फ वॉल्डो इमर्सन् ह्याची व त्याच्या वाङ्मयाची माहिती दिली असून नंतर त्याच्या व केशवसुतांच्या साहित्यांतील साम्य दाखविलें आहे. पुढें 'केशवसुतांच्या कवितेंतील विराग' हा निबंध दिला आहे. मुंबई सोडून खानदेशांत भडगांव व फैजपूर येथें गेल्यावर १८९८ पासून त्यांच्या कवितेंत विरागाची (renunciation) छटा विशेष प्रमाणांत दिसते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे निकटवर्ती स्नेही गद्रे ह्यांनीं त्यांच्या वृत्तीचें कथन करतांना म्हटलें आहे;–

संसारीं त्वां पथिक जनसें केधवां आचरावें
केव्हां त्वां बा ! निजमनिं जगत्संशयें भ्रांत व्हावें
ह्या वृत्तीचें तव सुकवनीं गूढ बा ! व्यक्त झालें
त्वत्पद्यांनीं परिचित कवी—मर्म जाणो निघाले

असेच उद्‌गार त्यांचे बंधु सीतारामपंत ह्यांनीं काढले आहेत. ते म्हणतात;–

संसारीं बा ! क्षणभरि न तें लक्ष त्याचें कधींही–
गेले, योग्यापरि सतत तो मुक्त जैसा विदेही

'मराठी व्याकरणें व व्याकरणकार' ह्या पुस्तकांत आपले दुसरे बंधु मोरो केशव दामले ह्यांची माहिती देतांना सीतारामपंतांनीं असें म्हटलें आहे कीं, सुरवातीला मोरोपंत हे अगदीं अद्ययावत् विचारांचे व आचारांचे होते. परंतु पुढें एका साधूंच्या सहवासानें त्यांच्या वृत्तींत एकदम पालट पडला. हे साधु बहुधा उदासी महाराज असावेत. कारण मोरोपंतांनीं त्यांची कविता संकलित केली आहे. केशवसुतांच्या वृत्तींतला बदल हाहि कदाचित् आनुवंशिक असावा. किंवा वाढत्या वयाबरोबर तो स्वभावतःच आला असावा. केशवसुत हे मूळांतच उदासीन व चिंतनशील होते. तेव्हां वाढत्या विचाराबरोबर त्यांच्या ठिकाणीं विरागानें आपलें ठाणें बसविलें असावें. ह्या निबंधानंतर चिंतनिका एक कविताप्रकार हा निबंध चिंतनिकेच्या बहिरंगाचा व अभ्यंतराचा बोध व्हावा म्हणून मुद्दाम जोडला आहे.

ह्या पहिल्या भागानंतर दुसऱ्या भागांत केशवसुतांच्या पांच चिंतनिकांवरील माझीं भाष्यें दिलीं आहेत. चिंतनिकांची स्फूर्ति केशवसुतांनीं इमर्सन्‌कडून घेतली होती हें मीं जागोजागीं आधार देऊन दाखविलें आहे. केशवसुतांनीं गीता वाचली नव्हती असें मला म्हणावयाचें नाहीं. मात्र त्यांना चिंतनिका लिहिण्याची प्रेरणा इमर्सन्‌च्या निबंधांच्या वाचनानें मिळत असे, असें मला दाखवावयाचें आहे. केशवसुतांच्या चिंतनिकेंतील विचार मूळांत भारतीयच आहेत. परंतु ते इमर्सन्‌च्या माध्यमांतून अवतीर्ण झाल्यामुळें कांहींसे अधुरे, अंधुक व अस्पष्ट राहिले. आणि म्हणूनच चिंतनिकांच्या अर्थाबद्दल समीक्षकांत निरनिराळे तर्कवितर्क सुरू झाले. ते ह्यापुढें राहूं नयेत ह्या दृष्टीनें मीं हा अल्प प्रयत्न केला आहे.

तिसऱ्या भागांतील परिशिष्टांत ज्यांत चिंतनपर विचार व्यक्त झाले आहेत अशा केशवसुतांच्या अकरा कविता दिल्या आहेत. त्या सर्वसंपूर्ण दिलेल्या नाहींत. कारण त्यांच्यांतील चिंतनपरता लक्षांत यावी येवढाच त्या देण्यामागें उद्देश आहे.

ह्या चिंतनिकांना पूर्वी ' छंद ' मध्यें प्रसिद्धि दिली याबद्दल मी ' छंद 'चा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें हें पुस्तक प्रकाशित केलें याबद्दल मी महाराष्ट्र प्रकाशनाचे संचालक माझे मित्र श्री. पुं. ना. देशमुख व बेदरकर ह्यांचा आभारी आहें. त्यांच्या सहकार्याशिवाय हें पुस्तक प्रकाशांत आलें नसतें.

**भवानीशंकर श्रीधर पंडित**

श्रीधर-सदन, श्रद्धानंद नगर,
दक्षिण अंबाझरी मार्ग,
नागपूर-अजनी.

[ ता. क. ' Utopianism ' ला ' कल्पित आदर्शवाद ' म्हणतां येईल. ह्या वादाप्रमाणें सामाजिक व राजकीय पद्धति ह्या परिपूर्ण पाहिजेत. ' Mysticism. ' ला ' अज्ञेयवाद ' हें नांव देतां येईल. ह्या वादानुसार मूळांत सर्व एकच आहे ह्या तत्त्वावर दृढश्रद्धा हवी. त्या श्रद्धेंतून विचार उद्भवले पाहिजेत. सृष्टि ही कवीस इतरेजनांपेक्षां अधिक चैतन्ययुक्त वाटते. म्हणून तो आपलें गूढ स्वप्न सांगण्याचा प्रयत्न करतो. उचित शब्द नसल्यास तें संदिग्ध वाटतें. ]

# अनुक्रमणिका


| | क्रमांक | | | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|
| | १ | प्रास्ताविक | | |
| | २ | चार निबंध | (१) रॅल्फ वाल्डो इमर्सन् | १९ |
| | | | (२) केशवसुत आणि इमर्सन् | २६ |
| | | | (३) केशवसुतांच्या कवितेंतील विराग | ४५ |
| | | | (४) चिन्तनिका – एक कविताप्रकार | ६९ |
| | ३ | पांच चिन्तनिका | (१) झपूर्झा | ७४ |
| | | | (२) सतारीचे बोल | ८५ |
| | | | (३) ‘ कोणीकडून ! कोणीकडे ! ’ | ९७ |
| | | | (४) म्हातारी | १०४ |
| | | | (५) हरपलें श्रेय | ११४ |
| परिशिष्ट [१] | ४ | बारा चिन्तनपर कविता | (१) सृष्टि आणि कवि | १३२ |
| | | | (२) रा. वा. ब. पटवर्धन मु. नागपूर यांस | १३३ |
| | | | (३) पुष्पाप्रत | १३३ |
| | | | (४) प्रियेला सादर केलेली पुष्पमाला किंवा कर्तव्य आणि प्रीति | १३४ |
| | | | (५) भृंग | १३५ |
| | | | (६) पुष्पाप्रत | १३७ |

| क्रमांक | | पृष्ठांक |
|---|---|---|
| | (७) आहे जीवित काय ? | १३९ |
| | (८) क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास | १३९ |
| | (९) स्फुट विचार | १४० |
| | (१०) वातचक्र | १४० |
| | (११) फूलपांखरूं | १४१ |
| | (१२) दूर कोठें एकला जाउनियां | १४३ |
| परिशिष्ट [२] | गोविंदाग्रजांची कविता (१) केशवसुत मेले ? | १४३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३६८ ........ दि: ..............
क्रमांक .................... नों: दि: २२-११-५४
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ११५५६

# रॅल्फ वाल्डो इमर्सन्

□ □ □ □ □ □ □

**रॅल्फ वॉल्डो इमर्सन् (१८०३–१८८२)** ह्या सुविख्यात अमेरिकन तत्त्वज्ञ कवीचा जन्म मॅसॅच्युसेट्स् राज्यांतील बोस्टन शहरांत २५ मे १८०३ सालीं झाला. सात पिढ्यांपासून त्याच्या घराण्यांत न्यू इंग्लंडमधील कोणत्याना कोणत्यातरी चर्चच्या धर्मोपदेशकाचें कार्य चालत आलें होतें. रॅल्फच्या वयाच्या आठव्या वर्षीच त्याचे वडील वारले. त्यांच्या पश्चात् आपल्या लहान लहान सहा अपत्यांचें पालनपोषण करणें त्याच्या आईला जड जाऊं लागलें. तेव्हां मेरी मूडी इमर्सन् नांवाच्या रॅल्फच्या आतेनें त्याच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेतली.

बोस्टन येथील लॅटिन स्कूलमध्यें रॅल्फचें प्राथमिक शिक्षण पूर्ण झालें. तेव्हां त्यानें १८१७ सालीं पुढील शिक्षणासाठीं हॉर्वर्ड येथील विश्वविद्यालयांत प्रवेश केला. विश्वविद्यालयांत विद्याभ्यास करीत असतांना रॅल्फला चरितार्थासाठीं 'वेटर' व 'मॅसेंजर'चीं कामें करावीं लागलीं. रॅल्फ कॉलेजांत विद्यार्थी असतांनाच त्याच्या आतेनें त्याला वाचायास म्हणून सुप्रसिद्ध धर्मसुधारक व ब्रह्मसमाजाचे आद्यसंस्थापक राजा राममोहन राय यांचे धर्मविषयक कांहीं लेख व अध्यात्मपर

कांहीं व्याख्यानें पाठविल्याचें अगदीं अलीकडे – म्हणजे १९४२ सालीं – 'इमर्सन् ॲण्ड राममोहन राय' ह्या कलकत्ता विद्यापीठाच्या आपल्या प्रबंधांत मिस् ॲडिनी मूर ह्या लेखिकेनें सिद्ध केलें आहे.

इतर अनेक थोर व्यक्तींप्रमाणेंच रॅल्फलाहि आपल्या आयुष्यांत अनेक संकटांना मोठ्या धैर्यानें तोंड द्यावें लागलें. त्याच्या जीवनांत जे असंख्य लहानमोठे सुखदुःखांचे प्रसंग आले, त्यांचा त्याच्या बाह्य प्रकृतीवर व मनावर परिणाम झाल्याखेरीज राहिला नाहीं. त्याच्या विचारांवर व लेखनावर त्यांचा खोल ठसा उमटला आहे.

कॉलेज सोडल्यावर कांहीं काळ रॅल्फनें शिक्षकाचा व्यवसाय केला. पुढें १८२५ सालीं आपल्या आतेच्या सल्ल्यावरून त्यानें धर्मोपदेशकाचा पेशा पत्करण्याचा निश्चय केला व त्या दिशेनें अभ्यासास आरंभ केला. हॉर्वर्ड येथील आध्यात्मिक शाळेच्या व्यासपीठावर उभें राहून उपासना चालविण्याचे पाठ तो घेत होता; तोंच त्याला क्षयानें पछाडलें. त्यामुळें त्याला कांहीं काळ विश्रांति घ्यावी लागली. कोणत्याहि प्रकारचा त्रास न होतां ह्या दुखण्यांतून तो लवकरच उठला. मात्र ज्यांत शारीरिक श्रमांची आवश्यकता असते अशा प्रकारच्या कोणत्याहि व्यवसायाकरितां तो अपात्र ठरला. तेव्हां जणूं कांहीं धर्मप्रचारार्थच आपण जन्मास आलों आहों अशा भावनेनें त्यानें १८२८ सालीं मार्च महिन्यांत बोस्टन येथील ओल्ड नॉर्थ चर्चमध्यें साहाय्यक धर्मोपदेशकाचें पद स्वीकारलें, आणि पुढें कांहीं दिवसांनीं त्याच वर्षी कुमारी एलन् लुई टकर ह्या सुंदर व नाजूक परंतु कांहींशा अशक्त तरुणीशीं लग्न केलें. चर्चविषयींचा रॅल्फचा दृष्टिकोन बुद्धिप्रामाण्यवादी व निर्विकार होता. ख्रिश्चन धर्म हा एक वांशिक अनुभव आहे अशी त्याची धारणा होती.

तथापि चार वर्षांनंतरच म्हणजे १८३२ सालीं रॅल्फनें धर्मोपदेशकाच्या आपल्या व्यवसायास कायमचा रामराम ठोकला. अध्यात्म व धर्म हे ह्यापुढेंहि त्याच्या आवडीचे विषय राहिले, परंतु त्यांच्याभोंवतालची व्यावसायिक कोंडी मात्र त्याला मानवली नाहीं. रॅल्फला अशा रीतीनें अचानक वैराग्य प्राप्त होण्यास कदाचित् ह्याच सुमारास म्हणजे १८३१ मध्यें झालेला त्याच्या अत्यंत आवडत्या पत्नीचा मृत्युहि कारण असावा. ह्या उदास मनःस्थितीस विरंगुळा म्हणून त्यानें चर्च सोडलें, आणि कांहीं काळ युरोपचें व इंग्लंडचें पर्यटन केलें.

रॅल्फ इमर्सन्ची विषण्ण मनोवृत्ति पालटण्यास हें समुद्रपर्यटन पुष्कळच कारणीभूत झालें. इंग्लंडमध्यें त्याचा निसर्गाचीं गूढ रहस्यें विशद करणाऱ्या कविश्रेष्ठ वर्ड्स्वर्थशीं, उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा उद्गाता असणाऱ्या तत्त्वज्ञ कोलरिजशीं आणि आपल्या उत्तेजक गद्यानें विचारप्रवर्तन करणाऱ्या निबंधकार कार्लाइलशीं संबंध आला. ह्या तत्कालीन सुप्रसिद्ध साहित्यसम्राटांच्या विचारांचा व कल्पनांचा रॅल्फ इमर्सन्वर विलक्षण प्रभाव पडला. इमर्सन्च्या जीवनांतला

हा काळ क्रान्तीचा होता. ह्या काळांतच त्यानें जीवनविषयक आपल्या विशिष्ट दृष्टिकोनाची दीक्षा घेतली आणि भावी जीवनकार्याची दिशा निश्चित केली. वर्डस्वर्थशीं झालेल्या आपल्या भेटीगांठीची इमर्सन्‌नें नोंद केली आहे. तिच्यांत तो म्हणतो,—

" Wordsworth was so benevolently anxious to impress upon me my social duties as an American citizen, that he accompanied me nearly a mile from his house, talking vehemently, and ever and anon stopping short to imprint his words..."

इमर्सन्‌नें आपल्या ह्या प्रवासाचा वृत्तांत 'English Traits', ह्या पुस्तकांत ग्रथित केला आहे.

एक वर्षानें १८३३ मध्यें अमेरिकेस परतल्यावर इमर्सन्‌नें वाङ्मयीन चळवळींच्या जीवनाचा अंगीकार केला. त्यानें व्याख्यात्याचा व्यवसाय पत्करला. देशांतील प्रचलित विचार-प्रवाहांची त्यानें नीट ओळख करून घेतली. त्यांच्या बदलत्या दिशांचें त्यानें नित्य नियमानें निरीक्षण केलें. आणि साऱ्या अमेरिकेंत व्याख्यानांचे दौरे काढले. धर्मप्रसारकाच्या उद्योगापेक्षां व्याख्यात्याचा हा उद्योग त्याच्या स्वभावास अधिक मानवला. ह्या उद्योगांत शुष्क पोपटपंची, रूक्ष विवेचन व कृत्रिम बंधनें ह्यांचा अभाव होता. ह्यासंबंधीं तो स्वतःच सांगतोः—
"I find myself so much more free on the platform of the lecture hall than in the pulpit that I shall not much more use the last ... I preach in the lecture room ...... There you may laugh, weep, reason, sing, sneer, or pray according to your genius." इमर्सन्‌नें अशा रीतीनें बंधुभावानें समाजाला मार्गदर्शन करून मनुष्यजीवन उच्च व उदात्त करण्याचें कार्य चालवलें.

१८३४ सालीं इमर्सन्‌नें आपलें बिऱ्हाड कॉन्कार्ड येथें हलवलें. ह्या ठिकाणीं त्याच्या कुटुंबांतील कांहीं मंडळी पूर्वी राहात होती. १८३५ सालीं त्यानें दुसरें लग्न केलें. त्याच्या ह्या दुसऱ्या पत्नीचें नांव लिडिया जॅकसन्. ह्या द्वितीय संबंधापासून त्याला दोन मुलगे व दोन मुली झाल्या. परंतु दुर्दैवानें त्याचा अतिशय लाडका व सर्वांत मोठा मुलगा १८४१ मध्यें मरण पावला. ह्या दुःखकारक घटनेमुळें आधींच चिंतनशील असलेला इमर्सन्‌चा स्वभाव अधिकच गंभीर बनला.

कॉन्कार्ड येथेंच इमर्सन्‌ला ब्रॉन्सान्, अल्काट, हेन्री डेव्हिड थोरो, नॅथनिएल हॉथॉन आणि मार्गारेट फुलर ह्या मित्रांचें मंडळ लाभलें. अंतःप्रेरणा व मनुष्याचें पूर्णत्व ह्यांवर ह्या मंडळाची निष्ठा होती. अंतःशुद्धीच्या साधनानें जग सुधारण्याचें ध्येय ह्या मंडळानें आपल्या

मनाशीं बाळगलें होतें. ह्या मंडळांतील सदस्य स्वतःला ' अतींद्रियवादी ' म्हणवीत असत. ह्या सर्वांचें स्फूर्तिस्थान इमर्सन् असे. १८३६ मध्यें ह्या मंडळाला ' कॉन्कार्ड क्लब ' हें नांव मिळालें. प्रत्येक आठवड्याच्या अखेरीस ह्या मडळांतील सदस्य एकत्रित होत व चर्चा करीत. ह्यांच्या सिद्धांताला ' सर्वातिशायी सिद्धान्त ' ( Transcendentalism ) असें नांव असून तो अन्तः – अनुभूतीवर आधारला आहे. त्यांत तर्क व प्रज्ञा ह्यांना स्थान नाहीं.

ह्या मंडळाच्या चर्चेंत निघणारे विषय इमर्सन्‌च्या व्याख्यानांत येत असत. दरवर्षी पश्चिम अमेरिकेंत दूरदूरच्या ठिकाणीं जाऊन व्याख्यानें देण्याचा इमर्सन्‌चा शिरस्ता होता. जेव्हां व्याख्यानें नसत, तेव्हां त्याचा वेळ वाचनांत व मननांत जाई. ह्याच सुमारास इंग्रजींत अनुवादित झालेलीं वेदांचीं, उपनिषदांचीं, पुराणांचीं व भारत आणि रामायण ह्या बृहत्काव्यांचीं भाषांतरें त्याच्या वाचनांत आलीं होतीं. भगवद्गीता हा त्याचा आवडता ग्रंथ होता. संस्कृताप्रमाणें कुराणादि आरबी व फारशी ग्रंथांचीं भाषांतरेंहि त्यानें वाचलीं होतीं. ह्या सर्व ग्रंथांतील विचारप्रणालींचा परिणाम इमर्सन्‌च्या भाषणांवर व लेखनावर झाला आहे.

समानधर्मी मित्रांच्या मंडळांत रॅल्फ इमर्सन्‌ला नवीन स्फूर्तीचा लाभ होत असे. शांत वेळीं तो वाचलेल्या ग्रंथांचें व मित्रांशीं केलेल्या चर्चेचें मनन करीत असे. पुढें पुढें मात्र त्याच्या सुरुवातीच्या बुद्धिप्रामाण्याची आंच हळूहळू थंडावत गेली.

अमेरिकन तत्त्वज्ञांत आणि साहित्यिकांत इमर्सन् हा सर्वांपासून अगदीं फुटून निघेल असा निराळा दिसतो. ज्या ज्या क्षेत्रांत आपण आपलें मत व्यक्त करण्यास पात्र आहोंत असें त्याला वाटलें, त्या त्या क्षेत्रांत त्यानें आपलें मत निर्भयतेनें मांडलें आहे. इतर आपल्यासंबंधीं काय बोलतात ह्याची त्यानें कधींच पर्वा केली नाहीं. " What I must do is all that concerns me, not what people think " असे ह्यासंबंधीं त्याचे उद्गार आहेत. तो स्वतःस रूढींचा विरोधक मानीत असे, आणि उभ्या आयुष्यभर त्यानें तसें आचरण केलें. तो मौलिकतेचा प्रचारक होता. " स्वतःच स्वतःचें ठरवा. दुसऱ्यांच्या मागें जाऊं नका. स्वतःच्याच ठिकाणीं राहून तुम्हांस शांति मिळेल " असा त्याचा संदेश आहे.

इमर्सन्‌च्या पुष्कळ विचारांवर पौरस्त्य विचारांची - विशेषतः भारतीय दार्शनिकांच्या विचारांची छाप आहे. १८३८ सालीं जुलै महिन्याच्या १५ तारखेला केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या डिव्हीनिटी कॉलेजांत केलेल्या भाषणांत तो म्हणतो, " आपण जर न्यायी असूं तर प्रत्यक्ष परमेश्वरच आहोंत. चोरीनें पैसा कधीं मिळत नाहीं. दान केलें म्हणून दारिद्र्य कधीं येत नाहीं आणि जुलमी खून पत्थराच्या भिंतीआडून कण्हल्याशिवाय राहत नाहीं. " गीतेची थोरवी वर्णन करतांना तो म्हणतो, " It was the first of books ; it was as if an empire spoke to us ; nothing small or unworthy but large, serene, consistent, the voice of old intelligence."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 36318 ..... दि: ....

इमर्सन्‌च्या लेखनांतली विलक्षण वस्तुनिष्ठा हें पुष्कळशा समीक्षकांना पडलेलें एक कोडें आहे. सत्याचा शोध घेणाऱ्या महात्म्याला जो त्रास सोसावा लागतो व ज्या वेदना सहन कराव्या लागतात, त्यांपासून त्याच्या कलात्मक प्रतिभा व प्रज्ञा ह्या अलिप्त राहूं शकतात का? ह्याचें उत्तर कदाचित् इमर्सन्‌च्या प्रतिभेनें प्राप्त केलेल्या एका आगळ्या सामर्थ्यांत असावें. त्याच्या प्रतिभेला अमूर्त अशा आध्यात्मिक कल्पनेला दैनिक जीवनांतील एखाद्या व्यवहार्य अशा वर्तनाचें रूप देण्यांत अभूतपूर्व असें यश मिळालें आहे. आपल्या "Hamatreya" ह्या कवितेंत त्यानें विष्णुपुराणांतील एका उताऱ्याला आध्यात्म्याच्या स्वर्गांतून व्यवहाराच्या भूतलावर आणण्याचा प्रयत्न केला आहे, तो या दृष्टीनें लक्षणीय आहे. कवितेचा आरंभ असा आहे.—

Bulkeley, Hunt, Williard Hosmer, Merium Flint,
Possessed the land which rendered to their toil
Hay, corn, roots, nemp, flax, apples, wo l and wood
Each of these land lords walked amidst his farm
Saying 'tis mine, my children and my name's.
And earth echoes back ;
" They call me theirs
Who so controlled me :
Yet everyone
Wished to stay, and is gone,
How am I theirs
If they cannot hold me
But I hold them ? "

ह्या अवतरणावरून इमर्सन्‌चा प्राचीन भारतीय वाङ्मयाचा अभ्यास कसा सखोल होता एवढेंच केवळ दिसत नाहीं, तर तो आध्यात्मिक विषयाचा अभ्यास कोणत्या तऱ्हेनें करीत असे, हेंहि दिसून येतें. आध्यात्मिक विचार व्यक्त करण्याची त्याची व्यावहारिक हातोटी जितकी कठोर तितकीच कोमल आहे. त्याच्या कवितेचा मोठेपणा तिच्यांतील आशावादित्वापेक्षां तिच्यांत जो प्रशांत तरतमभाव आहे आणि आध्यात्मिक मूल्यांसंबंधीं जो जिव्हाळा आहे, त्यांवर निर्भर आहे. गीतेंत परमेश्वराच्या विराट् रूपाचें वर्णन आहे. तें वाचून इमर्सनला "Brahma" ही कविता स्फुरली आहे. तिच्यांतील अनेक कल्पना म्हणजे गीतेंतील कांहीं ओळींचा स्वैर इंग्रजी अनुवाद आहे,—

" If the red slayer thinks he slays
Or if the slain think he is slain,
They know not well the subtle ways
I keep and pass, and turn again,

Far and forgot to me is near ;
Shadow and sunlight are the same ;
The vanished gods to me appear ;
And one to me are shame and fame.
They reckon ill who leave me out ;
When me they fly, I am their wings,
I am the doubter and the doubt,
And I the hymn the Brahmin sings.
The strong gods pine for my abode,
And pine in vain the sacred seven ;
But thou meek lover of the good
Find me, and turn thy back on heaven."

प्रस्तुत कविता लिहितांना इमर्सन्‌समोर गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील १९ व २० हे श्लोक होते हें उघड आहे. इमर्सन्‌च्या ह्या कवितेचें ऍंड्रयू लँग ह्यानें विडंबन केलें आहे. *लँग हा स्वतः लेखक असून त्यानें धार्मिक व आध्यात्मिक विषयांवरहि लिहिलें आहे. त्यानें इमर्सन्‌च्या कवितेचें विडंबन केलें हाच इमर्सन्‌ची कविता श्रेष्ठ प्रतीची असल्याचा एक अप्रत्यक्ष पुरावा आहे. कारण सामान्य कविता कधीं कुणाच्या लक्षांत राहात नाहींत व त्यांचा जनतेंत प्रचारहि नसतो. बहुधा जें अलौकिक असतें तेंच लोकांच्या ध्यानांत राहतें व तें त्यांच्यांत प्रसार पावतें.

"Nature" हा तत्त्वचिंतनात्मक ग्रंथ इमर्सन्‌चें प्रथम प्रकाशन होय. तो त्यानें १८३६ मध्यें प्रसिद्ध केला. १८४१ मध्यें त्याच्या निबंधांचा पहिला खंड बाहेर पडला. त्याच्या मित्रांनीं 'डायल' ह्या नांवाचें नियतकालिक चालविलें होतें. त्यांतहि इमर्सन्‌चे लेख प्रकाशित होत. १८४६ मध्यें त्याच्या कवितांचा पहिला संग्रह प्रसिद्धि पावला. १८४७ मध्यें त्यानें इंग्लंडचा दुबार प्रवास केला. तेथून परत आल्यावर त्यानें कांहीं भाषणें दिलीं. तीं "English Traits and Representative Men." ह्या पुस्तकांत संग्रहित झालीं

---

* लँगच्या विडंबनांतील कांहीं पंक्ति पुढें देत आहें,—

"If the wild bowler thinks he bowls,
Or if the batsman thinks he is bowled,
They know not, poor misguided souls,
They too shall perish unconsoled.
I am the batsman and the bat,
I am the bowler and the ball,
The umpire, the pavilion cat,
The roller, pitch and stumps and all."

आहेत. ह्यानंतर १८४९ मध्यें "ॲड्रेसेस् ॲंड लेक्चर्स", १८६० मध्यें "कॉंडक्ट ऑफ लाइफ", १८७० मध्यें "सोसायटी ॲंड सॉलिट्यूड" व १८७६ मध्यें "लेटर्स ॲंड सोशल एम्स" हे त्याचे ग्रंथ मुद्रित झाले.

रचनेच्या दृष्टीनें इमर्सन्‌चें काव्य ओबडधोबड आहे. त्यांत सौष्ठव नाहीं. त्याच्या प्रतिमा विसदृश आहेत. त्यामुळें त्याचें काव्य स्पष्ट नाहीं. त्याचा ओघ अस्खलित नाहीं. त्यांत भावनेवर बुद्धीनें कुरघोडी केली आहे. असें असूनहि त्याच्या कांहीं मोजक्या कवितांची शैली ही शैलाच्या उदरांतून झरझर वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणें जलद व थंडगार आहे. त्याचें गद्य संकीर्ण व सुभाषितवजा असून त्यांत विचारांचे अनेक बारीकबारीक पापुद्रे आहेत. इंग्रजी साहित्यांत शेक्सपिअर व पोप ह्यांच्या खालोखाल इमर्सन्‌चीं अवतरणें उद्‌धृत केलेलीं आढळतात. त्याच्या ग्रंथांत इतस्ततः विखुरलेले विचारांचे कण हे कधीं कधीं त्याच्या समग्र ग्रंथापेक्षां अधिक तेजस्वी व ओजस्वी वाटतात.

वयाची साठी उलटल्यानंतर इमर्सन्‌नें नवीन असें कांहीं लेखन केलें नाहीं. मात्र ह्या उतार-वयांत हार्वर्ड विश्वविद्यालयानें एल्. आय. डी. ही उपाधि वितरून त्याचा सन्मान केला आणि आपल्या विद्यालयाचे त्याला विश्वस्तहि नेमलें. कॉन्कर्ड येथील त्याच्या निवासस्थानीं आतां जगाच्या पाठीवरील निरनिराळ्या देशांतील विद्वान् त्याला भेटण्यास येऊं लागले. आयुष्याच्या अखेरीस एखाद्या सम्राटाच्या इतमामांत तो कॅलिफोर्नियाला भेट देऊन आला.

२७ एप्रिल १८८२ ला त्यानें शांतपणें आपला देह ठेवला. त्याचें सारें आयुष्य रूढीचा विरोध करण्यांत आणि लोकांना उदात्त मार्गाचें दर्शन करण्यांत व्यतीत झालें.

" I trim myself to the storm of time
I man the rudder, reef the sail;
Obey the voice at eve obeys at prime ;
" Lowly, faithful, banish fear,
Right onward drive unharmed
The port, wellworth, the crusier is near
And every wave is charmed."

# केशवसुत आणि इमर्सन्

**केशवसुतांची कविता त्यांच्या पूर्वींच्या** पिढींतील कवींच्या कवितेपेक्षां अगदीं वेगळी वाटण्याचें एक कारण असें कीं, तिच्यावर ज्या प्रमाणांत इंग्रजी कवितांचा प्रभाव पडला आहे, त्या प्रमाणांत तो त्या पिढींतील कवींच्या कवितांवर पडला नव्हता. महादेवशास्त्री कोल्हटकर, बजाबा प्रधान, कर्नल कीर्तिकर, महाजनि व कानिटकर ह्यांनीं इंग्रजी कवितांचीं रूपांतरें केलीं असलीं; आणि कुंटे, चिंतामणीपेठकर व मोगरे ह्यांनीं इंग्रजी पद्यरचनेच्या कांहीं विशिष्ट गुणांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष अवलंब केला असला, तरी त्यांच्या कवितेची ठेवण जुनी आहे आणि वळण पुराणें आहे. केशवसुतांनीं इंग्रजी विचार तर आत्मसात् केलेच, परंतु इंग्रजी पद्धतीची अभिव्यक्ति आणि रचनाशैलीहि मराठींत आणण्याचा सक्रिय प्रयत्न केला.

केशवसुतांच्या कवितेच्या ह्या इंग्रजी वळणाविषयीं सर्व समीक्षकांत एकवाक्यता आहे. त्यांच्या निधनानंतर ‘मासिक मनोरंजना’चे संपादक श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र यांना केशवसुतांच्या मित्रांचीं जीं पत्रें गेलीं, तीं मासिक मनोरंजनाच्या जानेवारी १९०६ च्या अंकांत दिलीं आहेत, तीं या दृष्टीनें विचारणीय आहेत. आपल्या दि. २९।११।०५ च्या पत्रांत र० टिळक म्हणतात, “माझ्या मतें आपल्यांतला वर्डस्वर्थ गेला.” पण केशवसुतांनीं वर्डस्वर्थच्या

एकाहि कवितेचें भाषांतर केलेलें नाहीं हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. 'भृंग', 'फुलपांखरूं' व 'हरपलें श्रेय' ह्या त्यांच्या तीन कवितांवर वर्ड्स्वर्थच्या कल्पनांची झांक क्वचित् पडली आहे, एवढेंच काय तें! विशेषतः शेवटल्या कवितेवर ती थोडी अधिक व ठळक आहे. आपल्या दि. ३।१२।०५ च्या पत्रांत रहाळकर लिहितात, "आज आमच्या महाराष्ट्राचा Keats गेला." परंतु केशवसुतांनीं 'दिवाळी' ह्या आपल्या स्वतंत्र कवितेंत फक्त एकाच ठिकाणीं Keats च्या एका कल्पनेचा उपयोग केला आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. ज्यांचा केशवसुतांशीं साक्षात् संबंध आला नव्हता, पण ज्यांच्यामुळें केशवसुतांच्या नांवाचा बोलबाला विशेष झाला, आणि जे केशवसुतांच्या नंतरच्या पिढींत कवि, नाटककार व विनोदी लेखक ह्या तीन नात्यांनीं महाराष्ट्रांत सर्वत्र लोकप्रिय झाले, त्या गोविंदाग्रजांनीं 'केशवसुत कसले मेले' ह्या आपल्या कवितेंत 'अवतरुनी फिरुनी शेले' असा एकदां केशवसुतांचा उल्लेख केला असून, दुसऱ्या उल्लेखांत 'इंग्लंदभूमि शेलेची। माहेर जडाचें बनलें' असें केशवसुतांचें श्रेष्ठत्व सूचित केलें आहे. परंतु केशवसुतांनीं शेलेच्या कल्पनांचा उपयोग फारच थोडा केला आहे. त्यांच्या 'वातचक्र' व 'प्रणयकथन' ह्या दोन कवितांत तो दृष्टीस पडतो. त्यांच्या 'फुलपांखरूं' व 'म्हातारी' ह्या कवितांची मांडणी मात्र शेलेच्या धाटणीशीं सदृश आहे.

केशवसुतांवर सर्वांत जास्त परिणाम जर कुणा कवीचा झाला असेल, तर तो इमर्सन्चा होय. केशवसुतांनीं आपले काव्यविषयक बहुतेक विचार इमर्सन्पासून उचलले असून त्यांच्या सोळांहून अधिक कवितांवर इमर्सन्च्या निबंधांतील विचारांची छाया पडली आहे.

जानेवारी १९०६ च्या मासिक मनोरंजनांतील केशवसुतांवरील आपल्या लेखांत किरातांनीं आणि जुलै, आगस्ट, सप्टेंबर व आक्टोबर १९१९ च्या मनोरंजनांतील आपल्या लेखांत रहाळकरांनीं केशवसुतांच्या आवडत्या कवींत इमर्सन्च्या नांवाचा निर्देश केला आहे. परंतु 'केशवसुतांच्या कवितेस जोडलेल्या 'चरित्रां'त मात्र सीतारामपंत दामल्यांनीं तो निर्देश गाळला आहे. इमर्सन् हा केशवसुतांचा विशेष आवडता कवि होता असें दिसतें. त्यांनीं 'सृष्टि आणि कवि' ह्या एकाच कवितेवर इमर्सन्च्या मूळ इंग्रजी कवितेच्या दोन ओळी दिल्या असून त्याचा नामनिर्देश केला आहे. स्वतःची कविता मूळ कवितेचें शब्दशः भाषांतर असेल तरच केशवसुत मूळ कवितेचा निर्देश करीत असत, असें त्यांच्या कवितासंग्रहावरून निदर्शनास येतें. 'स्फुट विचार' व 'कांहीं स्वकृत वचनें' ह्या केशवसुतांच्या कवितांची धाटणीहि इमर्सन्च्या Quatrains सारखी आहे. अशा तऱ्हेचीं सुभाषितें रचण्याची इमर्सन्ला अतिशय आवड होती. जानेवारी १९१७ च्या 'काव्यरत्नावलीं'त केशवसुतांच्या कवितेसंबंधीं लिहितांना रे० टिळक म्हणतात, "खरें काव्य म्हणजे कवीचें अंतःकरण, हें इमर्सन्चें म्हणणें सिद्ध करणारा मराठी कवि हाच होऊन गेला." टिळकांचा व केशवसुतांचा गाढ स्नेहसंबंध होता. तेव्हां केशवसुतांचा इमर्सन्च्या ग्रंथांचा अभ्यास लक्षांत घेऊनच बहुधा त्यांनीं हें विधान केलें असावें. तें अक्षरशः खरें आहे. केशवसुतांनीं इमर्सन्च्या ग्रंथांचें मार्मिक परिशीलन केलें होतें ह्याची साक्ष त्यांच्या एका पत्रा-

वरून पटते. त्या पत्रांत ते इमर्सन्च्या ' The transcendentalist ' ह्या निबंधांतील एक अवतरण उद्धृत करतांना किरातांना लिहितात,— " You complained काय करूं आणि काय नाहीं असें होतें ! " I give below an extract from Emesron's essay on " The transcendentalist", that struck me as an apt illustration of your mood :—

" Now we confess, and by no means happy, is our condition; if you want the aid of our labour, we ourselves stand in greater want of the labour. We are miserable with inaction. We perish of rust and rest but we do not like your work. "

" Then says the world, " show me your own. "

" We have none. "

" What will you do then ? " cries the world.

" We will wait. "

" How long ? "

" until the universe beckons and calls us to work. "

" But whilst you wait, you grow old and useless. "

" Be it so; I can sit in a corner and perish (as you call it) but I will not move until I have the highest command. "

'माधवानुज's eldest brother once said to me, that our highest poetry was in sitting still and shedding tears! How parallel with the above from Emerson. "

केशवसुतांचीं काव्यविषयक मतें इमर्सन्च्या ग्रंथांच्या अध्ययनापासून कशीं बनलीं होतीं हें समजण्यासाठीं पुढें इमर्सन्चीं मूळ मतें थोडक्यांत दिलीं आहेत. केशवसुतांच्या काव्यविषयक कविता वाचून त्यांचा पडताळा पाहतां येईल. केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तींतील काव्यविषयक कवितांचा अनुक्रम असा आहे:— कविताक्रमांक ६, ७, २८, ४२, ४५, ५१, ५४, ५९, ६७, ७६, ८२, ८७, ९८, १०३, १०८, ११८, १२६ आणि १२९.

I. The true poem is the poet's mind—History.

II. For it is not metres, but a metre-making argument, that makes a poem; a thought so passionate and alive, that, like the spirit of a plant or an animal, it has an architecture of its own, and adorns

nature with a new thing. The thought and the form are equal in the order of time, but in the order of genesis the thought is prior to the form. The poet has a new thought; he has a whole new experience to unfold; he will tell us how it was with him, and all men will be richer in his fortune. For the experience of each new age requires a new confession, and the world seems always waiting for its poet..... Words are also actions and actions are a kind of words,.............. It does not need that a poem should be long. Every word was once a poem— The Poet.

III. Why should not we have a poetry and philosophy of insight and not a tradition, and religion by revelation to us and not the history of theirs?......... .. It is always the theory of literature, that the word of a poet was authoritative and final,——— The Method of Nature.

IV. In Poetry, where every word is free, every word is necessary. Good poetry could not have been otherwise written than it is. The first time you hear it, it sounds rather as if copied out of some invisible tallet in the eternal mind, than as if arbitrarily composed by the poet. The feeling of all great poets has accorded with this. — Art.

V. Great wits to madness nearly are allied.

Doth serve to make our poverty our pride.

VI. No great genius was ever without some mixture of madness, nor can anything grand or superior to the vioce of common mortals be spoken except by the agitated soul.

VII. poets utter great and wise things, which they themselves do not understand.

VIII. Poetry which is true ideal, is the consolation of mortal men.

IX. Metre begins with pulse-beat, and the length of lines in songs and poems is determined by the inhalation and exhalation of the lungs. We can easily believe metres to be organic, derived from the human pulse and therefore power to mankind.

केशवसुतांचा भर इमर्सन्, एडगर ॲलन पो, लाँगफेलो इत्यादि अमेरिकन कवींवर विशेष दिसतो. ह्याचें कारण कदाचित् मुंबईला ते ज्या मिशनच्या शाळेंत मास्तर होते, तें अमेरिकन मिशन असावें. 'अढळ सौंदर्य' व 'वा. ब. पटवर्धन, नागपूर यांस' ह्या कवितांखालील काल-निर्देशावरून इमर्सन्चे ग्रंथ १८८६–८८ च्या दरम्यान केशवसुतांच्या हातांत पडले असावेत असें वाटतें. परंतु हे कालनिर्देश सीतारामपंत दामल्यांनीं प्रश्नचिन्हांकित केले आहेत. 'सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि' ही केशवसुतांची कविता खेड येथें २८ मार्च १८९० रोजीं लिहिण्यांत आली आहे. ती 'मनोरंजन व निबंधचंद्रिका' ह्या मासिकाच्या आक्टोबर १८९१ च्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. ह्या तिन्ही कवितांना इमर्सन्च्या कल्पनांचा आधार आहे. शिवाय १८९० पासून पुढें केशवसुतांच्या कवितांना विलक्षण बहर आला आहे. ह्यापुढील काळांत लिहिण्यांत आलेल्या 'झपूर्झा', 'सतारीचे बोल', 'कोणीकडून ? कोणीकडे ?', 'म्हातारी' व 'हरपलें श्रेय' ह्या चिंतनिकांवर इमर्सन्च्या विचारांचा ठसा आहे. तेव्हां १८९० पासून पुढें त्यांनीं इमर्सन्च्या ग्रंथांचा व्यासंग विशेष केला असावा असें वाटतें.

संस्कृत व प्राचीन मराठी कवितेपेक्षां केशवसुतांचा इंग्रजी कवितांचा व्यासंग विशेष होता. संस्कृत कविता त्यांनीं वर्गांत वाचली असेल तेवढीच काय ती. जुन्या मराठी कवितेकडे ते आयुष्याच्या अखेरीं अखेरीं म्हणजे १९०२ च्या सुमारास वळले होते, असें 'कचाप्रत देवयानी' व 'राजा शंतनु' ह्या त्यांच्या दोन कवितांवरून दिसतें. मात्र इंग्रजी कवितेचा त्यांचा अभ्यास अव्वलपासून अखेरपर्यंत चालू होता. तो इतका कीं, आनंदीरमणांना धाडलेल्या एका पत्राचा अपवाद सोडल्यास त्यांचीं सारीं पत्रें इंग्रजींत आहेत. केशवसुतांनीं कांहीं इंग्रजी कविताहि रचल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं कविता सीतारामपंत दामल्यांनीं केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या १९२१ च्या आवृत्तीनंतर 'चित्रमय जगतां'त प्रसिद्ध केल्या होत्या. आरंभीं आरंभीं केशव-सुतांना इंग्रजी प्रयोगांचें बेमालूम मराठीकरण साधलें नाहीं. 'लहान्या गर्जा', 'अज्ञात थडगें', निराशेचें अंडें', 'स्वर्ग झडपणें', 'चेहेरा वाचणें' इत्यादि प्रयोगांवरून हें सहज लक्षांत येईल. 'आपण वेडे आहोंत', 'डोक्याच्या भ्रमणामुळें विक्षिप्त झालों आहोंत' आदि केशवसुतांच्या कल्पनांच्या मुळाशीं The poets are mad ही परकीय कल्पना आहे हें कुणीहि सांगेल. कल्पनांच्या परकेपणाची केशवसुतांनाहि जाणीव असावी असें त्यांच्या...'तर परकीय कल्पनांतें तुवां घेउनि योजिले' ...ह्या उद्गारांवरून वाटतें. हें लक्षांत घेऊनच बहुधा माडखोलकरांनीं त्यांच्या कवितेला 'इंग्रजीचा अंशतः प्रतिध्वनि' असें म्हटलें असावें आणि प्रि. राजवाडे ह्यांनीं 'दिवा व तारा' व 'स्वप्न' ह्या कविता, न. चिं. केळकरांनीं 'आगबोटीच्या कांठाशीं' ही कविता आणि माधवराव पटवर्धनांनीं 'झोंपणाऱ्या पंतोजीस' ही कविता – मुळांत इंग्रजी तर नसाव्यातना अशा शंका घेतल्या असाव्यात.

प्रस्तुत निबंधांत उल्लेखिलेली प्रत्येक कविता भाषांतरित आहे असें नाहीं. एखादी कविता भाषांतरित आहे, एखादींत मुळांतील केवळ कल्पना आहे, तर एखादींत तिचें सोईस्कर रूपांतर आहे. क्वचित् एखादींत मूळ कल्पनेचा विस्तार आहे. केशवसुत प्रतिभासंपन्न तर खरेच, परंतु त्यांनासुद्धां प्रतिभाविकासासाठीं सतत व्यासंग ठेवावा लागला होता. कवीचा सतत व्यासंग नसेल, तर त्याच्या कृतींत आवर्तनें निर्माण होऊन ती कंटाळवाणी ठरेल. कविन्वशक्ति ही स्वयंभू असली, तरी अभ्यासाशिवाय तिची वाढ होत नाहीं. गंगा ही मोठी खरी, परंतु यमुना, गंडकी ब्रह्मपुत्रा आदि नद्यांच्या जलानें ती अधिक विशाल झाली आहे. केशवसुतांनीं इमर्सन्च्या कल्पना घेतल्या असल्या, तरी त्यांत आंधळें अनुकरण नाहीं. उलट हेतुपुरस्सर अनुसरण आहे. एखाद्या कुशल वादकाची 'गत' ऐकून तशीच 'गत' वाजविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत स्वयंसंपन्नता नसते असें कोण म्हणेल? प्रतिभा जन्मजात असली, तरी तिची साधना आवश्यक आहे. निरांजन नंदादीपावर उजळावें लागतें, पण म्हणून त्याला स्वतंत्र अस्तित्व व तेज नसतें का?

केशवसुतांनीं इमर्सन्च्या ग्रंथांचीं पारायणें केलीं त्याबाबत एक नवल असें कीं, इमर्सन्नें जे विषय भारतीय वाङ्मयांतून उचलले आहेत, तेच विषय केशवसुतांनीं सरळ त्या वाङ्मयांतून न घेतां इमर्सन्च्या निबंधांतून घेतले आहेत. 'झपूर्झा', 'सतारीचे बोल,' 'कोणीकडून? कोणीकडे?,' 'फुलपांखरूं', 'वातचक्र', म्हातारी,' व 'हरपलें श्रेय' ह्या त्यांच्या चिंतनवर कविता ह्या विधानाची साक्ष देतील. इमर्सन्च्या कवितेप्रमाणेंच केशवसुतांच्या कवितेचें बहिरंग खडबडीत आहे. वृत्ताच्या चौकटींत त्यांच्या मुक्त मनांतील कल्पनांचा कोंडमारा होतो व विचारांचा गोंधळ उडतो. इमर्सन्च्या प्रतिमांप्रमाणेंच त्यांच्या प्रतिमाहि कधीं कधीं अनुरूप असत नाहींत. त्यामुळें अर्थ अस्पष्ट व अंधुक व अधुरा रहतो. मात्र एका बाबतींत त्यांची कविता इमर्सन्च्या कवितेहून अधिक समर्थ आहे. तिच्यांत बुद्धि आणि भावना ह्यांचा प्रभाव एकसारखाच आहे.

पुढें केशवसुत आणि इमर्सन् ह्यांच्या लेखनांतलीं समानार्थक स्थळें निर्दिष्ट करीत आहें. तीं निर्दिष्ट करतांना केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तीचा आणि The works of Ralph waldo Emerson, vols. I, II and III 1922 By Mackmillan co. ह्या पुस्तकांचा उपयोग केला आहे. कवितेच्या मथळ्यापुढें अगोदर कवितेचा क्रमांक दिला आहे,

**क्र. ९. अढळ सौंदर्य.**

Yet it is not certain that the power to produce this delight, does not reside in Nature, but in man, or in harmony of both ............... For Nature is not always tricked in holiday attire, but the same scene which yesterday, breathed perfume and glittered as for the frolic of the nymphs, is overspread with melancholy to-day. Nature

always wears the colours of the spirit......... In the presence of Nature, a wild delight runs through the man, in spite of real sorrows.
— Nature and Solitude.

काल जो का आनंद मला झाला
तोच आजहि होतसे मन्मनाला ;
कालचा जो मी तोच हा असे का ?
अशी सहजच उद्भवे मनीं शंका ४

अशी सहजच उद्भवे मनीं शंका
काय समजुनि समजलें तुम्हांला का ? —
असे अनुभव कीं — रिझवि एकदां जें
पुन्हा बहुधा नच रिझो त्याच चोजें ५

पुन्हा बहुधा नच रिझो त्याच चोजें
कसें मग हें वेधिलें चित्त माझें —
आज फिरुनी या सूर्य-तरु-खगांनीं
आपुलीया नवकांति पुष्प-गानीं ? ६

म्हणुनि कथितों निःशंक मी तुम्हांतें,—
असे सुंदरता अढळ जरी कोठें
तरी करि ती सृष्टींत मात्र वास—
पहा मोहिल सर्वदा ती तुम्हांस ७

**क्र० २८. वा. ब. पटवर्धन मु. नागपूर यांस —**

The eye reads omens where it goes
And speaks all languages the rose :
And striving to be man, the worm
Mounts through all the spires of form — Nature

निर्जीव वस्तु तर लाव वदावयाला
जंतूंस लावहि विचार करावयाला
आम्हां शिकीव सुवचीं सुर व्हावयाला
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला ! ६

केशवसुतांचें हें भाषांतर शब्दशः नाहीं. परंतु कल्पनेचें मूळ इमर्सनच्या वरील अवतरणांत आहे, हें 'जंतू'च्या कल्पनेवरून उघड होईल. पहिल्या ओळींत त्यांनीं 'Rose' बद्दल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........

'निर्जीव वस्तु' हा शब्दप्रयोग केला आहे. क्रमांक ४१ च्या 'पुष्पाप्रत' ह्या कवितेच्या शेवटच्या श्लोकांत त्यांनीं 'अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया। जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया' असाच प्रयोग पुन्हां केला आहे. तेव्हां 'निर्जीव वस्तु' ह्या प्रयोगांत त्यांना 'फूल' अभिप्रेत असावें असें वाटतें.

* * *

Great is the art,
Great be the manners, of bard.
He shall not his brain encumber.
With the coil of rhythm and munhert–
But, leaving rule and pale forthought,
He shall age climbe.
For his rhyme.

कविता करितां मला न येई
रचिले हे गण हो परंतु कांहीं;

## क्र० ४२. कवितेचें प्रयोजन.

The sun illuminates only the eye of the man, but poet shines into the eye and the heart of the child. The lover of nature is he, who has retained the spirit of infancy even into the era of mankind. His intercourse with heaven and earth becomes part of his daily food. — Nature.

प्रौढत्वीं निजशैशवास जपणें बाणा कवीचा असे. ४

## क्र० ४७. सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि.

I see the spectacle of morning from the hill-top over against my house, from daybreak to sunrise with emotions which an angel might share......

प्रावारून उषा तुषारपटला सूर्यप्रतीक्षा करी —
होतों पाहत डोंगरीवरि उभा मोहूनि मी अंतरीं ...... १

## क्र० ५७. भृंग.

The Humble Bee
Burly, dozing humble–bee
Where thou art is clime for me
Let them sail for Porto Rique,

Far off heats through seas to seek ;
I will follow thee alone,
Thou animated torrid-zone !
Zigzag Steerer, desert cheerer,
Let me chase thy waving lines;
Keep me nearer, me thy hearer,
Singing over shrubs and vine. 1

Insect lover of the sun,
Joy of the dominion !
Sailor of the atmosphere ;
Swimmer through the waves of air ;
Voyager of light and noon;
Epicurean of June;
Wait, I prithee till I come
Whithin earshot, of thy hum,–
All without is martyrdom. 2

When the south-wind, in May days,
With a net of shinning haze
Silvers the horizon wall,
And, with softness touching all,
Tints the human countenance
With a colour of romance,
And infusing subtle heats,
Turns the sods to violets,
Thou in sunny solitudes,
Rover of the underwoods.
The green silence dost displace
With thy mellow, breezy bass. 3

Hot midsummer's petted crone,
Sweet to me thy drowsy tone
Tells of countless sunny hours,
Long days, and solid banks of flowers ;
Of gulfs of sweetness without bound
In indian wilderness found ;
Of Syrian peace, immortal leisure,
Firmest cheer, and bird-like pleasure. 4

Aught unsavoury or unclean
Hath my insect never seen;
But violets and bilberry bells,
Maple-sap, and daffodels,
Grass with green flag half-mast high
Succory to match the sky,
Columbine with horn of honey,
Scented fern, and agrimony,
Clover, catchfly, adder's-tongue,
And brier-roses, dwelt among;
All beside was unknown waste,
All was picture as he passed. 5

Wiser far than human seer,
Yellow-breeched philosopher!
Seenig only what is fair.
Sipping only what is sweet.
Thou dost mock at fate and care,
Leave the chaff, and take the wheat,
When the fierce north-western blast
Colls sea and land so far and fast,
Thou already slumberest deep;
Woe and want thou canst outsleep;
Want and woe, which torture us,
Thy sleep makes ridiculous.

—From the Works of Ralph Waldo Emerson

Poems. vol. VIII.

केशवसुतांची मराठी कविता शेवटीं परिशिष्टांत समाविष्ट केली आहे. त्यांनीं ही कविता दोनदां लिहिल्याचा उल्लेख सीतारामपंत दामले यांनीं केला आहे. त्यामुळें ती सर्वस्वीं स्वतंत्र स्वरूपांत अवतरली आहे. तरीदेखील 'Want and woe which torture us' ह्या चरणाचें 'अस्मदीय हृदयीं ठरलें। कीं जग हें दुःखें भरलें' किंवा 'Thou dost mock at fate and care' ह्या चरणाचें 'दुःख वदा तें केंवि असे ? अश्रू–ते हो काय ? कसें ?' हें रूपांतर रसिकांच्या लक्षांत सहज गेण्यासारखें आहे. इतरहि कल्पनांचा सारखेपणा सहज ध्यानांत येण्याजोगा असल्यामुळें विस्ताराचें कारण नाहीं. केशवसुतांनीं ह्या कवितेवर 'मणिबंधवृत्ताच्या चालीवर' असा निर्देश केला आहे. गणवृत्ताला मात्रिक जातीचें रूप देण्याचा असा प्रयोग त्यांच्यापूर्वी कर्नल

कीर्तिकरांनीं केला होता. तेथूनच तो केशवसुतांनीं घेतला आहे [ पहा. वि. ज्ञा. वि. एप्रिल, मे, जून १८८५ 'इंदिरा'परीक्षण ]. इंग्रजी कविता समोर ठेवून त्याच धर्तीवर मराठी रचना करण्याचा केशवसुत प्रयत्न करीत. इमर्सन्‌च्या कवितेंतील सातव्या व नवव्या चरणांतील शब्दसंगीत पहा. केशवसुतांनीं तें तसेंच मराठींत उतरण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक इमर्सन् व केशवसुत ह्या दोघांच्याहि रचना दाठर आहेत. प्रस्तुत दोन्ही कविता मात्र दाठरपणापासून अलिप्त आहेत. भृंगाच्या गुंजारवांतील नादमाधुर्य आपल्या शब्दांत शोषून घेण्याची दोघांनींहि पराकाष्ठा केली आहे.

### क्र० ६५. पुष्पाप्रत.

In the woods is perpetual youth, the perpetual presence of the sublime. Nothing divine dies. All good is eternally reproducive. The beauty of nature reforms itself in the mind and not for barren contemplation, but for new creation. In the tranquil landscape, and especially in the distant line of the horizon, man beholds somewhat as beautiful as his nature.—Nature.

सौकुमार्य तव अजुनी आहे !  
हसतचि आहे हास्य तुझें हें; ४  
दिव्यत्वाला स्पर्श कराया—भय वाटे मजला ! ५

चिरतरुणा रे ! चिररुचिरा रे !  
तुजसन्निध तो वास बरा रे  
कालहि तुझिया दिव्यत्वाला – वाटे नमन करी ! ९

मच्चित्ताच्या क्षितिजावरती  
नृत्याला जीं स्वप्नें करिती  
निदान, त्यांच्यामध्यें मजला – भासो तव मूर्ति ! १२

### क्र० ७६. क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास.

We cannot approach beauty. Its nature is like opaline doves' neck lusters, hovering and evanescent. Herein it resembles the most excellent things, which all have this rain-bow character, defying all attempts at appropriation and use. What else did jean Paul Richter signify, when he said to music, "Away! away! thou speakest to me of things which in all my endless life, I have not found and I shall

not find." The same remark holds true of painting and of poetry. Success is not attained when it lulls and satisfies, but when it astonishes and fires us with new endeavours after the unattainable.

In like manner, personal beauty is then first charming, when it suggests gleams and visions, and not earthly satisfactions. This agrees well with the high philosophy of Beauty, which the ancient writers delighted in; for they said that the soul of man, embodied here on earth, went roaming up and down, in quest of that other world of its own, out of which it came into this, but was soon stupified by the light of the natural Sun and unable to see any other objects, than those of these worlds, which are but shadows of real things. Therefore the Diety sends the glory of youth before the soul, that it may avail itself of beautiful bodies as aids to its recollection of the celestial good and fair; and man beholding such a person in the female sex runs to her, and finds the highest joy in contemplating the form, the movement and intelligence of this person, because it suggests to him that which is in the beauty, and the cause of the beauty—Love.

केशवसुतांची कविता शेवटीं परिशिष्टांत दिली आहे. 'The soul of man went roaming up' इत्यादीचें साम्य 'आत्माराम सुखें वनामधुनि तो होता जरा हिंडत' ह्या सुरुवातीच्या ओळीशीं आहे; आणि 'And man beholding such a personal in femal sex' ह्या कल्पनेचा अनुवाद 'रंभे उर्वशि गे' ह्या चरणांत आहे.

### क्र० ७७. तुतारी.

I do not readily remember any poem, play, sermon, novel, or oration, that our press vents in the last few years which goes to the same tune. . . . . . We have a great many flutes and flageslets, but not often the sound of any fife.—Heroism.

Thy trivial harp will never please
Or fill my craving ear
Its cords should ring as blows and breez,
Free, peremptory, clear.

No gingling serenader's art,
Nor tinkle of piano strings,
Can make the mild blood start
In its mystic springs.—Merlin.

एक तुतारी द्या मज आणुनि,
सारंगी, ती सतार सुंदर
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा
सूरहि, सनई, अलगुज माझ्या—
कसचीं हीं हो पडतिल काजा ?—२.

The leaves and shell of soft wood are all that the vegetation of this summer has made, but the solid columner stem, which lifts that bark of foliage into the air to draw the eye and to call us with its shade, is the gift of legacy of dead and buried years ... Throughout Nature the past combines in every creature with the present.
—The Conservative.

जुन्या नभीं या ताजे तारक
जुन्या भूमिवर नवी टवटवी,
जुना समुद्रहि नवरत्नें वी;
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी—
काय नव्हे ती श्रेयस्कारक ?

किंवा

जुन्या धरेवर नवतरु सुंदर
जुन्या तरूवर नवी कळी ती
जुन्या कळ्यांतुनि फळें उपजती ७

Bring us the bards who shall sing all our old ideas out of our heads; and new ones in; men making poets' poetry, which like the verses inscribed on Balder's Columns in Breidablik, is capable of restoring the dead to life.

ह्या उताऱ्यांत 'जुनें जाउं द्या मरणालागुनि' ही कल्पना आली आहे. केशवसुतांनीं 'कवितेचें प्रयोजन' ह्या आपल्या कवितेंत 'प्रेतेंही उठवील जी निजरवें ती तो तुतारी करीं। आतां नादवती......' असें 'तुतारी'चें गौरव केलें आहे. त्याचें मूळहि वरील उताऱ्यांत सांपडेल.

At this hour, than perhaps ever before, more freedom exists for culture. It will not now run against an axe at the first step out of the beaten track of opinion......

प्राप्तकाल हा विशाल भूधर.

The first and last lesson of useful art is, that Nature tyrannizes over our works......They must be conformed to her law, or they will be ground to powder by her omnipresent activity. Nothing droll, nothing whimsical will endure......Nature is ever interfering with Arts.

निसर्ग निर्घृण, त्याला मुर्वत —
नाहीं अगदीं पर्वा कशाची !
कालासह जी क्रीडा त्याची,
ती सकलांला समान जाची —
चुरुनि टाकी प्रचंड पर्वत ! ११

The violations of the Laws of Nature by our predecessors and our contemporaries are punished in us also. The disease and deformity around us certify the infraction of natural, intellectual and moral laws, and often violation to breed such compound misery ... unhappily no man exists who has not in his own personal become, to some amount, a stockholder in the sin, and so made himself liable to a share in expiation.

गतशतकांचीं पापें घोरें,—
क्षालायाला तुमचीं रुधिरें —
पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर ! १४

self-trust is the essence of heroism

धीराला दे प्रसंग हिंमत ! १५

A strong person makes the law and custom null before his will.

नियमन मनुजासाठीं, मानव —
नसे नियमनासाठीं जाणा,
प्रगतिस जर तें हाणी टोणा —
झुगारुनि तें देउनि, बाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव ! १८

घातक भलत्या प्रतिबंधावर
हल्ला नेण्या करा त्वरा रे !

The battle of old usage and accomodation to new facts, reappears in all countries and times......Human virtue demands her champions and martyrs, and the trial persecution always proceeds—Heroism.

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती

. . . . . . . . .

वीरांनो ! तर पुढें सरा रे—
आवेशानें गर्जत 'हर हर !' १९

**क्र० ७९. झपूर्झा.** ह्या चिंतनिकेवर पुढें स्वतंत्र लेखच आहे.

**क्र० ८३. चिन्हीकरण अर्थात् भाव आणि मूर्ति ह्यांचें लग्न.**

The moment our discourse rises above the ground line of familiar facts, and it is inflamed with passion or exalted by thought, it clothes itself in images......All the facts in natural history taken by themselves, have no value, but are barren, like a single sex. But marry it to human history, and it is full of life......... A man's power to connect his thought with proper symbol, and so to utter it depends on the simplicity of his character, that is, upon his love of truth and his desire to communicate it without Loss—Language.

. . . . . . उपवर वधू मूर्तिनाम्नी विराजे
तीचे संगें वर परम तो भावशर्माहि साजे ! १
होती पर्युत्सुक बहुत ती शीघ्र पाणिग्रहाला . . . . . .

**क्र० ८७. सृष्टि आणि कवि.**

The Apology

Think me not unkind and rude,
That I walk alone in grove and glen ;
I go to the God of the wood
To fetch his word to men.

Tax not my sloth that I
Fold my arms beside the brook;
Each cloud that floated in the sky
Writes a letter in my book
Chide me not, laborious band,
For the idle flowers I brought;
Every astor in my hand
Goes home loaded with a thought.
There was never mystery
But 'tis figured in the flowers.
Was never secret history
But birds tell in the bowers.
One harvest from thy field,
A second crop thy acres yield
Which I gather in a song.

मी एकला फिरतसें बहुवार रानीं
यालागुनी न समजा मजला अडाणी;
आराधुनी विपिनदैवत मी तिथूनी
त्याचीं प्रसादवचनें मनुजांस आणी. १

पाहून निर्झर, उरीं कर वेंगुनीयां
मी ठाकतों, परि न मंद म्हणा जना या.
प्रत्येक मेघ वरता फिरतां नभांत
एकेक शब्द लिहितों मम पुस्तकांत! २

'पुष्पें वनांत कसलीं खुडितो फिरोन?'
उद्योगमग्न जन हो! मज हें म्हणा न.
नक्षत्रसें सुम मदीय करांतलें तें
सत्कल्पिपूरित असें सदनास येतें! ३

पुष्पामध्यें प्रकट होय न जें जराहीं
सृष्टींत एकहि रहस्य असें न कांहीं;
ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजितांत
नाहीं निगूढ इतिहास असा जगांत! ४

शेतामधून सदनाप्रत पीक एक
नेतात पुष्ट बलिवर्द तुझें सुरेख,
तूझी जमीन दुसरें मज पीक देते.
काव्यांत सांठवुनि ठेवितसें पहा तें. ५

ह्याच कवितेला इतरत्र 'कवीला अभिष्ट समजूं नका' असाहि मथळा आहे. आणि शेवटच्या श्लोकाच्या चौथ्या ओळीचा 'भूमी तुझी मज दुजें बहु पीक देते' असा पाठभेद आहे.

### क्र० ९६. मूर्तिभंजन—

This human mind wrote history, and this must read it. The Sphinx must solve her own riddle............ Ah! brother; stop the ebb of thy soul...........ebbing downward into the forms into whose habits thou hast now for many years slid. As near and proper to us that old fable of the Sphinx, who was said to sit in the road-side and put riddles to every passanger. If the man could not answer she swallowed him alive. If he conld solve the riddle the sphinx was slain.

कोडें घालूनीयां बसली कैदाशीण
उकलिल्यावांण खाईल ती! ४

तिच्या खळीमध्यें नाहीं आम्हां जाणें,
म्हणूनि करणें खटाटोप ५

Sphinx साठीं केशवसुतांनीं 'कैदाशीण' हा प्रतिशब्द योजिला आहे.

### क्र० ९८. काव्य कोणाचें?

The artist does not feel himself to be the parent of his work, and is as much surprised at the effect as we.........

कवी बोले "मम पंक्ति कीं नव्हे ते." ३

पुढें वर्णन पाहून रेखलेलें;
वाचकाचें रममाण चित्त झालें;
कविस शंसी तो "धन्य!" अशा बोलें,
"त्यास वर्णन मम न तें" कवी बोले ४

The artist who is to produce a work which is to be admired, must individualise himself ......... he must work in the spirit in which we conceive a prophet to speak. The feeling of all great poets has accorded with this. They found the verse, not made it. The Muse brought it to them. A religious poet once told me that " he valued his poems not because, they were his, but because they were not. " He thought that angels brought them to him. —— Art.

" काव्य लिहिलें मीं खरें, परी मातें
शारदेनें जो मंत्र दिला कानीं,
तसें लिहिलें मीं,– काव्य तिचें मानीं ! ६

The tint of the flower proceeds from its root and the lustres of the sea-shell begin with its existence........................

" दिव्य शक्तीनें स्फुरे गंध पुष्पीं,
रंग खुलतीही तिनें इंद्रचापीं; ......७

क्र० १०५. नवा शिपाई.

Everything is kin of mine—Mithridates.

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत

As I spoke, beneath my feet the ground-pine curled its pretty wreath.........Over me soared the eternal sky—Each and All.

कोठेंही जा पायांखालीं तृणावृता भू दिसते,
कोठेंही जा डोईवरतें दिसतें नीलांबर तें

Behold, it saith, ' I am born into the great, the universal mind. I, the imperfect, adore my own Perfect......... Universe is presented in atom in a moment of time.

पूजितसें मीं कवणाला ?– तर मी पूर्जी अपुल्याला
आपल्यामध्यें विश्व पाहुनी पूर्जी मी विश्वाला ;
' मी ' हा शब्दच मजला नलगे,.........

There is no great and no small
To the Soul that maketh all
And where it cometh, all things are,
And it cometh everywhere.

लहान–मोठें मज न कळे,
साधु–अधम हें द्वयहि गळे,
दूर–जवळ हा भाव पळे;
सर्वच मोठें,–साधु, जवळ,–त्या सकलीं मी भरुनी राहें ! २.

**क्र० १०८. पद्यपंक्ति.**

This cup, which nature puts to our lips has a wonderful virtue, surpassing that of any other draught. It opens the senses, adds power, fills us with exalted dreams, which we call hope, love, ambition, science especially it creates a craving for larger draughts of itself.——— Old Age.

अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा,
पितां बुडाशीं गाळ दिसे,
त्या अनुभव हें नांव असे !
फेकुनि द्या तो जगावरी
अमृत होउं तो कुणातरी !

इमर्सन्च्या कवितासंग्रहांत अशीं अनेक वचनें आहेत. त्यांना तो ' Quatratrains ' म्हणतो.

**क्र० ११३. सतारीचे बोल.**

ह्या चिंतनिकेवर पुढें एक स्वतंत्र विवेचन आहे.

**क्र० ११४. कोणीकडून? कोणीकडे ?**

ह्या चिंतनिकेवरहि पुढें वेगळें विवेचन आहे.

**क्र० ११८. आम्ही कोण ?**

Nature's darling child ...........
He is not blind and deaf, for the Universe becomes transparent.

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ?–आम्ही असूं लाडके.
देवाचे............
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

# केशवसुतांच्या कवितेंतील विराग

□ □ □ □ □ □ □

**आज बुक-डेपोंत केशवसुतांच्या** कवितेची नवीनतम पांचवी आवृत्ति उपलब्ध आहे. या आवृत्तीचे संपादक केशवसुतांचे पुतण्ये श्री. प. चिं. दामले यांनीं चौथी आवृत्ति काढली त्याच वेळीं एकेकाळीं गाजलेल्या ' रत्नाकर' मासिकाच्या कविताविभागाचे संपादक श्री. ह. स. गोखले यांचें त्यांना केशवसुतांच्या कवितांचा अनुक्रम लावतांना व पाठभेद निश्चित करतांना साहाय्य झालें होतें. केशवसुतांच्या कवितेची परिपूर्ण व अधिकृत आवृत्ति काढण्याचा प्रयत्न केला याबद्दल श्री. दामले व श्री. गोखले हे आधुनिक कवितेच्या अभ्यासकांच्या धन्यवादास पात्र आहेत. कवितांचा अनुक्रम व पाठभेद या बाबतींत श्री. गोखल्यांना रत्नाकरांत नाट्यछटाकार कै. दिवाकर यांनीं मोठ्या मेहेनतीनें व कष्टानें केशवसुतांच्या चरित्राविषयीं व कवितांविषयीं माहितीचीं जीं टिपणें वारंवार प्रसिद्ध केलीं होतीं, त्यांची मदत झाली असावी हें उघड आहे. परंतु श्री. दामले व श्री. गोखले यांच्या या प्रयत्नांत क्वचित् अनवधानानें कांहीं स्थळीं दोष राहून गेले आहेत. ते पुढील आवृत्तींत काढून टाकणें आवश्यक आहे. चौथ्या आवृत्तीच्या पुनर्मुद्रणांत १२ व १३ आणि २३ व २४ या कवितांच्या अनुक्रमांत चूक झाली असल्याचें स्वतः संपादकांनींच एका टीपेंत नमूद केलें आहे. परंतु ती

चूक पांचव्या आवृत्तींत दुरुस्त करण्याचें तसेंच राहून गेलें आहे. ‘ कवितेचें प्रयोजन ’ या कवितेचा ४२ आणि ‘ नैर्ऋत्येकडील वारा ’ या कवितेचा १०० हे अनुक्रमहि बरोबर नाहींत. या दोन्ही महत्त्वाच्या कवितांखालीं स्थलनिर्देश व कालनिर्देश नाहींत. या दोन्ही कवितांत ‘ पुण्यप्रदेशा’चा निर्देश आहे, तेव्हां त्या पुण्यास तर लिहिल्या नसाव्यात ना ? ‘ कवितेच्या प्रयोजनां’तील २८, २९ व ३१ या चरणांत अनुक्रमें ‘ स्फूर्ति ’ ‘ निशाण ’ व ‘ तुतारी ’ या सर्वश्रुत कवितांचा उल्लेख आहे. यांपैकीं ‘ निशाणाची प्रशंसा ’ अनुक्रम १११ या कवितेवर स्थलकालनिर्देश नाहीं, परंतु ही कविता ऑगस्ट १८९८ च्या ‘ काव्यरत्नावलीं ’ त आणि एप्रिल १९०० च्या ‘ सुविचारसमागमां’त आलेली आहे. ‘ स्फूर्ती ’ खालीं मुंबई २३ मे १८९६ असा स्पष्ट स्थलकालनिर्देश आहे. ‘ तुतारी ’खालीं मुंबई २८ मार्च १८९३ असा स्पष्ट स्थलकालनिर्देश आहे. मुळांत या कवितेंत १७ कडव्ीं होतीं. पुढें केशवसुतांनीं तिचें संस्करण व परिष्करण करून ती संख्या वाढवली. चौथ्या आवृत्तीच्या परिशिष्टांत तीं अधिक कडवीं दिलेलीं आहेत. तेव्हां ‘ कवितेचें प्रयोजन ’ ही कविता वस्तुतः क्रमानें १८९३ नंतरची असावयास हवी. तिचा अनुक्रम १८९६ नंतरचाहि धरावयास हरकत नाहीं. परंतु ‘ स्फूर्ति ’ हा शब्द ‘ एका विवक्षित कवितेचें नांव ’ या अर्थानें कदाचित् प्रयुक्त केला नसावा अशी शंका निघणें शक्य आहे. वास्तविक या कवितेंत केशवसुतांनीं ‘ स्फूर्ति ’ ‘ निशाणाची प्रशंसा ’ व ‘ तुतारी ’ या तिन्ही ऊर्जस्वल कवितांचा उल्लेख बुद्धिपुरस्सर केला आहे. ‘ नैर्ऋत्येकडील वारा ’ या कवितेच्या ४२ व्या व ४६ व्या चरणांत केशवसुतांनीं आपल्या वडिलांचा उल्लेख केला आहे. त्यांचे वडील १८९३ सालीं वारल्याचें त्यांचे बंधु कै. सी. के. दामले हे सांगतात. तेव्हां ही कविता वस्तुतः क्रमानें १८९३ पूर्वीची किंवा त्या सुमाराची असावयास हवी.

कवितांच्या पाठभेदांच्या बाबतींतहि क्वचित् दृष्टिदोष झाले आहेत. परंतु त्यामुळें अर्थाचा अनर्थ झाला आहे. ‘ प्रियेला सादर केलेली पुष्पमाला किंवा कर्तव्य आणि प्रीति ’ या अनुक्रम ५२ च्या कवितेंतील १२ व्या श्लोकाच्या तिसऱ्या चरणांत ‘ त्याच्या गे हृदयांत नंतर उठे उद्वेग तो प्रीतिचा ’ असा पाठ आहे. तो वास्तविक ‘ त्याच्या गे हृदयांत नंतर उठे उल्लास तो प्रीतिचा ’ असा असावयास हवा. तसा तो जानेवारी १९०१ च्या ‘ सुविचारसमागमां’त नमूद आहे. म्हणजे अर्थाचा अनर्थ होणार नाहीं. परंतु आश्चर्य हें कीं, मुळांतच मुद्रणदोषामुळें उद्भवलेल्या अशा अपपाठांवरहि आलोचकांनीं भाष्यें रचलीं आहेत. ‘ कवितेच्या प्रयोजनां’तील ‘ माता ही सुजला स्वभूमि सुफला ’ या चरणावरील भाष्यासंबंधींहि असेंच म्हणतां येईल. ही कविता मे १८९९ च्या ‘ सुविचारसमागमां’त व जानेवारी १९०१ च्या ‘ काव्यरत्नावलीं ’त आलेली आहे. केशवसुतांचे समकालीन दत्त यांची ‘ जननी आर्यभूमि ’ ही कविता केशवसुतांच्या कवितेच्या अगोदर सहा महिने म्हणजे डिसेंबर १८९८ च्या ‘ सुविचारसमागमां’त आलेली आहे. दत्तांच्या कवितेंत ऑक्टोबर महिना दिला आहे, पण तो

बरोबर नाहीं. दत्तांची ही कविता रवींद्रनाथ ठाकुरांच्या एका कवितेवरून लिहिलेली आहे. तिच्याखालील टीपेंत 'सुविचारसमागमा'चे संपादक म्हणतात :—

"हें पद कवीनें सुप्रसिद्ध बंगाली कवि श्रीयुत रवींद्रनाथ ठाकूर यांच्या एका पदावरून केलें आहे. मुळांतले विचार व शब्दहि कित्येक ठिकाणीं जशाचे तसे ठेवण्याचा यांत प्रयत्न केला आहे." रवींद्रनाथ ठाकूर हे 'आनंदमठ' व त्या कादंबरींतील 'वंदेमातरम्' हें राष्ट्रगीत लिहिणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्यायांपेक्षां वयानें कितीतरी लहान. त्यांचें गीत जर महाराष्ट्रांत दत्तांच्या कानांवर आलें होतें, तर केशवसुतांच्या कानांवर बंकिमचंद्रांचें 'सुजलां सुफलां' हें गीत आलें नसावें काय? केशवसुतांचे सहाध्यायी व स्नेही हरिभाऊ आपटे बंगाली जाणत होते. 'कादंबरीकल्पद्रुम' व 'मोदवृत्त' यांच्या द्वारें महाराष्ट्रांत बंगाली कादंबऱ्यांचे अनुवाद आले होते. आनंदमठाचे दोन अनुवाद झाले होते. ज्या 'मासिक मनोरंजना'नें केशवसुतांच्या कवितांना प्रसिद्धि दिली, त्याचे संपादक मित्र यांनीं तर आपल्यासमोर बंगाली वाङ्मयाचाच आदर्श ठेवला होता. तेव्हां आधुनिक मराठी कवितेच्या आलोचकांनीं लेखन करतांना विशेष जागरूक असणें आवश्यक आहे.

श्री० प. चिं. दामले यांनीं आपल्या चुलत्यांच्या कवितेची परिपूर्ण व अधिकृत आवृत्ति काढलेली असली, तरी यापुढील आवृत्ति त्यांनीं सर्वांगपरिपूर्ण व निर्दोष काढावी अशी विनंती आहे. म्हणजे ती पुढील अभ्यासकांना उपकारक व उपयुक्त होईल. त्या आवृत्तींत केशवसुतांच्या इंग्रजी कवितांचा व इतर अप्रसिद्ध कवितांचा समावेश करावा. आपल्या समकालीन कवयित्री काशीताई हेरलेकर यांना केशवसुतांनीं जें कविताबद्ध उत्तर पाठविलें, तें जानेवारी १९३१ च्या 'रत्नाकरां'त आलेलें आहे, तेंहि या आवृत्तींत समाविष्ट करावें. शिवाय, या आवृत्तींत केशवसुतांची मराठी व इंग्रजी पत्रेंहि अंतर्भूत करावीं. केशवसुतांनीं 'आनंदीरमणां'ना पाठविलेलें एक मराठी पत्र प्रा. रा. श्री. जोग यांनीं जुलै व ऑगस्ट १९४६ च्या 'साहित्य-पत्रिकें'त प्रसिद्ध केलें होतें. केशवसुतांचा काव्यविषयक दृष्टिकोन जाणून घेण्याच्या दृष्टीनें तें पत्र उद्‌बोधक आहे. केशवसुतांचीं कांहीं इंग्रजी पत्रें अंशात्मक स्वरूपांत 'मासिक मनोरंजन' पु. ११ भा. ७ यांत आलेलीं आहेत. हीं पत्रें केशवसुतांनीं आपले ज्येष्ठ मित्र किरात यांना लिहिलीं होतीं, असें चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेल्या 'काव्यचर्चा' या पुस्तकांतील आपल्या लेखांत कै. दिवाकर सांगतात, तर तीं केशवसुतांनीं आपले शिष्य श्री. रहाळकर यांना पाठविलीं होतीं असें 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' या पुस्तकाच्या प्रथम खंडांतील आपल्या लेखांत कै. माधवराव पटवर्धन म्हणतात. त्यांचा शोध घेऊन तीं प्रसिद्ध होणें आवश्यक आहे.

– २ –

केशवसुतांच्या कवितांचें कालानुक्रमाच्या दृष्टीनें सूक्ष्म निरीक्षण व जागरूक परिशीलन केलें तर असें स्पष्ट दिसतें कीं, तिच्यांत आरंभापासून अंतापर्यंत दोन प्रवाह समांतर वाहत आहेत. एकाचा सूर प्रोत्साहक, तर दुसऱ्याचा करुण आहे. किंबहुना केशवसुतांच्या वृत्तींत व वाणींत आरंभीं आरंभीं जो उत्साह, जो अभिनिवेश, जो आत्मविश्वास आणि जो आशावाद संचार करीत असतांना प्रत्ययास येतो, तो पुढें पुढें मंद मंद पडत गेला आहे. सुरुवातीस 'अशी असावी कविता म्हणून, तशी नसावी कविता म्हणून, सांगावया कोण तुम्ही कवीला, आहांत मोठे पुसतों तुम्हांला ?' – असा टेंचाचा प्रश्न करणारे केशवसुतच पुढें 'द्या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचें मुकें, गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसे थोडकें ।' असे नरमाईचे उद्गार काढतांना आढळतात; 'देवदानवां नरें निर्मिलें' असा अगोदर अभिनिवेश प्रकट करणारे केशवसुतच नंतर 'प्रेमानें परमेश्वरास भजतो जो निर्मलें मानसें, लोटी निर्मल सौख्यसिंधु-लहरी त्याचेवरी जीवित' किंवा 'केशव त म्हणे देवा दीननाथा । तुझे पायीं माथा, वाहियेला' अशी श्रद्धा व्यक्त करतात; 'माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया चालावयाचा पुढें, आहे सुंदर तो सदा सरसवाङ्निष्यंद चोहींकडे । तुम्ही नाहिं तरी सुतादि तुमचे ध्यातील तो प्राशुनी' असें आधीं आत्मविश्वासाचे व कालांतरानें खरे ठरलेले बोल बोलणारे केशवसुतच शेवटीं 'एक शब्द बोलेन जरी, सकला कुंठित करिन तरी, अशी आगळी, परी बावळी, आहे दुबळी' असे शंकेकुशंकेचे शब्द मुखावाटे काढतात. 'काय निराशा असे बरें ? –बुजगबाहुलें जगांतलें' असें अधूनमधून आपल्या मनाला बजावणारे केशवसुत अखेरच्या कवितेंत 'धिकार या जगीं, इच्छित न मिळे कांहीं' असे विरागाचे उद्गार काढतात. हें असें कां, याचा विचार होणें आवश्यक आहे. 'हरपलें श्रेय' हें केशवसुतांचें शेवटचें गीत. त्यासंबंधीं स्पष्टीकरण करतांना त्यांनीं आपल्या एका पत्रांत 'You can guess my state of mind from my piece in the last issue of मनोरंजन (हरपलें श्रेय). A crack in the heart! But, alas! where is the restorative ?' असे निराशेचेच उद्गार काढले आहेत. केशवसुतांच्या व्यक्तिमत्त्वाला दोन बाजू होत्या किंवा ज्या इंग्रजी कवितांचा त्यांनीं अभ्यास केला होता त्यांपासून त्यांनीं हा निराशावाद उसना घेतला होता, एवढ्या मीमांसेनें अभ्यासकांचें समाधान होण्यासारखें नाहीं. केशवसुत मधून मधून जीवनाकडे हताश नजरेनें कां पाहात, याची साधार मीमांसा झाली पाहिजे. येथें तसा अल्प प्रयत्न करीत आहें.

– ३ –

केशवसुतांच्या अलौकिक प्रतिभेनें कवितेचे नवे नवे प्रांत निर्माण केले; 'तुतारी,' 'नवा शिपाई,' 'गोफण,' 'स्फूर्ति, 'निशाणाची प्रशंसा' इत्यादि पौरुषपूर्ण काव्यें आपल्या ओजस्वी वाणीनें गाइलीं; नव्या युगाचें दर्शन प्रथम त्यांच्या कवितांत झालें; आणि म्हणून ते आधुनिक

कवितेचे प्रवर्तक होत, याविषयीं हुज्जत घालीत बसण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु विवक्षित प्रकारच्या उदासीन मनोरचनेमुळें, तऱ्हेवाईक स्वभावामुळें आणि प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांच्या कवितांत एक करुण कहाणी गुंफली गेली आहे हेंहि विसरून चालणार नाहीं. त्यांच्या जीवनचरित्राविषयीं तपशीलवार अशी माहिती फारशी उपलब्ध नाहीं असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. सात शतकांपूर्वींच्या प्राचीन कवींच्या चरित्रांचें व काव्यांचें जर आस्थापूर्वक संशोधन होतें, तर मग १९०५ सालीं केवळ ४७ वर्षांपूर्वी दिवंगत झालेल्या केशवसुतांचें सुसूत्र व विश्वसनीय चरित्र कां लिहिलें जाऊं नये? वास्तविक केशवसुतांना अवघ्या ३९ वर्षांची आयुर्मर्यादा लाभली होती. त्यांनीं १७ वर्षें काव्यलेखन केलें आणि त्या अवधींत केवळ १३२ कविता लिहिल्या. या कवितांचा त्यांचे दोघे बंधु कै. मोरो केशव व कै. सीताराम केशव दामले यांनीं पुरविलेल्या माहितीच्या आधारें विचार केला, तर केशवसुतांच्या कवितेंतील करुण विभागावर बराच उजेड पडतो. मोरोपंतांनीं पुरविलेली माहिती १९०५ च्या काव्यरत्नावलीच्या 'सालअखेर' मध्यें ग्रथित झालेली आहे. सीतारामपंतांनीं दिलेली माहिती दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या आवृत्तीच्या आरंभीं जोडलेली आहे.

केशवसुतांच्या या जीवनविषयक माहितीवरून असें दिसतें कीं, ते जात्याच अशक्त व किरकिरे होते. केशवसुतांनीं आपल्या या किरकिरेपणाचा उल्लेख

देवी सागरिका! तुम्हीं तर अतां तीं गायनें गाइजे
त्यांच्या धुंद अफूगुणें किरकिऱ्या बाळास या आणिजे

निद्रा दीर्घ—

या ओळींत केला आहे. लहानपणापासूनच खेळण्याखिदळण्याकडे अगर बोलण्याभांडण्याकडे त्यांची प्रवृत्ति नसे. ते कांहींसे एकलकोंडे, माणसघाणे आणि वरवर पहाणारास तरी अबोल व दुर्मुखलेले दिसत. ते विद्यार्थी असतांना वर्गांत संस्कृतचे अध्यापक कै. वामन शिवराम आपटे यांनीं त्यांना दुर्मुखलेला म्हटलें. त्याबरोबर त्यांनीं त्यांना

—याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं
तेणें सर्वहि डोलतील जन हे हर्षें कदाचित् भुवीं!—
विद्यासंस्कृत त्या तुझ्या, क्षणभरी, मस्तिष्कतंतूंवरी
येता नम्र विचार हा तुज भला होता किती तो तरी!

असा उलट टोमणा हाणला तो प्रसिद्धच आहे [पहा. रत्ना. फेब्रु. १९२६]. केशवसुतांच्या बालपणींच्या या उद्गारांत बाणेदारपणा व आत्मविश्वास असला, तरी थोडाफार संताप व दर्प आहे हें दृष्टीआड करतां येत नाहीं. या श्लोकाची भाषाच या विधानाची साक्ष देईल. अशक्त माणसें संतापी असतात, हा अनुभव कुणास नाहीं? केशवसुतांच्या अनेक कवितांत संताप



के. ४

आविर्भूत झाला आहे. 'मुलास झोडपणाऱ्या एका पंतोजीस' त्यांनीं 'मूर्ख,' 'क्रूर' व 'खाटीक' अशा शेलक्या व मोजक्या शिव्या संतापाच्या भरांत बहाल केल्या आहेत. 'तुतारीं'तहि त्यांनीं क्रोधाला वश होऊन प्रतिगामी पक्षाला उद्देशून 'थुः त्यांचेवर जोडे हाणुनि' व 'धिक्कार अशा मूर्खांलागुनि' असे तिखट उद्गार काढले आहेत. तुकाराम-महाराजांच्या अभंगांत आणि आगरकरांच्या निबंधांत अशा तऱ्हेचा फटकळपणा पुष्कळदां दृष्टीस पडतो. तो स्वाभाविक आहे यांत शंका नाहीं. परंतु केशवसुतांच्या कवितेविषयीं लिहितांना, उत्साह हा जो वीररसाचा स्थायिभाव, त्याऐवजीं क्रोध या क्षणिक विकारालाच चुकून उत्साह मानण्यांत येतें आणि संतप्त वाणीलाच ओजस्वी समजण्यांत येतें, ही केव्हांहि भूल आहे. केशव-सुतांचा एकलकोंडेपणा व माणुसघाणा स्वभाव 'दिवाळीं'त उघड झाला आहे. ही सुंदर कविता नोव्हेंबर १९०० च्या मनोरंजनांत आलेली आहे. तिच्यावर स्वतः केशवसुतांनीं शके १८२२ असा निर्देश केला आहे. त्यावरून आणि वर्णनावरून हें साल सुगीचें व सणासुदीचें गेलें असें दिसतें. या वर्षीं दिवाळीनिमित्त केशवसुतांचे आप्त त्यांच्याकडे एकत्रित झाले असावेत असें वाटतें. एका श्लोकांत चिमखड्या बोबड्या 'बनी'चा उल्लेख आहे. घरांत जिकडे तिकडे आनंदीआनंद आहे. त्या आनंदाची ओझरती झुळूक लागूनच कीं काय, केशवसुत –

आतां भार नसे कुणास, पण तो शिंक्यास भारी असे
हातां काम नसे, परंतु पडतें तोंडास तें फारसें
कोणा मार नसे, तरी पण शिरीं तो सोंगट्यांच्या बसे;
कोणा त्रास नसे, परंतु नयनां तो जागरें होतसे!

असा कांहींसा खुसखुशीत विनोदहि करतात; परंतु दुसऱ्या क्षणालाच त्यांची विषण्ण वृत्ति जागृत होते आणि पुढील शब्दांत ते आपली एकांतप्रियता बोलून दाखवितात!

खाणें आणि पिणें, विनोद करणें, गाणेंहि वा खेळणें
जैसें ज्यांस रुचेल त्यापरि तुम्हीं या उत्सवीं वागणें;
मी संध्यासमयीं खुशाल गिरणातीरावरी बैसुनी
कालक्षेप करीन उन्मन असा वेड्यापरी गाउनी!

१९०२ सालीं केशवसुतांच्या मातुःश्री उज्जैन येथे मोरोपंत यांच्या घरीं निवर्तल्या. त्या वेळीं केशवसुतांचे बहुतेक कुटुंबीय तेथें एकत्रित झाले होते. त्या सर्वांचा ग्रूपफोटो घ्यावा म्हणून केशवसुतांच्या बंधूंनीं विचार केला. परंतु केशवसुत फोटो काढण्याला तयारच होत ना. आमच्यासारख्याचा फोटो काढून काय करावयाचें आहे? असें म्हणून त्यांनीं आपल्या सर्व आप्तांच्या इच्छेला हरताळ फासला. केशवसुतांच्या चरित्रांतील या प्रसंगावरून त्यांचा स्वभाव

कसा तऱ्हेवाईक व माणुसघाणा होता तें दिसून येतें. अलिप्तता व एकांत यांबद्दल बाळपणापासूनच आवड असल्यामुळें केशवसुत पुढें चिंतनशील बनले असावे.

केशवसुतांच्या जीवनविषयक माहितीवरून लहानपणापासूनच आनंदाचा व आल्हादाचा असा काळ त्यांच्या वांट्यास कधीं फारसा आला नाहीं असें दिसतें. घरच्या गरिबीमुळें पुढील अभ्यासासाठीं कुमारकालांतच त्यांना आपले आईवडील, बहीणभाऊ व पत्नी यांना कोंकणांत सोडून देशावर यावें लागलें. देशावर आल्यावरहि दुर्दैवानें त्यांचें बस्तान एके ठिकाणीं बसलें नाहीं. बडोद्याहून नागपुरास आणि नागपुराहून पुण्यास असा प्रवास व त्रास त्यांस सहन करावा लागला. पुण्यास केशवसुत पोचले तो काळ १८८५ चा जनजागरणाचा होता. केशवसुत त्यामुळें प्रभावित झाले, आणि 'दाते यांस' 'गांवीं गेलेला मित्र' 'भारतीयाचे उद्गार' अशा कांहीं देशभक्तिपर ऊर्जस्वल कविता त्यांनीं लिहिल्या. पुणें सुटल्यावर या विषयावर केशवसुतांनीं एकहि कविता लिहिली नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे. म्हणूनच बहुधा 'पुण्यप्रदेशां'तील त्यांच्या 'कोणी' मित्रानें त्यांच्यावर

माता ही सुजला स्वभूमि सुफला, तीच्यापरी लेकरां<br>
खायाला पुरतें पहा नच मिळे कीं हाल आहे पुरा;<br>
झांकायास तनूस वस्त्रहि न तें आतां पुरेंसें मिळे;<br>
या वेळेस कसें कवे! तुज सुचे गाणें न मातें कळे!

दा. क्र. ११५५६

अशी मर्मभेदक टीका केली असावी. केशवसुतांचा स्वभाव विलक्षण हळवा व प्रेमळ होता असें 'गोष्टी घराकडिल मी', 'सिंहावलोकन' व 'नैर्ऋत्येकडील वारा' या कवितांवरून दिसतें. केशवसुतांचा कुमारकाल म्हणजे आपल्या जुन्या एकत्र कुटुंबव्यवस्थेंतील स्थित्यंतराचा काळ होता. पोटापाण्याच्या सोयीसाठीं कुटुंबांतील चार कर्तीं माणसें चार दिशांना जाऊन विभक्त होत होतीं. प्रेमाचे पुराणे पाश तोडतां तुटत नव्हते आणि गहन गुंते सोडतां सुटत नव्हते. त्यांत पुन्हां केशवसुतांना अकालींच जबाबदारीची जाणीव प्राप्त झाली होती. केशवसुतांच्या कांहीं कवितांत दुःखाचे जे उद्गार आढळतात, त्यांचा उगम त्यांच्या या हळुवार वृत्तींत आणि आपल्यावरील जबाबदारीच्या तीव्र जाणिवेंत आहे. शिवाय त्यांचा स्वभाव मनमोकळा नसल्यामुळें आप्तांत व त्यांच्यांत अपसमज निर्माण होत असावे व खटके उडत असावे असें वाटतें. केशवसुतांना मॅट्रिक व्हायलाच दोन वर्षें लागलीं. त्यांचे पाठचे बंधु मोरोपंत हे डेक्कन कॉलेजांत 'बी. ए.'त पोचले तेव्हां कुठें १८८९ सालीं केशवसुत मॅट्रिक झाले. त्यानंतर त्यांना कॉलेजचें शिक्षण घेतां आलें नाहीं. त्या काळच्या सामाजिक वहिवाटीला अनुसरून केशवसुतांचें लग्न यापूर्वीच वयाच्या चवदाव्या वर्षीं १८७४ सालीं झालें होतें. तेव्हां त्यांनीं बिऱ्हाड थाटावें असा वडिलांचा लकडा त्यांच्यामागें लागला. परंतु १८९२ सालीं वडील वारले तोंपर्यंत

केशवसुत मुंबईस एखाद्या मिशनस्कूलमध्यें, ज्ञानोदय कचेरींत अगर कमिसरिएट ऑफिसांत हंगामी नोकऱ्या करीत होते. वडील वारल्यावर मग त्यांनीं मुंबईस मोठ्या कष्टानें बिऱ्हाड केलें. पंचवीस-तीस रुपये महावारीच्या हंगामी नौकरींत केशवसुतांसारख्या तीव्र जाणिवेच्या मनुष्याची कुचंबणा झाली असल्यास नवल नाहीं. आपण आपल्या नातलगांना हातभार लावूं शकत नाहीं म्हणून ते मनांत कुढत असावेत. प्रेमळपणामुळें घराची त्यांना विलक्षण ओढ होती आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या स्वकीयांना अनुलक्षून पुढील उद्गार काढले असावेत :—

तातास या बघुनिया हृदयांत खातें,  
होऊन हें हृदय विव्हळ सर्व जातें !  
त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभें !  
तो सर्वदा जरि म्हणे मज पुत्र लोभें !  
मत्कारणें स्तवुनि देव, निजावयातें  
आलीस तूं खचित गे असशील माते !  
मोठे त्वदीय उपकार, जरा तरी ते  
जातील का फिटुनियां तव पुत्रहस्तें ?  
जन्मा येउनि मीं उगा शिणविलें आई ! तुला हाय गे !  
ताता ! भागविलें तुला फुकट मीं मत्पोषणीं हाय रे  
वार्धक्यीं सुख राहिलें, विसरणें तुम्हांस कोणीकडे !  
झालों कष्टद मात्र—या मम शिरीं कां वीज ती ना पडे ?  
बंधूंचींहि मला तशीं पवन हा आशीर्वचें आणितो,  
चिंताग्रस्त तदीय पाहुनि मुखां अश्रूंस मी गाळितों !  
भाऊ रे ! तुजलागिं लाविन कधीं मी हातभारा निज ?  
तूंतें सेवुनि मी सुखें मग कधीं घेईन कारे निज ?

केशवसुतांच्या ठिकाणीं सोंगढोंग नव्हतें. त्यामुळें त्यांचे हे आत्मपर उद्गारहि अंत:करणाचा ठाव घेतात. परंतु या उद्गारांत केशवसुतांच्या औदास्याचें मूळ आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. आपल्या ठिकाणच्या कमजोरपणाची आणि कमतरतेची त्यांना वारंवार जाणीव होत असे आणि ते उदास होत. त्यांना मधून मधून कुढेपणाचा पश्चात्तापहि होत असे; आणि म्हणूनच ते

किती घसरलों !--किती चुकुनि शब्द ते बोललों !  
करूनि भलतें किती पतित हंत हो जाहलों !  
स्वयें बहकुनी उगा स्वजनमानसें टोंचिलीं !—  
वृथा स्वजनलोचनीं अहह ! आंसवें आणिलीं !

असे दुःखाचे उद्गार आपल्या मुखावाटे बाहेर काढीत. केशवसुत घरवेडे ( Home-sick ) होते. घर सोडतांना प्रत्येक प्रसंगीं त्यांच्या डोळ्यांस पाणी येई. कोणीं साधा विरोध केला तरी देखील त्यांना वाईट वाटे. असे अश्रुपाताचे उल्लेख त्यांच्या अनुक्रमें ४, ८, १०, १५, ४२, ४९ व १०० या कवितांमध्यें आले आहेत. मात्र या अश्रूंचा उगम प्रेमाच्या पोटीं आहे. प्रेमाच्या पाशांत गुरफटलेले केशवसुत ज्यावेळीं त्याची महती

पाशांविण या कोठें कांहीं नाहीं, पाशांकरितां चाले अवघें कांहीं;
पाशांतुनि या सुटतां सुंदर तारे, तेज तयांचें विझुनि जाई सारें

या प्रत्यक्ष दिसणाऱ्या दृष्टांतानें वर्णन करतात, त्यावेळीं मनास अत्यंत आनंद होतो. परंतु ते जेव्हां

प्रीती या जगतांत कंटकयुता ही एक वल्ली असे,
शूलारोपणयूप त्यावरिल ही कीर्ति ध्वजा की दिसे;
तेव्हां या जगतीं नकोत मजला ते भोग भोगायला,
वाटे नाटक शोकसंकुल असें जीवित्व हें याजला

असें म्हणतात, तेव्हां मात्र केशवसुतांच्या मनाची ठेवणच मुळीं उदासीनतेची होती असें विधान करण्याशिवाय गत्यंतर राहात नाहीं. संतापानंतर अनुताप असतो, पण तो निर्मळ शांतीचा व समाधानाचा असतो. केशवसुतांच्या ' सतारीं ' त ती आत्मशांति व तें आत्मसमाधान आहे. वैतागलेल्या कवीच्या कानांवर ' दिडदा दिडदा ' असे सतारीचे स्वर पडतांच कवीचा संताप होतो. तो स्वतःचेंच वर्णन करतो :—

ऐकुनि ते मज जो त्वेष चढे, त्यासरशीं त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मीं हात हिसकला; पुटपुटलोंही अपशब्दांला
म्हटलें–आटप, आटप मूर्खा ! सतार फोडुनि टाकिसी न कां ?
पिरपिर कसली खुशालचंदा, करिसी दिडदा दिडदा दिडदा ?

परंतु पुढें त्याला ' धीर धरी रे धीरापोटीं, असतीं मोठीं फळें गोमटीं ' हा उपदेश पटतो आणि ' तम अल्प व द्युति बहु ' हा अनुभव येतो, त्यामुळें त्याचा ' अहं ' नाहींसा होतो, तो सारे भेद विसरतो आणि ' तों मज गमलें विभूति माझी, स्फुरत पसरली विश्वामाजी ' या अनुभूतीचा आनंद यथेच्छ घेतो व अंतीं ' शांतच वारे: शांतच तारे,' शांतच हृदयीं झालें सारें ! ' असें सांगतो. हा एक स्पृहणीय अपवाद वगळल्यास केशवसुतांच्या कोणत्याहि कवितेंत आत्मतृप्ति व तदनुषंगिक शांति व संतोष यांचें दर्शन घडत नाहीं. आप्तांना उद्देशून लिहिलेल्या प्रेममय कवितांतहि केशवसुत हिरमुसलेले व उदास दिसतात. याचें कारण त्यांचा कुढा व अबोल स्वभावच होय.

केशवसुतांनीं मुलींना उद्देशून 'निजलेल्या मुलीस' व 'फुलांची पखरण' या दोन उपदेशपर कविता लिहिल्या आहेत. त्यांतहि त्यांची दृष्टि विशुद्ध आनंदाची नाहीं. 'निजलेल्या मुलीस' ते म्हणतात कीं, 'तुझें कौमार्य संपून तूं संसारी झालीस कीं मग या जगांत तुझी दशा अनिश्चित होईल' आणि पुढें ते आपली शंका 'ज्या ह्या आज अजाणतेपण असें गालीं तुझ्या शोभतें, त्या गालीं कटु जाणतेपण पुढें ओढील ना नांगर!' या भयाकुल शब्दांनीं प्रकट करतात. त्याचप्रमाणें 'फुलांच्या पखरणीं'त ते म्हणतात कीं,

सकाळ जाइल संपून,
मग तापेल तें ऊन
मग धंदे कराल,
पण, फुलें हीं विसराल ?
सुख कैसें पावाल ?

तात्पर्य, केशवसुतांची मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टिच मुळीं निर्मळ व निरामय आनंदाची नव्हती.

– ४ –

१८९० ते १८९७ पर्यंत जवळ जवळ सात वर्षें केशवसुत मुंबईस होते. मुंबईसारख्या पहिल्या प्रतीच्या शहरांत जरी त्यांची आर्थिक स्थिति सुधारली नाहीं, तरी त्यांना वाचनाची सामुग्री मात्र भरपूर सांपडली. केशवसुत अमेरिकन मिशनच्या शाळेंत मास्तर होते कीं काय ठाऊक नाहीं, परंतु एमर्सन, एडगर पो, लॉंगफेलो इत्यादि अमेरिकन कवींवर त्यांचा बराच भर दिसतो. एमर्सन तर त्यांचा अत्यंत आवडता कवि होता. 'तुतारी'ची कल्पना आणि 'धार धरलिया प्यार जिवावर, रडतिल रडोत रांडा पोरें, गतशतकांचीं पापें घोरें, क्षाळायाला तुमचीं रुधिरें, पाहिजेत रे! स्रेण न व्हा तर' ही विचारसरणी त्यांना एमर्सनच्या Heroism मधील पुढील विचारांवरून सुचली असावी :—

we have a great many flutes and flageolets, but not often the sound of any fife. The violation of the laws of nature by our predecessors and our contemporaries are punished in us also. Unhappily, no man exists who has not in his own person become to some amount, a stock-holder in the sin, and so made himself liable to a share in the expiation.

केशवसुतांच्या कवितेंत गुलामगिरीच्या प्रथेविषयीं जो तिटकारा आढळतो, [कविता. अनु० १९ पहा] आणि मजुरांविषयीं व अस्पृश्यांविषयीं जो जिव्हाळा दृष्टीस पडतो त्याचा वारसा मिशनकडून बहुधा आला असावा. केशवसुतांच्या कवितेवर सुरुवातीपासूनच इंग्रजी कवितेची पकड होती, ती मुंबईच्या मुक्कामांत आणखी घट्ट बसली. केशवसुतांच्या कवितेंतील निसर्गासंबंधींची आत्मीयताहि अशीच इंग्रजी काव्याकडून आली आहे. एकांतप्रिय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ३६३८९ ........ दि: ..........
क्रमांक .......................... नों: दि: २२-२२

केशवसुत चिंतनशील बनले हें आपण मागेंच पाहिलें आहे. निसर्गाच्या सान्निध्यांत त्यांचें हें चिंतन शब्दांत साकार झालें. केशवसुत वारले त्यावेळीं 'मनोरंजन' च्या मित्रांना निरनिराळ्या कवींनीं जीं पत्रें पाठविलीं, त्यांत रेव्हरंड टिळक यांनीं २९-११-०५ रोजीं असें लिहून कळविलें कीं, 'कृष्णाजी केशव दामले यांच्या निधनाचें वर्तमान आपल्या पत्रावरून समजलें. फार वाईट वाटलें. माझ्या मतें आपल्यांतला वर्डस्वर्थ गेला.' श्री. रहाळकर यांनीं आपल्या ३-१२-०५ च्या पत्रांत लिहिलें की, 'आज आमच्या महाराष्ट्राचा Keats गेला!' परंतु बऱ्याच नंतर लिहिलेल्या 'केशवसुत कसले मेले!' या कवितेंत कै. गोविंदाग्रज म्हणतात त्याप्रमाणें आपल्या निसर्गविषयक कवितांत केशवसुत हे 'अवतरुनी फिरुनी शेले' असेच वाटतात. वर्डस्वर्थप्रमाणें केशवसुतांच्या निसर्गविषयक कवितांत सखोल व व्यापक तत्त्वज्ञान नाहीं, किंवा काव्यमय नीतिशिक्षणहि नाहीं. उलट शेलेप्रमाणें 'स्वतःची कटु जाणीव आणि तदनुषंगिक निःश्वास' मात्र आहेत. 'जेथें ओढे वनराजी' वृत्ती रमे तेथें माझी, कारण कांहीं साक्ष तिथें, मम त्या श्रेयाची पटते,' किंवा 'असे सुंदरता अढळ जरी कोठें, तरी करि ती सृष्टींत मात्र वास', असें केशवसुत सांगतात खरें; परंतु आपल्याच नादांत गुंग असणाऱ्या 'भृंगा' ला ते 'अस्मदीय हृदयीं ठरलें, की जग हें दुःखें भरलें! म्हणुनी सुंदरतेलाही, कुसें अम्हां दिसतीं पाहीं' —असा आपला कटु अनुभव निवेदन करतात. हाच अनुभव त्यांनीं अन्यत्र 'अमुचा पेला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा, पितां बुडाशीं गाळ दिसे, त्या अनुभव हें नांव असे' या शब्दांत, किंवा 'भोगांचीं अवशिष्टें तुसें, घशांत खुपतीं, लागे पिसें—' या चरणांत कथन केला आहे. 'पुष्पा'स पाहून त्यांना आपल्या निरागस, निष्कपट, निष्पाप, बाल्याची आठवण येते, त्यांना वाईट वाटतें, आणि ते स्वतःच्या वाढत्या वयाची आणि 'चिरतरुण' व 'चिररुचिर' फुलाची तुलना करूं लागतात, तों दोघांतलें जमीनअस्मानाचें अंतर त्यांच्या लक्षांत येतें. सुंदर फुलांच्या सान्निध्यांत केशवसुत 'स्वतः' ला विसरत नाहींत याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. त्यांच्या मनाची घडणच अशी कीं, त्या आनंदाच्या क्षणींहि त्यांना आपल्या कष्टमय जीवनाची जाणीव कायम राहते. 'काळोखाच्या जगामधें या, मृत आशांच्या चितांवरुनिया, पिशाच माझें भटकत आहे— शांति नसेचि तया' असें आपलें हार्दिक दुःख ते पुष्पास सांगतात. आणि 'भुंगे तुझें स्तोत्र सुरेख गातो,' तेव्हां 'ऐकूनि तें सर्व पळोत खंती' अशी आपली मनीषा प्रकट करतात. 'मृत आशांच्या चिते'ची ही कल्पना महत्त्वाकांक्षी व मनस्वी केशवसुतांच्या मनांत अगदीं आरंभापासून होती असें दिसतें. बालपणापासून कधीच त्यांच्या आशाआकांक्षा तृप्त झाल्या नाहींत. ते सदैव अस्वस्थ, त्रस्त व भ्रांतचित्तच राहिले. तेव्हां ते

तरी, स्वपथा जातात सोडुनीया,
कुणी तारे तेजस्वि फार व्हाया;
तधीं तेजाचा लोळ दिसे साचा,
परी अग्नी तो त्यांचिया चितेचा.

असे उद्गार काढतात, तें अगदीं स्वाभाविक आहे. केशवसुत आपलें 'एक खेडें' सोडून देशावर उगीच आले नव्हते. त्यांना आपल्या मुखांतून काव्याचा 'सरसवाङ्निष्यंद' प्रवाहित करावयाचा होता; आशेचीं, प्रेमाचीं आणि वीररसाचीं गाणीं गावयाचीं होतीं; आणि 'तुतारी' फुंकून आपल्या बांधवांना जागृति आणावयाची होती. केशवसुतांनीं ही आपली कामगिरी केली खरी, पण स्वतःच्या हयातींत त्यांना तिचा प्रभाव नजरेस पडला नाहीं आणि त्यामुळें ते हताश झाले. 'फुलपांखरां'वर केशवसुत कविता लिहितात, तीहि आपल्या 'खिन्न मना'ला तोष व्हावा म्हणून लिहितात. 'फुलपांखरां'ला पाहूनहि त्यांना तीच आपल्या दुःखमय जीवनाची जाणीव होते. ते म्हणतात कीं, 'तिमिरीं आम्हीं नित्य रखडणें' विवंचनांतचि जिणें कंठणें,' पण या फुलपांखराला मात्र 'उद्यां' चा विचार नाहीं कीं ग्रीष्माचा कडकपणा याला सतावत नाही, 'आज' आणि 'उद्यां' यांचा विचार आम्ही करतों, 'आम्ही तिमिरांतून येतों आणि तिमिरांत जातों,' 'आम्ही सुंदरतेंत कुसें पाहतों' इत्यादि केशवसुतांच्या विचारांवर शेलेच्या

We look behind and after
And pine for what is not
Our sincerest laughter
With some pain is fraught
our sweetest songs are those that tell of saddest thought !

या सर्वश्रुत पद्यपंक्तींची छाया पडलेली आहे हें उघड आहे. हे विचार व्यक्त करतांना केशवसुतांनीं, अंधार, तिमिर, चिंता, खंती इत्यादि त्यांच्या आवडीचे शेलके शब्द वापरले आहेत. यांपैकीं 'खंती' हा शब्द तर पुढें अनेक लेखकानीं आपल्या लेखांत वापरला आहे. 'वातचक्रां' तहि केशवसुत त्रासलेले दिसतात.

मींहि कशाला येथ रहावें? काय असे ज्या मीं चिकटावें?
जगद्रुमाचें पिकलें पर्ण, गलित असें मी अगदीं जीर्ण

असे त्रागयाचे उद्गार ते काढतात. तेव्हां विशिष्ट प्रकारच्या उदासीन मनोरचनेमुळें निसर्गाच्या सान्निध्यांतहि केशवसुतांना विशुद्ध आनंद होत नसे, असा निष्कर्ष काढल्यास तो चूक ठरेल का? केशवसुतांच्या 'झपूर्झा', 'सतारीचे बोल', 'म्हातारी,' कोणीकडून ग कोणीकडे?' व 'हरपलें श्रेय' या पांच कविता तात्त्विक आहेत. यांपैकी पहिल्या दोन कविता अपवादभूत म्हणून सोडल्यास बाकीच्या तिन्ही कवितांत केशवसुतांची वृत्ति औदास्याचीच आहे 'सतारीं'त अभेदाच्या जाणिवेने 'अणूहूनी थोकडा, तुका ब्रह्मांडाएवढा' ही संतप्रणीत अनुभूति कशी आली त्यासंबंधींचें विवेचन आहे तें मागें आलेंच आहे. 'झपूर्झा'मध्यें अविकृत मनःस्थितींतील अनुभवानंदाचें वर्णन आहे. 'सूर्य चंद्र आणिक तारे, नाचत

सारे, हे प्रेमभरें, खुडित खपुष्पें फिरति जिथें, '--अशा त्या तिथें तुम्हांला जर जावयाचें असेल तर ' धरा जरा निःसंगपणा ' असें त्यांस कवीनें स्पष्ट सांगितलें आहे. ' कोणीकडून ? कोणी-कडे ? ' मात्र केशवसुतांनीं ' मागें पुढें न कांहीं दिसे, संतत डोहीं नौका फसे, गोत्यांत अशा आलों कुठून ? कोठें जाइन कैसा सुटून ? – मग वदे हरे राम रे, करावें कसें ' – असें आपल्या ' भ्रांत मनःस्थिती'चेंच चित्र काढलें आहे; आणि इहलोकांतील ऋण फेडून पुन्हां आपल्याला आपल्या ' खऱ्या घरीं ' परत जावयाचें आहे असें जुन्या वेदांत्यांचें उत्तर दिलें आहे. ' म्हातारी ' व ' हरपलें श्रेय ' यांतहि कांहींसा हाच विचार मांडला आहे. आपल्याला व्यक्तांतून अव्यक्तांत किंवा अपरोक्षांतून परोक्षांत जावयाचें आहे, आपल्याला येथें चुकल्याचुकल्या-सारखें वाटत आहे, कारण जें आपल्या हक्काचें आहे तें हरपलें आहे, तें कुणींतरी आपल्या-पासून हिसकून घेतलें आहे; ' उदात्त बुद्धीला संसारांत राम नाहीं. कारण तिच्या हक्काचें जें असतें त्यासाठीं तिला झुरावें लागतें,' असा स्पष्टीकरणात्मक खुलासा स्वतः केशवसुतांनीं या कवितेवर केला आहे. केशवसुतांच्या या कवितेवर जशी वर्डस्वर्थच्या ' Intimations of Immortality from Recollections of Childhood' या कवितेची छाया आहे, तशीच एमर्सनच्या Immortality या निबंधाची छाया आहे. एमर्सननें वृद्धावस्थेंतील वर्डस्वर्थची मुद्दाम भेट घेतली होती. त्याच्या या निबंधांत वर्डस्वर्थच्या कवितेमधील विचारांची बरीचशी उजळणी झाली आहे. शिवाय त्यानें या निबंधांत नचिकेता व यमधर्म यांची उपनिषदांतील सर्वप्रसिद्ध कथा सांगितली आहे. वर्डस्वर्थच्या कवितेचें सूत्र एका टीकाकारानें सूत्रबद्ध करून परंतु सुस्पष्ट रीतीनें सांगितलें आहे. तें असें:—

'The poet in manhood seeks to base his belief in the future life on the recollections of the thoughts that came to him as a boy.'

वर्डस्वर्थला ही कविता कोलरिजच्या लहान सहा वर्षांच्या मुलाला पाहून स्फुरली हें प्रसिद्ध आहेच. लहान बालकाप्रमाणें निरागस, अनघ व अव्याज दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां बालपणां-तील विशुद्ध व निरामय आनंद हाच खरा स्वर्गीय. इहलोकांत आपण त्याच्यापासून दुरावतों. वर्डस्वर्थच्या The glory and the freshness of a dream या कवितेंतील

It is not now as it hath been of yore ;—
Whither is fled the visionary gleam ?
Where is it now the glory and the dream ?
Heaven lies around us in our infancy.

या ओळींत तोच संकेत आहे. केशवसुतांना ' हरपलेल्या श्रेयां 'त तेंच सांगावयाचें आहे. परंतु वर्डस्वर्थच्या कवितेचा शेवट जसा निश्चित व निश्चिंत आहे., तसा तो केशवसुतांच्या कवितेचा नाहीं. केशवसुतांच्या कवितेंत ' तळमळ तळमळ ' बाकी आहे, जीव पांखडण्याचें

थांबलेलें नाहीं. वर्डस्वर्थच्या कवितेच्या शेवटल्या भागाचें सार एका टीकाकारानें थोडक्यांत सांगितलें आहे :—

The glory of the setting Sun is the glory of our lives if we have lived righteously in the eye of God. When the sun of our life sets, it will rise again in the other world that endures for ever and is known to us as heaven. केशवसुतांना 'दीपशिखेवरि पतंग तो, प्रेमें प्राणाहुति देतो' ही कल्पना एमर्सनच्या 'There are thoughts beyond the reaches of our souls. We are not less drawn to them. The moth flies to the flames of lamp'. या विचारावरून सुचली असावी. वर्ड्स्वर्थला पारलौकिक विचार आठवतात आणि तो चिंतनशील बनतो खरा, पण तो 'संसृतिविमुख' होत नाहीं; केशवसुत तसे होतात, हा दोघांत फरक आहे.

बाल्य व स्वर्ग या दोन वस्तु अव्याज आनंदाच्या प्रतीक मानून केशवसुतांनीं आपल्या अनेक कवितांत त्यांचे गोडवे गाइले आहेत. परंतु ते गातांना ते स्वतःचा प्रौढपणा आणि इहलोकांतील दुःखें यांची जाणीव कायम ठेवतात, हें बरोबर वाटत नाहीं. कारण, त्यामुळें त्या कल्पनांपासून निर्भेळ अशा अनिर्वचनीय आल्हादाची प्राप्ति होत नाहीं. 'म्हातारी' ला पाहून त्यांची 'वत्सला' तिला धरण्यासाठीं खेळूं खिदळूं लागते. तिच्याबरोबर केशवसुत तन्मय होत नाहींत. आपल्या चित्तावरचें 'संसृतीचें दडपण' निघालें असें ते सांगतात खरें, परंतु लगेच असें गाऱ्हाणें करतातः—

"थांब, थांब! जाशी अशी कां? फिर ये गे मजशीं;
वयस्कता माझी म्हणुन जर करिसी इतराजी,
तर माझी सोनी पाहुनी, ये गे परतोनी!
मज वय विसरूं दे, मुग्ध–मधु–बाल्यीं उतरूं दे!
ते दिन पुष्पांचे, कोंवळ्या किरणीं खेळाचे!
हे दिन–हाय!–
हे दिन चिंतांचे परंतू लटिकें हसण्याचे."

'The lover of Nature is he who has retained the spirit of infancy even in the era of manhood' असें एमर्सन म्हणतो, त्याचप्रमाणें 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे' असें केशवसुतहि म्हणतात खरें; परंतु प्रत्यक्ष त्यांना तें जोपासतां येत नाहीं असें 'म्हातारी' वरून दिसतें. अनुक्रमांक ४३, ६०, ६५, १००, ११७ व १३१ या कवितांत केशवसुतांची बाल्याविषयींची आवड व्यक्त झाली आहे. स्वर्गाविषयींची कल्पना अनुक्रमांक १४, १९, ३६, ४१, ४३, ४६, ४८, ५१, ५९,

६३, ६५, ६६, ६७, ६८, ७६, ७९, ८८, ९१, ९३, ९८, १००, ११२, ११३, ११७, ११८, १२६, १२९ व १३१ या कवितांत कोणत्या तरी स्वरूपांत आली आहे. कोणताहि पवित्र, उदार, उदात्त व आल्हादक विचार आत्यंतिकतेनें व्यक्त करण्यासाठीं केशवसुतांनीं ‘स्वर्ग’ या प्रतीकाचा उपयोग केला आहे. कवीच्या महतीचें वर्णन करतांना त्यांनीं —

राही तो तर देव भूमिवरतीं येतात हिंडावया
जातां, स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागिं धुंडावया

असा त्याचा उपयोग केला आहे, तर स्वतःच्या अनुभूतीचें वर्णन करतांना ‘स्वर्ग धरेला चुंबायाला; खालीं लवला, भजला गमला’ असा त्याचा उपयोग केला आहे; आणि ‘क्षणिक आभास’ शब्दांत साकार करतां येत नाहींत असें सांगतांना —

हा ! हा ! हे जर भास सर्व धरतां येतील मातें, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर

असा त्याचा उपयोग केला आहे. ‘बाल्या’च्या कल्पनेपेक्षां ‘स्वर्गा’च्या कल्पनेंत केशवसुत विशेष रमत असें वाटतें. कारण ती कल्पना व्यक्त करतांना त्यांनीं क्वचितच दुःखाचा उद्गार काढला आहे.

—५—

चिर-सुंदर व चिर-तरुण निसर्ग, दूरावलेलें बाल्य आणि कल्पनेंतला स्वर्ग यांपासून निर्माण होणाऱ्या केशवसुतांच्या कवितेंतील नैराश्याचें स्वरूप त्यांच्या ‘कोणीकडून गड कोणीकडे’ व ‘हरपलें श्रेय’ या तात्त्विक कवितांपासून निर्माण होणाऱ्या नैराश्यापेक्षां निराळें आहे. काल्पनिक नैराश्यांत केवळ रम्य हुरहूर आहे. पण तात्त्विक नैराश्यांत उत्कट तळमळ आहे. केशवसुतांनीं आपल्याकडील संत—साहित्याचा फारसा परिचय — परामर्श करून घेतला नव्हता. फारसा म्हणण्याचें कारण असें कीं, ‘तत्त्वतः बघतां नामावेगळा’, ‘तुझें नाम मुखीं’, किंवा ‘सतारीचे बोल’ अशा कांहीं कांहीं कवितांवरून त्यांचीं, ‘ग्यानबा तुकोबां’च्या वाङ्मयाशीं थोडीफार तोंडओळख असावी असें वाटतें. ‘हरपलें श्रेया’मधील कल्पना तर त्यांना उघडउघड वर्ड्स्वर्थ व एमर्सन यांच्याकडून स्फुरली आहे. एमर्सननें उपनिषदें-वेदादि पौरस्त्य साहित्याचा आस्वाद भाषांतरांच्या माध्यमानें घेतला होता. वर्ड्स्वर्थनेंहि आपल्या Ode मध्यें पुनर्जन्माच्या पौरस्त्य कल्पनेचा उपयोग केला आहे. तिच्यासंबंधीं एक टीकाकार लिहितो —

‘But we are to remember that the poet never asserts as a fact that he believes in a past existence. The idea is a very old one and is

a feature of some religions, such as Buddhism, and the poet suggests it for a poetic purpose.'

केशवसुतांनीं आपल्या तत्त्वज्ञानाचा अथवा संत–साहित्याचा प्रत्यक्ष आस्वाद घेतला असता, तर त्यांच्या 'आत्मिक तळमळी'ची परिणति शांतींत व तुष्टींत झाली असती. 'सतारीच्या बोलां'त 'जड तें खोटें हें मात्र कसें, तें न कळे; मज जडलेंच पिसें, काय करावें, कोठें जावें, तुमजे मजला कीं विष खावें!'– अशी त्यांची स्थिति झाली खरी, परंतु 'अखिल भेदां'चा विसर पडतांच म्हणजेच 'अद्वया'चा प्रत्यय येतांच 'शांतच हृदयीं झालें सारें' असा तिचा समाधानाचा शेवट झाला.

बाल्य व स्वर्ग या कल्पनांच्या जोडीलाच केशवसुतांच्या काव्यांत 'वेडेपणा'ची एक चमत्कारिक कल्पना जागजागीं दृष्टीस पडते. या विलक्षण कल्पनेचें मूळहि त्यांच्या इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनांत असावें. Poets are mad आणि Poets are born; they are not made हीं इंग्रजी वचनें सर्वश्रुत आहेतच. याच वचनांच्या जोडीला The true poem is the poet's mind या एमर्सनच्या सिद्धांताचा केशवसुतांच्या मनावर पगडा बसला असावा असें वाटतें. एमर्सनच्या Poetry आणि Imagination या निबंधांतील काव्यविषयक विचार केशवसुतांनी चांगलेच आत्मसात् केले होते. 'Great wits to madness nearly are allied. Both serve to make our poverty our pride.', किंवा ॲरिस्टॉटल-प्रणीत 'No great genius was, ever without some mixture of madness, nor can anything grand or superior to the voice of common mortals be spoken except by the agitated soul' आदि विचार त्यांना एमर्सनकडून प्राप्त झाले होते.

काव्याचा आस्वाद व आनंद कळावयाचा असेल तर 'थोडे वेडे व्हा वेडे' असें केशवसुतांचे मित्र कै. प्रि. वा. ब. पटवर्धन यांनींहि मनोरंजनांत एक लेख लिहून म्हटलें आहे. ही कल्पना त्याकाळीं अनेक साहित्यसेवकांना प्रिय होती असें दिसतें. केशवसुतांनीं तर तिचा अतिरेक केला आहे. त्यांनी एके ठिकाणीं 'आम्ही कवि काव्यदेवतेचीं भ्रमिष्ट मुलें आहोंत आणि निर्जीवांतला जीव पाहण्यासाठी आम्ही जन्मास आलों आहोंत' असे उद्‌गार काढले आहेत; तर दुसऱ्या ठिकाणीं 'व्यर्थीं अधिकचि अर्थ वसे, तो त्यास दिसे, ज्यां म्हणति पिसे' असा सिद्धांत शब्दांत मांडला आहे. एकदां कवीला 'विचित्र पुतळा' म्हटलें आहे, तर दुसऱ्यांदां 'मी एकला फिरतसें बहुवार रानीं, यालागुनी न समजा मजला अडाणी' असा त्याच्या तोंडानें समजुतीचा इशारा वदवला आहे. आणखी एका कवितेंत तर 'डोक्याच्या भ्रमणां'चा व 'विक्षिप्तपणा'चा उल्लेख केला आहे. 'वेडा' हा शब्द केशवसुतांनीं 'काव्यविषयक

तादात्म्या'चा द्योतक म्हणून प्रयुक्त केला खरा; पण पुढें तो शब्द वापरून अनेकांनीं स्वतःचें हसें करून घेतलें.

– ६ –

१८९७ च्या सुमारास केशवसुत मुंबई सोडून खानदेशांत फैजपूर, भडगांव यांसारख्या आडवळणांच्या गांवीं गेल्यावर त्यांना ग्रंथसंग्रह दुर्मिळ झाला. तो विकत घेण्याइतपत त्यांची ऐपत नव्हती; आणि त्यामुळें ' कविता हीच सुंदरी आहे, तिनें आपणांस वेडा केलें आहे ' या एकाच विषयावर त्यांनीं ' रुष्ट सुंदरीस,' ' सुंदरीदर्शन ', ' मनोहारिणी ', ' वियोगामुळें ', ' वियुक्ताचा उद्गार ', ' स्मरण आणि उत्कंठा ', व ' फिर्याद ' या कविता लिहिल्या. अशरीरिणी कवितेस मानवी रूप देऊन तिच्यासाठीं झुरावयाचें हा प्रकार अद्भुतरम्य खरा. हाच प्रकार चंद्रशेखर व दत्त यांच्या काव्यांतहि आढळतो. परंतु ती अप्रसन्न आहे अशा भावनेनें स्वतःच्या मनाला टोंचणी लावून घ्यावयाची हा प्रकार मात्र उचित वाटत नाहीं. केशवसुतांच्या कवितेंत निराशेची जी छटा दिसते तिचें कारण त्यांनीं मुद्दाम आपण होऊन उत्पन्न करून घेतलेलें हें एक काल्पनिक दुःख आहे.

कवि, त्याचा अधिकार, त्याचें विश्व, त्याचें कवित्व, त्या कवित्वाचें महत्त्व, यांसंबंधीं केशवसुतांचे विचार जितके मौलिक व अभिनव तितकेच उदार व उदात्त आहेत. 'सृष्टि आणि कवि,' ' कविता आणि कवि,' 'पटवर्धन यांस,' 'कवितेचें प्रयोजन,' 'भृंग,' 'कवि,' 'शब्दांनो ! मागुते या,' 'धूमकेतु आणि महाकवि,' 'सृष्टि आणि कवि,' 'काव्य कोणाचें ?'' 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास,' 'आम्ही कोण ?' इत्यादि कवितांतून ते इतस्ततः विखुरलेले आहेत. केशवसुतांच्या विचारांत, आचारांत आणि उच्चारांत विसंगति नव्हती. ते महत्त्वाकांक्षी होते. त्यांच्या ठिकाणीं पराकाष्ठेची चिकाटी आणि तीव्र बुद्धिमत्ता वास करीत होती. ते खेड्यांतच राहिले असते तर मग मात्र त्यांचे—

तरी नसतों मी दरिद्री धनानें
तरी नसतों मी क्षुद्र शिक्षणानें
तरी होतीं तीं स्वर्गसुखें थोडीं
तरी नसती कीर्तिची मला चाडी

हे उद्गार सार्थ ठरले असते, आणि त्यांच्या ' लहान्या गरजा ' त्या खेड्यांतच सहजगत्या भागून गेल्या असत्या. परंतु मागें सांगितलें त्याप्रमाणें ते ' स्वपथ सोडून फार तेजस्वी होण्याला निघालेले तारे ' होते. त्यांना काव्याचा ' सरसवाङ्‌निष्यंद ' चोहों बाजूंस वाहावावयाचा होता, त्यांना ' पुढल्या पिढीचे साक्षी ' व्हावयाचें होतें ; आणि आज ते तसे झालेहि आहेत. परंतु त्यांना जिवंतपणीं कीर्तीचा लाभ झाला नाहीं. केशवसुत चारचौघांसारखे मानवच होते.

तेव्हां त्यांना लोकेषणा असल्यास नवल तें काय ? पटवर्धन व आपटे यांना उद्देशून त्यांनीं ज्या कविता लिहिल्या आहेत, त्यांत त्यांनीं कीर्तीचा लाभ व्हावा अशी इच्छा प्रकट केली आहे. तेव्हां त्यांना ती असणें साहजिकच होतें. कारण, त्यांनीं आपलें सारें जीवन कवितेस समर्पण केलें होतें. कवितेच्या निदिध्यासांत त्यांचें संसाराकडेहि दुर्लक्ष होई. 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास ' या कवितेंत त्यांनी स्वतःस 'आत्माराम ' म्हटलें असून 'संसारा 'स 'अक्काबाई ' म्हटलें आहे. तिच्या फेऱ्यांत आपल्या काव्यसमाधीचा भंग कसा होतो याचें सुंदर शब्दचित्र त्यांनीं त्या कवितेंत रेखाटलें आहे. कवितेच्या निदिध्यासांत केशवसुतांचें वर्तनहि एखाद्या वेळीं एखाद्या विदेही आत्म्याला शोभावें असें होत असावें असें वाटतें. कारण १९०५ 'सालअखेर-' मध्यें काव्यरत्नावलीकार लिहितात कीं, 'त्यांची वृत्ति व्यवहारी दृष्टीनें विचित्र व विक्षिप्त असे, आणि याच योगानें कित्येक त्यांना वेडसर समजत, परंतु मूळची त्यांची वृत्ति तशी नव्हती, हें आम्ही स्वानुभवानें सांगतों. दोन तीन वेळ त्यांचा आमचा भेटीचा प्रसंग आला. पण त्यांच्यांत संकोचवृत्तीशिवाय आम्हांस दुसरें कांहीं आढळून आलें नाहीं. धारवाडास जातांना तुम्हीं आमचेकडे मंडळीसुद्धां एक दिवस उतरावें म्हणून आम्हीं त्यांस विनंती केली, पण केवळ संकोची वृत्तीनें त्यांनीं ती अमान्य केली.' केशवसुतांच्या या संकोची वृत्तीचें चित्र त्यांचे मित्र सुप्रसिद्ध कवि विनायक यांनीं मनोरंजनाला ४-१२-५० ला पाठविलेल्या पत्रांत पुढीलप्रमाणें चितारलें आहे :- 'केशवसुताची राहणी साधी, वर्तन पवित्र, विचार काव्यमय आणि भाषणशैली मनोवेधक होती. तो बोलतांना नेहमीं खालीं पाहून बोले ; तथापि केव्हां केव्हां तो मान वर करून पाही, तेव्हां त्याचे पाणीदार !- हें पाणी खरोखर अलौकिक होतें - डोळे श्रोत्यांच्या हृदयाचा वेध घेऊन टाकीत.' केशवसुतांचे बंधु कै. सीतारामपंत यांनीं आपल्या भावाच्या या वृत्तीचें वर्णन करतांना—

"संसारीं या क्षणभरि न तें लक्ष त्याचें कधींही—
गेलें, योग्यापरि सतत तो मुक्त जैसा विदेही"

असे उद्गार काढले आहेत [पाहा. का. र. फेब्रु. १९०६]. केशवसुतांचे परिचित श्री. वा. वा. गर्दे यांनीं केशवसुतांच्या या 'वर्तना 'चें वर्णन अशा प्रकारें केलें आहे :—

संसारीं त्वां पथिक जनसें केधवां आचरावें
केव्हां त्वां बा ! निजमनिं जगत्संशयें भ्रांत व्हावें
या वृत्तीचें तव सुकवनीं गूढ बा ! व्यक्त झालें
त्वत्पद्यांनों परिचित कवी-मर्म जाणोनि धाले. [पाहा. मनो. पु. ११ भा. ७.]

केशवसुतांना कवितेचा कसा निदिध्यास होता हें यावरून स्पष्ट होईल. परंतु या निदिध्यासांतून त्यांनीं निर्माण केलेल्या कवितेचें चारदोन मित्रांपलीकडे कुणीं फारसें कौतुक

त्यांच्या हयातींत केलें नाहीं. त्यांच्या कुटुंबीयांनाहि या नादानें त्यांनीं संसाराकडे दुर्लक्ष करावें हें पसंत नव्हतें. टीकाकारांकडूनहि खासगी रीत्या त्यांच्या कवितेवर टीका होत असावी असें दिसतें. त्यामुळें साहजिक अगोदरच विषण्ण असणारी केशवसुतांची वृत्ति अधिक विषण्ण झाली असावी असें वाटतें.

– ७ –

कै. हरिभाऊ आपटे व कै. प्रि. वासुदेवराव पटवर्धन हे दोघेहि मर्मज्ञ व रसज्ञ केशवसुतांच्या कवितेचे चाहते व भोक्ते! या दोघांच्याहि रसिकतेवर व वाङ्मयीन गुणांवर स्वतः केशवसुतांनीं कविता रचलेल्या! केशवसुतांच्या पश्चात् १९१७ मध्यें प्रथम हरिभाऊंनीं त्यांची समग्र कविता पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून आपलें मित्रऋण फेडलें. परंतु या आवृत्तीवर केशवसुतांचें संपूर्ण नांवहि नाहीं! मग कवितांचें रसिकावलोकन तर दूरच राहिलें. याच सुमारास हरिभाऊंनीं रवींद्रनाथांच्या गीतांजलीला मराठी पेहेराव चढवला होता आणि त्याला कवीचें चरित्र व काव्याचें आलोचन यांची जोड दिली होती, त्याप्रमाणें त्यांनीं ती केशवसुतांच्या कवितासंग्रहास कां दिली नाहीं याबद्दल कै. डॉ. गुणे यांनींहि आश्चर्य प्रगट केलें आहे [ पाहा. मनो. पु. २३. भा. ४ ]. केशवसुतांच्या कवितेची दुसरी आवृत्ति कै. सीतारामपंत दामले यांनीं जून १९२१ मध्यें काढली. तिला डे. व्ह. ट्रा. सोसायटीनें ६५० रुपयांचें बक्षीस दिलें होतें. तेव्हां वासुदेवराव पटवर्धन हे एक परीक्षक होते. त्यांनी दिलेला अभिप्राय असा आहे :— ' स्वतंत्र स्फूर्तीचीं स्पष्ट लक्षणें, अंतर्भेदी प्रतिभा, वाणी काव्यस्फूर्तीला अनुरूप, रसपरिपोषास अनुकूल. भाषेचे व काव्याचे दोष नाहींत असें नाहीं. कवितेंत वैचित्र्य आहे, स्वातंत्र्य आहे, ओज आहे, जोर आहे, आत्मप्रत्यय आहे, आषकाचें वेड आहे, देशभक्तांचा कळवळा आहे, स्वयंस्फूर्तीचा विलास आहे, तत्त्वान्वेषाची भेदकता आहे, वागर्थांची संयुक्तता आहे. ' [ पाहा रत्ना. जाने. २६ ]. हरिभाऊ आणि वासुदेवराव हे केशवसुतांच्या मागें जवळपास १५ व २० वर्षें विद्यमान होते. परंतु यापलीकडे आपल्या या आवडत्या कवीसंबंधीं त्यांनीं एकहि ओळ लिहिलेली नाहीं, असें कां? या दोघांखेरीज इतरहि अनेक रसिक केशवसुतांच्या कवितेचे भोक्ते होते.

केशवसुतांच्या हयातींतच श्री. रहाळकर यांनीं त्यांना उद्देशून लिहिलेली कविता नोव्हें. १९०२ च्या मनोरंजनांत आली होती. कै. काशीताई हेरलेकर या त्यावेळीं ' सुवासिनी ' या नांवानें कविता लिहीत. त्यांच्या केशवसुतांविषयींच्या आदरासंबंधीं पूर्वी एकदां लिहिलेंच आहे. १८९८ च्या मनोरंजनाच्या एप्रिल व मेच्या जोड अंकांत ' अलीकडील कवींत आमचे बंधु दामले यांचा नंबर वर आहे. ' अशी कै. मित्र यांनीं त्यांची स्तुति केली आहे. कै. दत्तांनीं ' अर्वाचीन कविते'साठीं केशवसुतांची कविता घेतली होती [ पहा सुविचारसमागम. मार्च १८९९ ]. कै. चंद्रशेखरांनीं केशवसुत वारले त्यावेळीं कै. मित्रांना धाडलेल्या आपल्या

३–१२–१९०५ च्या पत्रांत " मनोरंजन "चा डिसेंबरचा अंक आला व त्याचें पहिलें पान उघडून पाहतांच काळ्या रेघांची चौकट दिसली. काय आहे म्हणून पाहिलें तों केशवसुतांचा मृत्यु. शिव ! शिव ! अर्वाचीन कवींतला एक चांगला कवि काळानें गिळंकृत केला ! फार वाईट झालें !" असा, आपला आदर व्यक्त केला होता. तात्पर्य, केशवसुतांच्या कवितेला रसिक नव्हते असें नाहीं. परंतु तो काळच मुळीं साहित्याला अनुकूल नव्हता. चारदोघां आस्थेवाईक रसिकांखेरीज त्या काळीं साहित्याची फारशी बूज नव्हती.

केशवसुतांच्या ' अशी असावी कविता फिरून, तशी नसावी कविता म्हणून ' किंवा ' त्याला मान नसे, नसो; पण अतां त्याची अपेक्षा नसे, हें कोणी म्हणतां विषाद अहिसा मन्मानसाला डसे ! ' अथवा 'ज्याला मी मुकलों विषाद मजला याचा मुळींही नसे, जें पृथ्वीवर आणिलें जन तया धिक्कारिती हा ! कसे ! ' या उद्गारांवरून त्यांच्या कवितांवर टीका होत असावी आणि ती त्यांना विव्हल करीत असावी असें दिसतें. ' कविता आणि कवि ' ही तरुणवयांतील बेपर्वाईची कविता केशवसुतांनीं कै. वामन दाजी ओक यांना अनुलक्षून लिहिली आहे कीं काय, कांहीं कळत नाहीं. ओकांची आणि केशवसुतांची नागपूरच्या मुक्कामांत कदाचित् गांठहि पडली असावी. त्याकाळीं कै. हरि माधव पंडित आणि वामनराव ओक यांच्या हातीं ' विविध–ज्ञान–विस्तारा 'चीं संपादकीय सूत्रें होतीं. हे दोघेहि मोठे काव्यमर्मज्ञ व रसिक होते. यावेळीं नागपुरास विद्यार्थी असलेल्या पटवर्धनांनीं पुढें ' कै. हरि माधव पंडित यांचा मृत्यु ' या आपल्या कवितेंत या दोघांना ' काव्याचे कलेजे व कंद ' म्हणून संबोधलें आहे [ पाहा. अभिनवकाव्यमाला भाग ३ रा. कवि ' वसंत ' ]. ओक हे काव्यपरीक्षणाच्या बाबतींत मोठे विचक्षण होते. कै. माधवानुजांची त्यांच्यावर एक कविता आहे. कै. रेव्हरंड टिळक हेहि ओकांना मान देत. कवीनें आपल्या नांवानें आपली कविता प्रसिद्ध करूं नये; कारण नामनिर्देशानें कवीच्या व त्याच्या काव्याची किंमत कमी होते असें त्यांचें मत होतें [ पाहा; टिळकांची कविता. बालोद्यान पृ. ९७ ]. ' कविता आणि कवि ' या अगदीं साध्या व सरळ कवितेंत केशवसुतांनीं मध्येंच ' **स्वभावभूयिष्ठ** जिच्यांत माधुरी, अशी तुम्हांला कविता रुचे जरी ' असा एक अगडबंब शब्द वापरला आहे. हा शब्द ओकांचा आवडता होता. कारण १८८५ च्या विविधज्ञानविस्ताराच्या एप्रिल, मे, जून, जुलैच्या जोड अंकांत कै. कीर्तिकरांच्या ' इंदिरा ' काव्याचें परीक्षण करतांना त्यांनीं तो वापरला आहे. केशवसुतांच्या ' शब्दांनो ! मागुते या ! ' या कवितेंतील ' नूतन ' हा शब्द कै. तात्यासाहेब केळकर यांना चिंत्य वाटत होता. पण तो १८८२ सालीं प्रसिद्ध झालेल्या ' कपोतचरित्रां 'त असीरकर नांवाच्या कवीनीं आणि ' कन्या ' या आपल्या कवितेंत ओकांनीं योजिला आहे. ओकांची कविता ' अर्वाचीन मराठी कवितें'त आहे. १८८५ च्या सुमारासच केशवसुतांनीं कवितालेखनास प्रारंभ केला. तेव्हां विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध होणारी महाजनि, कीर्तिकर, मोगरे इत्यादिकांचीं काव्यें त्यांच्या दृष्टीसमोर होतीं यांत शंका नाहीं. इंग्रजी कवितांचीं रूपांतरें करण्याची स्फूर्ति त्यांना

महाजनींचीं तसलीं रूपांतरें वाचून झाली असावी. ‘ गांवीं गेलेल्या मित्राची खोली ’ अणि ‘ भृंग ’ यांवर अनुक्रमें ‘ जलधरमाला वृत्ताच्या चालीवर ’ आणि ‘ मणिबंधाच्या चालीवर ’ असे जे निर्देश आहेत, ते केशवसुतांनीं उघड उघड कीर्तिकरांच्या ‘ इंदिरे ’वरून घेतले आहेत. आपल्या कवितांना विविधज्ञानविस्तारांत स्थान मिळावें असें केशवसुतांना वाटत असे, आणि त्यांत खरोखर वावगें असें कांहींहि नव्हतें. मोगऱ्यांचीं स्फूर्तिहीन काव्यें त्यांत प्रसिद्धि पावतात, तर मग आपलीं उत्स्फूर्त काव्यें त्यांत कां येऊं नयेत अशी त्यांची शंका असे, असें कै. सी. के. दामले यांनीं त्यांच्या चरित्रांत नमूद केलें आहे. तेव्हां केशवसुतांच्या विषण्णतेचें कारण त्यांच्या कवितांची बूज कांहीं जणांकडून झाली नाहीं हेंहि असणें शक्य आहे. ‘दुर्मुखलेला’ या आपल्या कवितेंत केशवसुतांनीं ‘ विद्यासंस्कृत ’ या प्रयोगानें जसा कै. वामनराव आपट्यांना टोसणा दिला आहे, तसाच तो ‘ स्वभावभूयिष्ठ ’ या प्रयोगानें कै. वामनराव ओकांना हाणला असावा असा माझा अंदाज आहे.

केशवसुतांच्या कवितेंत काव्यदोष व भाषादोष आहेत असें वासुदेवराव पटवर्धनांनीं नमूद केलेंच आहे. तेव्हां त्यांवर टीका झाल्यास वस्तुतः विषाद वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु प्रतिकूल टीका कुणास प्रिय असते ? तेव्हां केशवसुतांना तिच्यामुळें वाईट वाटणें स्वाभाविक होतें. केशवसुतांना इंग्रजी कवितांची ओढ पराकाष्ठेची होती. त्यांनीं त्यांतील भाव, विचार व कल्पना मराठींत मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु तो काळ साहित्याच्या क्षेत्रांत संक्रमणाच्या स्वरूपाचा असल्यामुळें त्यांना बेमालूम रूपांतरें साधलीं नाहींत. ‘ Doth then the world go thus, doth all thus move ? ’ या Drummond च्या कवितेचें त्यांनीं ‘ जायाचें जग कां असेंच ? सगळें ऐसेंच कां चालणें ? ’ असें रूपांतर केलें आहे. वास्तविक त्यांतील भावार्थ ‘ जगाची ही राहाटी अशीच राहाणार कीं काय ’ असा आहे. याच कवितेच्या शेवटच्या श्लोकांत त्यांनीं ‘ बा साधु आणीक असाधु यांचें, समप्रकर्षी युग आण साचें ’ असा उदार विचार मांडला आहे. पण त्यासाठीं ‘ साधु आणि असाधु ’ हे जे शब्द प्रयुक्त केले आहेत ते मराठी भाषेच्या दृष्टीनें हास्यास्पद आहेत. वस्तुतः त्यांना त्या शब्दांनीं ‘ श्रीमंत व अनाथ ’ हे अर्थ सूचित करावयाचे आहेत. ‘ काव्य कोणाचें ? ’ या कवितेंत केशवसुतांनीं आपल्या एका कल्पित मित्राच्या मुखानें स्वतःच्या काव्यासंबंधीं पुढील शंका प्रकट केली आहे. तो मित्र केशवसुतांना विचारतो कीं,

“ काव्य लिहिलें हें सत्य तूं असून, नव्हे माझें. हें ‘नव्हे तें म्हणून ’
सांगसी, तर **परकीय कल्पनांतें,** तुवां घेउनि योजिलें, गमे मातें ”

यावर “ नव्हे ऐसेंही ” असें उत्तर देऊन केशवसुत त्याच्या शंकेचें समाधान करतात खरें; परंतु त्यांच्या अनेक कवितांत आपल्या समाजाच्या दृष्टीनें विसदृश वाटणाऱ्या अशा

कल्पना आणि भाषेच्या दृष्टीनें चमत्कारिक वाटणारे प्रयोग आले आहेत. F. Lyle च्या Cupid and campaspe या कवितेचें 'मदन आणि मदनिका' हें रूपांतर बेमालूम व्हावें म्हणून त्यांनीं मुळांत जेथें पत्त्यांच्या खेळांचा उल्लेख आहे, तेथें सोंगट्यांचा खेळ घातला आहे. कारण त्या काळीं पत्ते आजच्याइतके सार्वत्रिक झाले नव्हते. परंतु Herrick च्या To daffodiles and To Blossoms चें 'जास्वंद आणि पारिजात' असें महाराष्ट्रीकरण करतांना त्यांना अवधान राहिलें नाहीं, आणि 'मरून मातींतच या पडाल, अज्ञात ऐशा थडग्यांत जाल' या ओळी ते लिहून गेले. या ओळींतील 'थडग्या' च्या उल्लेखामुळें महाराष्ट्रीकरण बरोबर झालें नाही. 'A wit's a feather' यावरून सुचलेली 'कीर्ति म्हणजे काय रे ?—एक पीस । शिरीं लोकांच्या त्यास चढायास' ही कल्पनाहि आपल्या समाजाच्या दृष्टीनें हास्यास्पद आहे. कारण विजयाचें चिन्ह म्हणून पिसें टोपींत खोवण्याची चाल आपल्यांत नाहीं. 'कचाप्रत देवयानी'मधील 'घालून निराशेचें अंडें, आशा अहा! उडुन गेली' ही कल्पनाहि पुराणकाळांतील कथेंत व केशवसुतांच्या सोवळ्या जमान्यांत हास्यास्पदच होती. तेव्हां केशवसुतांच्या या कल्पना टीकेचा विषय झाल्या असल्यास आश्चर्य नाहीं. शब्दयोजनेच्या बाबतींतहि केशवसुत चोखंदळ नव्हते. 'मंदिर' हा शब्द त्यांनीं 'हवेली' या अर्थानें प्रयुक्त केला आहे.

'तुतारी' च्या आवाजाला ते 'किंकाळी' म्हणतात. वस्तुतः 'किंकाळी' मनुष्य घाबरला कीं फोडतो. समाजास जागृत करावयास निघणाऱ्या माणसानें 'किंकाळी' कशास फोडायची ? आपल्या चपल बुद्धीच्या लहान भावानें कुलदीपक व्हावें ही कल्पना ते 'बापू, जनांत **दिवटी** धरशील काय ?' या भाषेनें व्यक्त करतात. तेव्हां त्यावर टीका व्हावी यांत अयोग्य तें काय होतें ? केशवसुतांनीं भाषा कमावलेली नव्हती आणि त्यामुळें असे दोष होत. कदाचित् चारचौघांत कवितांचा विषय चर्चेस निघाला असतांना अशा प्रकारची टीका होत असावी असें वाटतें. कारण केशवसुतांनीं आपल्या एका पत्रांत 'कवि संमेलना'संबंधीं पुढील मत प्रकट केलें आहे :—

'As to the idea of an annual gathering of poets :—Practical men meet periodically for practical purposes. Poets as dreamers should sit aloof, listening to the ethereal voice of silence and trying to render it into their uncouth vernaculars, whenever the Muse favours them. Some two or three congenial spirits may at times come together to sip the rainbow drops of the nectar; but more would certainly spoil its flavour—That is my idea,' [पाहा. मनो. पु. ११. भा. ७].

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...३५.३८९.... दि: ..................

प्रतिकूल आर्थिक परिस्थिति हेंहि केशवसुतांच्या विरागाचें एक कारण होतें. केशवसुतांनीं आपल्या 'दिवाळी' या कवितेंत —

लक्ष्मीपूजन तें द्वितीय दिवशीं रात्रौ जधीं होतसे
सोनें आणि वह्या धनीजन तधीं मांडून अर्चीतसे,
साध्याला विसरून लोक धरिती भक्ती कसे साधनीं—
ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तांत तें पाहुनी !

असा एक विचार मांडला आहे, आणि त्यांत आपल्या अर्थहीनतेचा स्पष्ट निर्देश केला आहे. 'निशाणाची प्रशंसा' आणि 'कवितेचें प्रयोजन' या कवितांत त्यांनीं जीवनाला 'समर' म्हटलें आहे. परंतु 'हें समर' जिंकावयाचें असेल, तर 'अर्था'सारखें अमोघ अस्त्र हवें हें त्यांनीं इतर अनेक नामवंत साहित्यिकांप्रमाणें लक्षांत घेतलें नाहीं. वैचारिक साहित्य आणि स्वयंपाकाचें साहित्य यांच्या द्वन्द्वांत साहित्यिकाचे कसे हाल होतात याचा अनुभव कुणास नाहीं ? कवितालेखन हा केशवसुतांच्या विरंगुळ्याचा एकमेव विषय होता. परंतु त्यांना उभ्या आयुष्यांत स्थैर्य असें कधींच लाभलें नाहीं. शिक्षणासाठीं त्यांना बडोदें, नागपूर, पुणें अशी त्रिस्थळी यात्रा करावी लागली. पोटासाठीं त्यांना मुंबई, कल्याण, सावंतवाडी, फैजपूर, भडगांव व धारवाड या ठिकाणीं पायपिटी करावी लागली. १९०३ च्या सुमारास ते धारवाडास गेले. या वेळीं ते चाळिशीच्या घरांत होते. कवितेपासून त्यांना कीर्तीचा अथवा संपत्तीचा लभ्यांश झाला नव्हता. अजून आपण किती भटकणार या विचारानें ते त्रस्त झाले. ज्या कवितेला त्यांनीं आपलें सर्वस्व दिलें, तिच्यावर त्यांनीं 'फिर्याद' गुदरली, आणि तींत आपलें अंतःकरण उघडें केलें —

जिनें मला वेडा केलें    तिच्यावरी ही फिर्याद !
ध्यास तिचा घेउन फिरलों    शून्य दिशा रानोमाळ
तिचेवरी गाणीं वेडीं    गाइलीं क्रमाया काळ !
स्वप्नांतचि केव्हां भेटे    नेते तों स्वर्गद्वारीं,
लोटिते मागुतीं खालीं    भूतलावरी अंधारीं !
तेणें मी विव्हल भारी    संसारीं परि करमेना
**धन न करीं, वणवण करितों    जम कोठें नीट जमेना !**
तरि तिलाच चित्त ध्यातें
निद्रेविण रजनी जाते !

आप्तवर्ग म्हणती " यातें—
कुठली ही जडली व्याद ! "
जिनें मला वेडा केलें तिच्यावरी ही फिर्याद !

हीन दीन झालों छंदी फंदी मी तुझिया नादीं
त्यामुळें परी न मनाला घालितों कधींहि विषादीं;
बूज तुवां या दासाची केली गे नाहीं अजुनी,
दु:ख हेंचि वाटे म्हणुनी गातसें अशीं गाऱ्हाणीं !

या कवितेंत केशवसुतांचा कवितेचा निदिध्यास, संसृतिविमुखता, प्रतिकूल आर्थिक परिस्थिति, अस्थैर्य, आप्तांचा रोष आणि असफलता या साऱ्यांचा स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हां केशवसुतांच्या कवितेंतील विराग त्यावरून सहज उमगेल !

— ९ —

केशवसुतांच्या कवितेंत विराग आहे त्यामुळें त्यांच्या कवितेला कमीपणा येतो, अथवा कवि म्हणून त्यांची थोरवी कमी होते असें मुळींच नाहीं. त्यांच्या कवितेंत विरागाप्रमाणें आशाहि आहे. 'तुतारी,' 'स्फूर्ति,' 'नवा शिपाई,' 'गोफण,' 'निशाणाची प्रशंसा' इत्यादि त्यांच्या कवितांत ओज आहे. तें वाचकांच्या नसांत नवरक्ताचा संचार करतें आणि त्याला पुरुषार्थास प्रवृत्त करतें. नव्या मनूचा साक्षात्कार प्रथम केशवसुतांच्या कवितेंत झाला म्हणून ते आधुनिक कवितेचे प्रवर्तक होत, याबद्दल वाद नाहीं. परंतु त्यांच्या कवितेचा अभ्यास करतांना तिची फक्त एकच बाजू पुढें मांडण्यांत येते. अभ्यास सर्वांगीण हवा. म्हणजे सर्व बाजू नीट रीतीनें लक्षांत येतात. हा महान् कवि अनुकूल परिस्थितींत वाढला असता तर त्याचें काव्य विशाल, व्यापक व विस्तृत झालें असतें. तें तसें कां झालें नाहीं हें दाखविण्याचा हा एक लहान साधार प्रयत्न आहे.

# चिन्तनिका : एक कविताप्रकार

□ □ □ □ □ □ □

**चिन्तनिका हा कविताप्रकार भावगीता**-चाच एक भेद आहे. आणि भावगीताप्रमाणेंच तो इंग्रजींतून मराठींत आला आहे. भावगीताप्रमाणेंच तोहि व्यक्तिनिष्ठ (subjective) आहे आणि त्यांतसुद्धां 'भाव'च प्रमुख आहे. मात्र भावगीताप्रमाणें तो गेय असतोच असें नाहीं. आणि जरी क्वचित् त्याला गेयतेची जोड मिळत असली, तरी तिला महत्त्व नाहीं.

'Reflective Lyric' ह्या इंग्रजी संज्ञेचा 'चिन्तनिका' हा मराठी पर्याय आहे. चिन्तनिका लिहिणारा कवि हा चिन्तनशील मनोवृत्तीचा (pensive mood) असतो. तो आपल्याच विचारांच्या तंद्रींत गढलेला असतो. त्याची वृत्ति एखाद्या ध्यानमग्नाप्रमाणें असते. त्याच्या स्वप्नसमाधीमधून चिन्तनिकेचा संभव होत असतो. चिंतनिकेंत 'विचारा'ला महत्त्व असतें. परंतु 'विचार' म्हणजे केवळ एखादें शुष्क 'तत्त्व' नसतें. त्याच्या मुळाशींहि कवितेला निर्माण करणारी प्रेरक शक्ति असावी लागते. आणि त्या 'विचारा'वर आधारलेली कविता ही इतर भावकवितांप्रमाणेंच सरस, सुंदर व सोज्ज्वळ असते.

तत्त्वज्ञान आणि अध्यात्म हे ह्या कविताप्रकाराचे मुख्य विषय आहेत. हे विषय सर्वसामान्य बुद्धीला सहजासहजीं आकलन करतां येत नाहींत. आणि यदाकदाचित् तिला ते ग्रहण करतां आले, तरी ते सरल, सुलभ, सुबोध व समर्पक शब्दांत व्यक्त करण्याचें सामर्थ्य असतेंच असें नाहीं. त्यासाठीं परातत्त्वाचा स्पर्श झालेल्या वागीशाचीच आवश्यकता असते. तो आपल्या शब्दाशब्दांत जीवनांतील नानाविध अनुभूतींचें गूढ सांठवत असतो. त्याला ह्या अनुभूति केवळ पंच ज्ञानेंद्रियांच्याच द्वारें प्रतीत होतात असें नाहीं. त्याला कांहीं गूढांचा उलगडा सहावें ज्ञानेंद्रिय जें निराकृति मन त्याच्या द्वारें होत असतो. सामान्य जनांच्या मनापेक्षां त्याचें मन विशेष तीव्र व भेदक असतें. त्याच्या मनाला अतींद्रिय व अतर्क्य ज्ञानसुद्धां सहजगम्य असतें. पंचज्ञानेंद्रियांच्या मार्गें प्राप्त होणाऱ्या अनुभवांची छटा कोण्याहि कुशल कवीच्या कृतींत उमटलेली दिसते. परंतु मनोमार्गानें आलेली अनुभूति एखाद्याच रससिद्ध वागीश्वराच्या वाणींत मुखरित झालेली कानीं पडते. ह्या अनुभूतीच्या छटेस किंवा छायेस रसिक ‘ गूढ ’ किंवा ‘ रहस्य ’ ह्यांपैकीं एखादी संज्ञा देत असतो. म्हणूनच ज्या कवितेंत अनुभूति अभिव्यक्त झाली आहे तिला छायावादी कविता, रहस्यवादी कविता, सायुज्यवादी कविता, अध्यात्मवादी कविता, गूढवादी कविता, शून्यसंशोधनात्मक कविता इत्यादि विशेषणें मिळालीं आहेत. इंग्रजींत अशा कवितेला Mystic असेंहि विशेषण आहे. त्या विशेषणामुळें साक्षात्कारी कवितेचा बोध होतो. प्राचीन संत हे खरोखर साक्षात्कारी पुरुष होते. त्यांच्या विचारांत, आचारांत आणि उच्चारांत एकवाक्यता होती. अर्वाचीन कवींच्या कवितेंत तसा साक्षात्कार आढळत नाहीं. केवळ त्या साक्षात्काराचा ओझरता स्पर्श आढळतो. तो त्या संतांच्या वाणीच्या अभ्यासानेंच प्राप्त झालेला असतो. त्यांची अनुभूति ही संतांच्याच अनुभूतीची पडछाया असते. तेव्हां तिला ‘Reflective Lyric’ म्हणजे ‘चिन्तनिका’ हें नांवच अन्वर्थक आहे.

चिन्तनिकेला वेदान्ताची (Philosophy) कलात्मक आविष्कृति असें यथार्थतेनें म्हणतां येईल. तर्क, विचार व विवेचन ह्यांच्या साहाय्यानें उपनिषदांनीं आणि दर्शनांनीं ज्ञान, ज्ञाता व व ज्ञेय ह्यांची जी अभिन्नता सिद्ध केली, तीच गृहीत धरून अंतःकरणाच्या साहाय्यानें तिची प्रतीति घेणें म्हणजेच चिंतनपरता. ह्या विश्वांतील विविधतेच्या मुळाशीं ऐक्याची जाणीव होणें आणि ती अंतःकरणांत भिनणें हेंच चिंतनाचें उद्दिष्ट असतें. अंतरंगांतील सर्व संकल्प व विकल्प नष्ट होऊन, विश्वांतील सर्व परस्पर विरोधी तत्त्वांचा एका ‘सच्चिदानंदां’त— अंतिम सत्यांत विलय झाला म्हणजे चिंतकाच्या चिंतनाचें सार्थक होतें.*

---

*भृंगा ! आणि तुझें गान
‘ परमानंदें ’ परिपूर्ण !
उदासीनही जगाविशीं

"vision where all forms,
In one only form dissolve,"

अशा एकात्मतेच्या अनुभूतीकरितां चिन्तनवादी सतत प्रयत्न करीत असतो. ईशाराधन, तत्त्वचिन्तन, सृष्टिपूजन आणि प्रेमशोधन ह्या चार मार्गांनीं त्याला अंतिम सत्याची प्रतीति येत असते.

चिन्तनिका लिहिणाराला चिन्तनिकेंत वाटेल तो विचार गोवतां येत नाहीं. तिच्यांत जो विचार गुंफावयाचा असतो, त्याचें सारभूत मूल्यमापन करावयास हवें आणि तें करतांना त्या विचारास काव्यमय स्वरूप देण्यांत व परिणामकारक करण्यांत आपणांस कितपत यश लाभलें आहे हें त्यानें पाहिलें पाहिजे. चिन्तनिका ही रसिकाच्या अंतःकरणास अप्रत्यक्ष आणि मेंदूला प्रत्यक्ष आवाहन करते. कारण तिची सुंदरता ही बऱ्हंशीं बुद्धिग्राह्य असते. ती अगोदर मेंदूस आकलन होते आणि नंतर अंतःकरणास स्पर्श करते.

चिन्तनिका ही आपल्या शाब्दिक आवरणाखालीं बहुधा आध्यात्मिक गूढाचें रत्न लपवीत असते. हें आवरण इतकें झिरझिरीत असावें लागतें कीं, तळाशीं दडलेल्या रत्नाचें तेज त्याच्या विरल विणेंतून दिसावें लागतें. चिन्तनिकेच्या एखाद्या शब्दांत किंचित् सूचकता (suggestion) किंवा 'ध्वनि' असला म्हणजे मर्मज्ञास तिच्यांतलें गूढ सहज उलगडतें. त्या गूढानें त्याच्या अंतःकरणास अननुभूत स्पर्श घडला, तर कवीला त्याची प्रतीति आली आहे हें त्यास तत्काळ ताडतां येतें.

वस्तुतः गूढ उकलण्याचा सरळ व सोपा उपाय म्हटला म्हणजे चिन्तनिकेंत एखाद्या अनुरूप प्रतीकाची किंवा रूपकाची योजना करणें हा होय. एखाद्या निर्गुण भावनेवर किंवा कल्पनेवर एखाद्या सगुण पदार्थाचा आरोप केला म्हणजे सर्वसाधारण रसिकांना सहजासहजीं तिचा उलगडा होतो. रूपकाचा आणखी एक विशेष असा कीं, चिन्तनिका वरवर वाचणाराला तिचा अर्थ लौकिक असावा असा भास होऊन आनंद वाटतो. परंतु चाणाक्ष रसिकाच्या लक्षांत तिचें मर्म चटकन् आल्याशिवाय राहात नाहीं. गूढ विषय रूपकानें सुलभ होतो हें खरें असलें, तरी ठराविक रूपकें कंटाळवाणीं होतात हें नाकबूल करतां येत नाहीं.

---

तव तन्मयता सृष्टीशीं **भृंग ! क्र. ५४**

मींहि कशाला येथ रहावें ?
काय असें ज्यां मीं चिकटावें ?
वाटे गिरक्या घेत मिळावें—
या पवनाच्या चक्रीं, होउन लीन 'सच्चिदानंदां'त— **वातचक्र क्र. ११२**

चिंतनाच्या काव्यमय आविष्कारापेक्षां तत्त्वज्ञान, तर्क, युक्तिवाद व उपदेश ह्यांचीच जर चिंतनिकेंत चर्चा असेल, तर तिचें स्वरूप नीरस व बोजड होईल आणि मग तिला ‘ कविता ’ म्हणून संबोधण्यापेक्षां ‘ पद्यबद्ध विचार ’ म्हणून संबोधणें अधिक यथार्थ होईल. उपदेशपर पद्य आणि काव्यमय उपदेश ह्यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. उपदेशपर पद्य हें इतकें कृत्रिम असतें कीं, तें रसिकाच्या इच्छेविरुद्ध त्याच्या मनावर कुरघोडी करूं पाहतें. उलट काव्यमय उपदेश हा इतका स्वाभाविक असतो कीं, तो काव्याच्या ओघांत रसिकाच्या हृदयाची पकड सहज घेतो. काव्यमय उपदेश हा निर्हेतुक असतो.

तथाकथित उपदेशपर काव्यावर समीक्षकांचा जो कटाक्ष असतो, तो वस्तुतः ‘उपदेशा’-वर नसून त्यांतील ‘ काव्या ’च्या अभावावर असतो. त्यांत ‘ खरें काव्य ’ नसून केवळ ‘ पद्यबद्ध उपदेश ’ असतो अशी त्यांची त्यावर टीका असते. उपदेश काव्यमय कसा करावा हें जर कवीला कळलें, तर मग समीक्षकाला टीका करण्यास जागा राहाणार नाहीं. चिंतनिकेबाबत हेंच पथ्य आवश्यक आहे. चिंतनाचा विषय हा जरी बुद्धिगम्य म्हणून कांहींसा कठिण असला, तरी त्याचा आविष्कार मात्र अतिशय कोमल हवा. चिंतनिका म्हणजे कांहीं प्रवचन नाहीं. ती कविवचन आहे.

क्वचित् कांहीं काव्यें नीतिपाठ देण्याच्या उद्देशानें रचण्यांत येतात. तीं सहेतुक असतात व बहुधा एखाद्या कथेच्या झिरझिरीत पडद्याआड त्यांची सजावट करण्यांत येते. त्यांचा अंतर्भाव कथाकाव्यांत करावा लागेल. परंतु ज्यावेळीं एखादी अमूर्त कल्पना ही मूर्त करतांना एखाद्या रूपकाचा किंवा प्रतीकाचा आश्रय घ्यावा लागत असेल व त्याच्या माध्यमानें विचार अभिव्यक्त होत असेल, त्यावेळीं मात्र त्या काव्यमय विचाराला चिन्तनिकेंत प्रविष्ट करावें लगेल.

चिन्तनिकेचा संबंध बुद्धि आणि भावना ह्या दोघींशींहि असल्यामुळें कित्येकदां बुद्धि ही भावनेवर मात करतांना आढळते, तर कित्येकदां भावना ही बुद्धीला आव्हान देतांना दिसते. त्यामुळें चिन्तनिकेचे साधारणतः दोन प्रकार संभवतात. जिच्यांत बुद्धीचें प्राधान्य असतें तिला ‘ वैचारिक चिन्तनिका ’ असें नांव देतां येईल आणि जिच्यांत भावनेचें महात्म्य आहे तिला ‘ भावनिक चिन्तनिका ’ असें म्हणतां येईल. आधुनिक मराठी कवितेंत रे. टिळक, केशवसुत व Bee ह्यांनीं ‘ वैचारिक चिन्तनिका ’ रचल्या आहेत, तर तांब्यांनीं ‘ भावनिक चिन्तनिका ’ लिहिल्या आहेत.

कविवर रवींद्रनाथ ठाकूर ह्यांच्या ‘ गीतांजली ’त भक्तिपर आणि ‘ फुलारीं ’त प्रीतिपर चिन्तनिकांचा आढळ होतो. चिन्तनिकेचें माध्यम प्रीति असल्यास ती चिन्तनिका अत्यंत मनोज्ञ प्रतीत होते. कारण प्रीतिभाव हा इतका विचित्र, गुंतागुंतीचा व अक्षय विषय आहे कीं, त्याच्यांतून एक अभिनव सुंदर सृष्टि सहज साकार होऊं शकते. अनुराग-विराग, उत्कटता-अवसाद, आशा-

निराशा व प्रिय वस्तूंचें क्षणभंगुरत्व ह्यांच्यांतून जन्मास आलेली प्रीतीची कविता विविध रंगांच्या तंतूंनीं विणलेल्या रेशमी वसनासारखी मोहक व मुलायम दिसते. वानगीदाखल रवींद्रनाथांची ही प्रीतिचिन्तनिका पहा,—

" My beloved is ever in my heart,
That is why I see him every where.
He is in the pupils of my eyes,
That is why I see him every where.
I went far away to hear his own words,
But, ah, it was vain!
When I came back I heard them
In my own songs.
Who are you to seek him
Like a beggar from door to door!
Come to my heart and see his face
In the tears of my eyes!"

प्रीति-तन्मयतेच्या यथातथ्य चित्रणामुळें रवींद्रनाथांची ही चिन्तनिका सुंदर साधली आहे. प्रीतीच्या माध्यमांतून आविष्कृत झालेल्या अशा अनेक मधुर चिन्तनिका तांबे यांच्या कवितासंग्रहांत आहेत. नवपरिणीता वधूला जीवात्म्याचें प्रतीक कल्पून तिला वराकडे म्हणजे परमात्म्याकडे जातांना कशा गोड वेदना होतात तें तांब्यांनीं 'नववधू प्रिया मी बावरतें' ह्या चिंतनिकेंत व्यक्त केलें आहे. त्या वधूला वर हाच आपलें सर्वस्व आहे हें कळतें परंतु वळत नाहीं;—

'चित्र तुझें घेऊनि उरावरि
हारतुरे घालितें परोपरि
छायेवरि संतोष खुळी करि'

अशाप्रकारें ती एकांतांत वागत असते. जीवात्माहि निर्गुण अशा परमात्म्याकडे जाण्याचें टाळून त्याची 'छाया' जी सगुण प्रतिमा तिच्या पूजनांतच समाधान मानत असतो. ह्या चिंतनिकेंतील 'छाया' हा शब्द ध्वन्यर्थक असून कवितेचें एकंदर गूढ उकलण्यास साहाय्य करतो.

चिन्तनिकेंत भावनेपेक्षां विचाराचा अंश अधिक असल्यामुळें ती भावगीताप्रमाणें तोकडी असावी असा निर्बंध घालतां येणार नाहीं. टिळकांचें 'वनवासी फूल' हें चिंतनपर काव्य प्रदीर्घ आहे आणि 'अश्रुगुच्छ' हें काव्य लघु आहे. पण ह्या दोघांचाहि समावेश चिंतनिकेंत होईल. टिळक, केशवसुत व Bee ह्यांच्या कवितासंग्रहांत अनेक चिन्तनिका आहेत. परंतु टिळक व Bee ह्यांचे मनोविकार हे विचारांच्या आधीन आहेत, तर केशवसुतांचे विचार हे मनोविकारांच्या आधीन आहेत. केशवसुत हे चिंतक ( Reflective ) तर Bee हे वैचारिक ( Meditative ) व

टिळक तात्त्विक ( Philosophica1 ) कवि आहेत. केशवसुतांच्या साऱ्याच चिन्तनिका आत्म-प्रत्ययात्मक असून त्या त्यांच्या भावोत्कट मानसांतून उगम पावल्या आहेत. त्यांच्यांतील आध्यात्मिक व तात्त्विक विचार हे जरी मूळांत उपनिषदांतील किंवा श्रीमद्भगवद्गीतेंतील असले, आणि ते त्यांना इमर्सन्च्या निबंधांवरून स्फुरले असले, तरी त्यांची आविष्कृति श्रद्धायुक्त व भावनामय आहे; आणि तिला कल्पकतेची जोड मिळाल्यामुळें ती संवेदनीय व स्मरणीय झाली आहे.

केशवसुतांच्या प्रत्येक चिन्तनिकेची बाह्य आकृति वेगळी असून तिची रचना नावीन्ययुक्त, सौष्ठवपूर्ण व प्रमाणबद्ध आहे. त्यांच्या चिन्तनिका गोड गळ्यावर गुणगुणतां येण्याजोग्या असून त्यांच्यांतील शब्दांत सुरेल संगीत आहे. ' झपूर्झा ' व ' सतारीचे बोल ' ह्या चिन्तनिका ह्या विधानाची साक्ष देतील. मात्र त्यांच्यांतील संगीत हें गेय नसून केवळ गुंजनाच्या स्वरूपाचें आहे. चिन्तनिकेचा विषय गूढ असतो व तिच्यांतलें चिन्तन हें भ्रमराच्या गुंजारवाप्रमाणेंच स्वैरालापाच्या स्वरूपाचें असतें. म्हणूनच कदाचित् चिन्तनिकेला ' गूढगुंजन ' हें नांव मिळालें असावें. गूढ अशा अध्यात्म्याच्या दृष्टीनें विचार केल्यास चिन्तनिका ही ' गीत ' नसून ' कविता ' आहे. तेव्हां ती आटोपसर नसल्यास नवल नाहीं. गीतांत ' गाण्या 'ला महत्त्व असल्यामुळें त्याचीं कडवीं पडतात. चिन्तनिकेंत तत्त्वविचार व त्यांचा भावनात्मक आविष्कार ह्यांची महती असल्यामुळें तिचे भावनेच्या चढउतारानुसार टप्पे पडतात.

चिन्तनिकेंत उदात्त विषयाच्या जोडीला आकर्षक भाषा हवी व उच्च विचार हवेत. कारण भाषा व विचार ह्यांचा संबंध शरीर व जीव ह्यांच्या युगलासारखा आहे.

## ' झपूर्झा '

[ आधीं केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तींतला पाठ दिला आहे. आणि मग तळटीपेंत करमणुकींतले पाठभेद नमूद केले आहेत. करमणुकींत ' झपूर्झा ' या शीर्षकाबद्दल ' हर्षखेद ते मावळले ' हें शीर्षक आहे. आणि ' झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ' हें पालुपद अजिबात गाळलें आहे. ]

( आपल्यास जें कांहीं नाहीं असें वाटतें, त्यांतूनच महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढतात. त्या महात्म्यांची स्थिति लक्षांत वागवून पुढील गाणें वाचिल्यास, तें दुर्बोध होऊं नये असें वाटते. )

हर्षखेद ते मावळले
हास्य निमालें,
अश्रु पळाले
कण्टकशल्यें बोंथटलीं,
मखमालीची लव वठली;

कांहीं न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला,
तिमिर हरपला;
काय म्हणावें या स्थितिला ? —
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

हर्षशोक हें ज्या सगळें,
त्यां काय कळे ?
त्यां काय वळे ?
हंसतिल जरि ते आम्हांला,
[१]भय न धरूं हें वदण्यालाः —
व्यर्थी अधिकचि अर्थ वसे
[२]तो त्यांस दिसे,
[३]ज्यां म्हणति पिसे.
त्या अर्थाचे बोल कसे ? —
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

[४]ज्ञाताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून,
चिद्घनचपला ही जाते,
[५]नाचत तेथें चकचकते;

अंधुक आकृति तिस दिसती,
[६] त्या गातात
[७] निगूढ गीती ;

---

१ भय न अम्हांला वदण्याला
२ त्यास तो दिसे
३ म्हणति ज्या पिसें
४ ज्ञानाच्या कुंपणावरून
५ नाचत झुकते, चमक मारिते
६ भाषा गाती
७ अ-मानुषा ती ;

[८] त्या गीतीचे ध्वनि निघती –
झपूर्झा ! गडे झपूर्झा !
नांगरल्याविण भुई बरी
असे कितितरी ;
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा !
हजारांतुनी एकादा !
[९] तरी न तेथुनि वनमाला
[१०] आणायला,
[११] अटक तुम्हांला ;
[१२] मात्र गात हा मंत्र चला –
झपूर्झा ! गडे झपूर्झा !
पुरुषाशीं त्या रम्य अति
नित्य प्रकृति
क्रीडा करिती ;
स्वरसंगम त्या क्रीडांचा
ओळखणें, हा ज्ञानाचा –
हेतु ; तयाची सुंदरता [१३]
व्हाया चिंता [१३] –
प्रत ती ज्ञाता
[१४] वाडेंकोडें गा आतां –
झपूर्झा ! गडे झपूर्झा !
सूर्यचंद्र आणिक तारे
नाचत सारे
हें प्रेमभरें

---

८ त्या भाषेचे ध्वनि निघती
९ तरी तिथें वनपुष्पाला
१० वेंचायाला;
११ नसे अडथळा
१२ मात्र घेउनी संगें या.
१३ व्यक्ता. १४ गुंगत गा ही अव्यक्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वा...
अनुक्रम ..३५७३८...... वि: ..........
...... नों वि: .22.2

खुडित खपुष्पें फिरति जिथें,
आहे जर जाणें तेथें,
धरा जरा–निःसंगपणा
मारा फिरके
मारा गिरके,
नाचत गुंगत म्हणा म्हणा –
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

केशवसुतांनीं ज्या पांच सरस व सुंदर चिन्तनिका निर्माण केल्या आहेत, त्यांत झपूर्झा ही क्रमानें प्रथम आहे. अशा प्रकारच्या कवितेला कांहीं आलोचकांनीं गूढगुंजनात्मक भावगीत, शून्यसंशोधनपर काव्य अथवा तात्त्विक कविता यांपैकीं एखादें नांव दिलें आहे. वस्तुतः या तऱ्हेची कविता चिंतनांतून उद्भूत झाल्यामुळें तिला चिन्तनिका हेंच नांव अन्वर्थक ठरतें. केशवसुत ही व्यक्ति चिंतनशील होती आणि तिची वृत्ति चिंतनपर होती. कविताविषयाचें चिंतन तिला प्रिय होतें आणि आपल्या मनःप्रवृत्तीला तिनें सतत अभ्यासानें त्या तऱ्हेची संवय लावली होती. त्याचें फळ म्हणजे तिनें निर्माण केलेल्या ' झपूर्झा ', ' सतारीचे बोल, ' ' कोणीकडे ?,' ' म्हातारी ' आणि ' हरपलें श्रेय ' या पांच चिन्तनिका होत.

केशवसुत कवि होते. ते साधक, संशोधक अथवा तत्त्ववेत्ते नव्हते. त्यांना कोणतेंहि रहस्य, प्रमेय अथवा तत्त्व मांडावयाचें नव्हतें. सतत चिंतनानें जें अनुभवास आलें तेंच त्यांना भावनेच्या भाषेंत सांगावयाचें होतें. त्यांत गूढ, नवीन अथवा ैचारिक असें कांहीं नव्हतें. विचार हे स्थूल व जड असतात. उलट चिंतन हें सूक्ष्म व तरल असतें. कविता ही कोमल भावनेची आविष्कृति असते. तेव्हां तिला स्वभावतःच सूक्ष्म व तरल चिंतन पोषक ठरतें. केशवसुतांच्या वरील चिन्तनिका म्हणूनच कविता या पदवीला पात्र ठरल्या आहेत.

केशवसुतांच्या वृत्तींतील चिंतनपरता ही बहुधा वाचनानें जागृत होई. ते अभ्यस्त नागरकवि होते. त्यामुळें त्यांचा विद्याव्यासंग अव्याहत चालू असे. हा व्यासंग संस्कृत किंवा मराठी ग्रंथांपेक्षा इंग्रजी ग्रंथांचा विशेष असे. कारण, त्यांनीं ज्याकाळीं कवितालेखनास प्रारंभ केला, त्याकाळीं इंग्रजी वाङ्मय महाराष्ट्रांत सर्वस्वीं नवीन असल्यामुळें त्याचें माहात्म्य विशेष होतें. शिवाय तें प्रेरक असल्यामुळें साहित्यिकांचें आवडतें असे. केशवसुतांच्या वाचनासंबंधींचा एक आणखी विशेष असा कीं, इंग्रज ग्रंथकारांपेक्षां अमेरिकन ग्रंथकारांवर त्यांचा भर अधिक होता. इमर्सन, लॉंगफेलो व पो हे अमेरिकन कवि त्यांना प्रिय होते. त्यांत इमर्सनच्या निबंधांचा, व्याख्यानांचा आणि काव्यांचा त्यांचा अभ्यास विशेष होता. त्यासंबंधीं मीं एकदां मागें

जानेवारी १९४८ च्या उन्मेषांत विस्तारानें लिहिलें असल्यामुळें येथें त्याची पुनरावृत्ति करीत नाहीं. प्रस्तुत केवळ झपूर्झा या कवितेपुरतेंच विवेचन करीत आहें.

झ पू र्झा ही चिन्तनिका केशवसुतांना मुंबई मुक्कामीं २ जुलै १८९३ रोजीं स्फुरली. ती त्यांनीं करमणुकींत प्रसिद्ध करण्याकरितां आपले चाहते व स्नेही हरिभाऊ आपटे यांच्याकडे पाठविली आणि ती हरिभाऊंनीं २९ जुलै १८९३ च्या करमणुकींत प्रसिद्ध केली. परंतु प्रसिद्ध करतांना त्यांनीं झ पू र्झा हा मथळा गाळून टाकला व त्याऐवजीं इंग्रजी पद्धतीप्रमाणें 'हर्षखेद ते मावळले' हा प्रथम चरण मथळा म्हणून दिला. या संपादकीय हस्तक्षेपाबाबत पुढें केशवसुतांची कविता पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यावर हरिभाऊंनीं तोंडी खुलासा केला ;—"हें काव्य जेव्हां मजकडे आलें, तेव्हां झ पू र्झा हें काय प्रकरण आहे, याचेंच मला कोडें पडलें. म्हणून दामले यांजकडे कांहीं विचारपूस न करतां 'झ पू र्झा गडे! झ पू र्झा' हे शब्द गाळून सदरहू काव्य छापून टाकलें."[1] यासंबंधीं प्रस्तुत खुलासा जमेस धरून रहाळकर जी माहिती देतात ती अशी :..."या कवितेच्या प्रसिद्धीसंबंधानें एक मौजेची गोष्ट आहे, ती आम्हांला केशवसुतांकडूनच कळली असल्यामुळें ती नमूद करतों. हेतु हा कीं, यायोगें तरी या कवितेचें खरें हृद्गत वाचकांना कळावें. ती गोष्ट अशी :—ही कविता लिहिल्यानंतर कवीनें ती 'करमणूक'कारांकडे प्रसिद्धीकरितां पाठविली. पण संपादकांनीं 'झपूर्झा' हा मथळा गाळून 'हर्षखेद ते मावळले' ही कवितेची पहिली ओळ इंग्रजी पद्धतीप्रमाणें कवितेच्या मथळ्या-दाखल घातली! ज्याअर्थीं इतक्या विद्वान् आणि रसिक संपादकांना आपल्या कवितेचें गूढ उकललें नाहीं, त्याअर्थीं आपल्याच कवितेंत कांहीं तरी दुर्बोधता राहिली असेल असें वाटून कवींनीं इतरत्र ही कविता प्रसिद्धीसाठीं पाठविते वेळीं आपल्याच कवितेला टीप जोडली."[2] रहाळकरांची ही माहिती काल्पनिक दिसते. कारण करमणुकींत क्वचित् कांहीं पाठांतरें आहेत. त्यांचा पुढें योग्य स्थळीं विचार होईल.

केशवसुतांनीं कविता करमणुकीकडे पाठविली त्यावेळींच टीपेंत झपूर्झा या सांकेतिक शब्दांचा अर्थ स्पष्ट केला असता, तर हरिभाऊंनीं कवितेंत हस्तक्षेप केला नसता. झपूर्झा हा शब्द जसा असावा तसा सूचक नाहीं. 'निर्विशेष निरहंकार मनःस्थितीच्या आनंदाचें शब्दचित्र' हा कवितेचा विषय हरिभाऊंच्या लक्षांत आला होता असें पाठांतरावरून दिसतें. पाठांतरें हरिभाऊंचींच आहेत अशी माझी कल्पना आहे. त्यांनीं ज्याप्रमाणें मथळा बदलला त्याप्रमाणें क्वचित् पाठांतरें घातलीं. केशवसुतांना तीं मान्य नसावीं, म्हणून त्यांच्या हस्तलिखितांत मूळ पाठ राहून तेच पुढें पुस्तकांत रूढ झाले असावेत. कार्लाइल कवितेची व्याख्या Poetry is a musical thought अशी करतो. त्या व्याख्येप्रमाणें केशवसुतांच्या पाठांत 'भावनात्मक संगीत' आहे. परंतु हरिभाऊंचीं पाठांतरें हीं अर्थाचा बोध स्पष्ट करण्याच्या दृष्टीनें उपयुक्त आहेत.

---

१. रत्नाकर, नोव्हेंबर.–डिसें. १९३०

२. मा. मनोरंजन, आक्टो. १९३८.

'झपूर्झा'पूर्वीं केशवसुतांनीं तिच्याशीं संबद्ध अशा 'भृंग' व 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' या दोन महत्त्वाच्या कविता लिहिल्या आहेत. विचाराशीं तादात्म्य पावल्याशिवाय सौंदर्याचा साक्षात्कार शक्य नाहीं, हें इमर्सनचें तत्त्व या तिन्ही कवितांतून अनुस्यूत आहे. 'भृंग' ही कविता केशवसुतांना उघड उघड इमर्सनच्या The Humble Bee या कवितेवरून स्फुरली आहे. भृंग या कवितेचें लेखन केशवसुतांनीं दोनदां केलें आहे. तें करीत असतांना ते मूळ इंग्रजी कवितेबरोबर भृंगाशींहि तादात्म्य पावले आहेत. या 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिती'चें वर्णन करतांना ते भृंगास उपलक्ष्य करून म्हणतात—

भृंगा! आणि तुझें गान
परमानंदें परिपूर्ण
उदासीन ही जगाविशीं
तव तन्मयता सृष्टीशीं!

भृंगाचा हा परमानंद आणि ही तन्मयता आपल्याला प्राप्त व्हावी अशी केशवसुतांची मनीषा आहे. ते भृंगास विचारतात;—

होईल का रसिकता तव लब्ध मातें?
गुंगी मिळेल मजला तव केधवां ते?

कवितालेखनास आवश्यक असणारी ही गुंगी म्हणजेच तन्मयता मिळविण्याचा केशवसुतांचा प्रयत्न अव्याहत चालू होता. कधीं कधीं त्यांना या समाधिसुखाचा अनुभव घेण्याची संधि चालून येई. परंतु व्यावहारिक विवंचनांमुळें तिचा भंग होई. या मग्नतन्मयतेचें सुंदर शब्दचित्र केशवसुतांनीं 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' या कवितेंत रेखाटलें आहे. ही कविता केशवसुतांना इमर्सनच्या Love या निबंधावरून स्फुरली आहे. केशवसुतांच्या कवितेवर टीप आहे. तिच्यांत त्यांनीं काव्य, चित्र व संगीत या तीन ललितकलांचा उल्लेख केला असून त्यांच्यांतील 'सौंदर्यतत्त्व' गोंवून ठेवतां येत नाहीं म्हणून हळहळ व्यक्त केली आहे. याचविषयीं इमर्सन म्हणतो :—

"We cannot approach beauty ...... what else did Jean Paul Richter signify, when he said to music, "Away! Away! thou speakest to me of things which in all my endless life, I have not found, and shall not find," ...... The same remark holds of painting. And of poetry, success is not attained, when it pulls and satisfies, but when it astonishes and fires us with new endeavours after the unattainable."

हेंच तत्त्व 'सौंदर्या'ला लावतांना व्यावहारिक विवंचना तन्मयतेच्या आड कशा येतात इमर्सननें एका जुन्या रूपककथेच्या द्वारें सांगितलें आहे:—

"The soul of man, embodied here on earth, went roaming up and down" असा त्या कथेचा प्रारंभ करून तो पुढें सांगतो;—

"The Diety sends the glory of youth before the soul; ...... and man beholding such a person in the female sex runs to her, and finds the highest joy in contemplating the form, the movement, and intelligence of this because it suggests to him that which is in the beauty, and the cause of the beauty."

केशवसुतांनीं हीच कथा 'रंभा' व 'उर्वशी' या पुराणांतील विशेषनामांनीं अधिक स्पष्ट व सुंदर केली आहे. आणि 'आका'च्या उल्लेखानें सांसारिक संताप सूचित करून ते सौंदर्या-स्वादनाच्या तन्मयतेच्या आड कसे येतात तें दाखविलें आहे. केशवसुतांनीं ही कविता २४ मार्च १८९३ ला मुंबईस लिहिली आहे व ती २२ एप्रिल १८९३ च्या करमणुकींत प्रसिद्ध झाली आहे. झपूर्झाप्रमाणें या कवितेवरहि टीप आहे. परंतु ही टीप दिली नाहीं, तरी कविता स्पष्टार्थबोधक आहे. एकाच ठिकाणीं पाठांतर आहे. तें म्हणजे 'ती कांहीं तरिही वळे न' याबद्दल 'ती कांहीं न वळे तरीहि' असा पाठ आहे. माझ्या कल्पनेप्रमाणें या कवितेचें चिंतन चालू असतांनाच केशवसुतांना झपूर्झा ही चिंतनिका सुचली असावी. कारण पहिल्या कवितेंत तन्मयतेच्या आड येणाऱ्या संसारतापांविषयीं गाऱ्हाणें आहे, तर दुसऱ्या कवितेंत तन्मयतेच्या आनंदाचें दर्शन आहे, पुन्हां या दोन कवितांच्या लेखनकालांत तीन महिने आणि एक सप्ताहाचें अंतर आहे.

मला वाटतें, कवितांतर्गत सुंदरतेशीं तन्मयता पावण्याचा केशवसुतांचा प्रयत्न चालू होता, तो झपूर्झा लिहितांना यशस्वी झाला. तन्मयतेच्या प्राप्तीकरितां जी 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिति' हवी तिचें वर्णन केशवसुतांनीं झपूर्झाच्या पहिल्या कडव्यांत केलें आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत किंवा बाराव्या अध्यायांत स्थितप्रज्ञाचीं किंवा देवभक्ताचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांचाच अनुवाद त्या कडव्यांत आहे.[३] इमर्सन्‌चा The Transcendentalist म्हणून एक निबंध आहे. Transcendentalist म्हणजे परातत्त्ववादी. माझे मित्र तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक डॉ. देशमुख हे 'अतीतवादी' हा प्रतिशब्द सुचवतात. हा निबंध केशवसुतांचा अत्यंत आवडता होता. आपल्या एका पत्रांत त्यांनीं त्यांतलें अवतरण दिलें आहे. या निबंधांतील बरेचसे विचार गीतेंतील तत्त्वज्ञानाशीं जुळणारे आहेत. वॉरन हेस्टिंगसच्या काळीं विल्किन या नांवाच्या

३ दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते २/५६
विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निःस्पृहः निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति २/७१
यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः १२/१७
अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी १२/१३

४. मा. मनोरंजन, जुलै १९१८

एका लेखकानें गीतेचें इंग्रजी भाषांतर केलें होतें. इमर्सन्नें हें भाषांतर वाचलें होतें. इमर्सन्च्या वेळीं अनेक वैदिक ग्रंथांचीं व अरबी आणि फारशी ग्रंथांचीं इंग्रजी भाषांतरें होत होतीं. त्यांच्या वाचनाचा परिणाम इमर्सन्च्या विचारप्रणालीवर झाला आहे. Immortality या आपल्या निबंधांत त्यानें यमधर्म व नचिकेता यांची कथा दिली आहे. 'ब्रह्म' ही त्याची कविता सुप्रसिद्ध आहे. मौज अशी कीं, केशवसुतांना झ पू र्झा ही कविता जी स्फुरली आहे ती गीतेच्या वाचनानें स्फुरली नसून इमर्सन्च्या निबंधाचें अध्ययन करून स्फुरली आहे.

'झ पू र्झा' हा शब्द मात्र केशवसुतांनीं खास आपल्या टांकसाळींत पाडलेला आहे. त्यांना ऐहिक उपाधि विसरलेल्या निःसंग मनःस्थितीचें वर्णन करावयाचें होतें. त्यासाठीं यथातथ्य प्रतिमा म्हणून त्यांना आपल्या घरीं कोंकणांत झिम्मा हा पोरींचा खेळ आढळला. मुली झिम्मा खेळतांना जेव्हां एकीमेकींच्या हातांवर, 'जा पोरी! जा, जा पोरी! जा' म्हणत म्हणत, हात मारून गोल गोल फिरूं लागतात; तेव्हां त्यांची जी तन्मयता होते, तिचें साम्य त्यांना निःसंग मनुष्याच्या मनःस्थितीशीं आढळलें; आणि म्हणून त्यांनीं 'काय म्हणावें या स्थितीला?' हा प्रश्न विचारून स्वतःच उत्तर देऊन टाकलें आहे कीं, तिला 'झ पू र्झा' असें म्हणावें.

इमर्सन्च्या पुढील पंक्ति या झपूर्झाच्या पहिल्या कडव्याशीं समानार्थक आहेत :—

Into vision where all forms
In one only form dissolve,
Where unlike things are like :
    Where good and ill
    And joy and moan
    Meet into one.

पहिल्या कडव्यांत वर्णन केलेली मनःस्थिति जे अनुभवितात, त्यांच्या दिव्य दृष्टीचें व आंतरज्ञानाचें वर्णन दुसऱ्या कडव्यांत आहे. या कडव्यांत 'भय न धरूं हें वदण्याला' आणि 'तो त्यांस दिसे, ज्यां म्हणति पिसे' याबद्दल 'म्हणति ज्यां पिसे, त्यांस तो दिसे' अशीं पाठांतरें आहेत. 'व्यर्थी अधिकचि अर्थ वसे' या ओळींतील कल्पना गीतेंतील पुढील श्लोकांतील कल्पनेशीं समानार्थक आहे ; —

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः

मौज अशी कीं, गीतेंत 'संयमी' व 'मुनेः' असे समर्पक शब्द आहेत, तर केशवसुतांनीं 'पिसे' हा शब्द विपरीत रीतीनें म्हणजे 'शहाणा' या अर्थी योजिला आहे. 'Poets are mad', किंवा शेक्सपियर म्हणतो त्याप्रमाणें 'The lunatic, the lover and the poet are of imagination all compact' या चमत्कारिक कल्पना इंग्रजींत आढळतात. इमर्सन्च्या निबंधांतूनहि अशा कल्पना दृष्टीस पडतात;



के. ६

"Great wits to madness nearly are allied;
Both serve to make our poverty our pride."

किंवा ऑरस्टाटल म्हणतो त्याप्रमाणें "No great genius was ever without some mixture of madness, nor can anything grand or superior to the voice of common mortals be spoken." केशवसुतांनीं ही 'पिसे'पणाची कल्पना इंग्रजींतूनच उचलली असावी. त्यांच्या अनेक कवितांतून या कल्पनेची पुनरुक्ति व पुनरावृत्ति झाली आहे. मात्र 'व्यर्थ' व 'अर्थ' हे दोन परस्परविरोधी शब्द जवळ ठेवून केशवसुतांनीं कल्पनेची जी अभिव्यक्ति केली आहे, ती गीतेंतील उपर्युक्त श्लोकांतील अभिव्यक्तीसारखीच आहे. इमर्सन्‌लाहि अशा प्रकारच्या अभिव्यक्तीची आवड असे, 'Where unlike things are like' ही त्याची वर दिलेली अभिव्यक्ति अशाच प्रकारची आहे. या प्रकारच्या अभिव्यक्तीबाबत गोस्वामी श्रीतुलसीदासजींचें उदाहरण स्मरणीय आहे. 'ब्रह्म'चें अस्तित्व आहे किंवा नाहीं असा कुणीं प्रश्न केला असतांना त्यांनीं 'दोह्यां'त उत्तर दिलें:—

"है" कहूं तो "है नही"। "नही" कहूं तो "है"
"है" "नही" के बीचमें। जो कुछ है सो है.

तिसऱ्या कडव्यांत 'निर्विशेष निरहंकार मनःस्थितीं'तील मनुष्याच्या चित्‌शक्तीला आत्मतेजानें चकाकणारीं जीं अस्पष्ट तत्त्वें दिसतात त्यांचें वर्णन आहे. या कडव्यांत 'ज्ञाताच्या' स्थानीं 'ज्ञानाच्या,' 'नाचत तेथें चकचकते' ऐवजीं 'नाचत झुकते चमक मारिते', आणि 'त्या गातातो, निगूढ गीती; त्या गीतीचे ध्वनि निघती' याबद्दल 'भाषा गाती, अमानुषा ती, त्या भाषेचे ध्वनि निघती' अशीं पाठांतरें आहेत. 'ज्ञात' बद्दल 'ज्ञान' हा पाठ उचित आहे. कारण जें जें ज्ञात आहे, त्याचें त्याचें ज्ञान असतेंच असें नाहीं. शिवाय 'ज्ञान' हें सीमित असल्यामुळें त्यासाठीं योजिलेली 'कुंपणा'ची प्रतिमाहि उचित आहे. पुढें 'चित्‌शक्ती'करितां जी 'चपले'ची प्रतिमा योजिली आहे, तीदेखील त्या शक्तीचें तेज, चापल्य आणि आवेग या दृष्टींनीं यथोचित आहे. मात्र 'घन' हा शब्द निरर्थक आहे. 'चपले'शीं तो संबद्ध असल्यामुळें अनवधानानें योजिला गेला असावा. चित्‌शक्तीला जे अज्ञात प्रदेश दिसतात ते अर्थातच आरंभीं आरंभीं अंधुक अंधुक वाटतात, तेथील आकृति अस्पष्ट असतात आणि त्यांची भाषा मानवांच्या भाषेहून निराळी असते. ती समजावी अशी इच्छा असेल, तर 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिति' प्राप्त केली पाहिजे. या आकृतींचें आणि त्यांच्या भाषेचें वर्णन इमर्सन् असें करतो.—

The race of Gods, or those we erring own
Are shadows flitting up and down
In all still abodes.

In all millions who have heard the voice, none ever saw the face
That wellknown voice speaks in all the languages......,

चवथ्या कडव्यांत सांसारिक उपाधींचा त्याग करून निर्विशेष निरहंकार मनःस्थिति प्राप्त करा म्हणजे अज्ञात, अंधुक व अस्पष्ट असें जें आहे तें ज्ञात, उघड व स्पष्ट होईल असा उपदेश केला आहे. या कडव्यांत 'तरी न तेथुनि वनमाला, आणायला, अटक तुम्हांला; मात्र गात हा मंत्र चला' या ठिकाणीं 'तरी तिथें वनपुष्पाला, नसे अडथळा, वेंचायाला, मात्र घेउनी संगें या' असें पाठांतर आहे. 'अटक' या शब्दापेक्षां 'अडथळा' हा शब्द अधिक सार्थ आहे. आणि 'मात्र घेउनी संगें या' या चरणांत चित्शक्तीच्या प्रभावानें तुम्हांस जें ज्ञात होईल तें सर्वांच्या आटोक्यांत येईल असें करा अशी सूचना आहे. "मात्र गात हा मंत्र चला" या चरणाला कांहीं अर्थ नाहीं! या कडव्यांत शेतकरी आणि जमीन यांची जी प्रतिमा योजली आहे, ती इमर्सन्‌मध्यें दृष्टीस पडते. निर्विशेष निरहंकार मनःस्थितीचा आणि चित्शक्तीचा मनुष्य लाखांत एकच! इमर्सन् म्हणतो :—

"The charming landscape which I saw this morning is undoubtedly made up of some twenty or thirty farms. Miller owns this field, Locke that, and Manning the woodland beyond. There is a property in the horizon which no man has seen but he whose eye can integrate all the parts, that is, the poet. This is the best part of these men's farms, yet to this their warranty-deeds gives no title."

पांचव्या कडव्यांत प्रकृति आणि पुरुष यांच्या क्रीडेचें व त्या क्रीडेंतील स्वरसंगमाच्या महतीचें वर्णन आहे. वस्तुतः या कडव्याचा संबंध तिसऱ्या कडव्याशीं असून त्याचा क्रम चवथा असावयास हवा होता. कारण तिसऱ्या कडव्यांतील 'अंधुक आकृति' या प्रकृति आणि पुरुष यांच्या क्रीडेच्या असून त्यांच्यांतला 'स्वरसंगम' हा त्या गात असलेल्या 'निगूढ गीतां'तून उत्पन्न झालेला आहे. 'प्रकृति' आणि 'पुरुष' ही परिभाषा अध्यात्मांतील आहे. पुरुष हा गुणातीत व विकाररहित असून नित्य प्रकृतीनें त्याच्याशीं क्रीडा केल्यामुळें त्रिगुणात्मक सृष्टीची सविकार घटना घडत असते. या घटनेचें ज्ञान आवश्यक आहे. हें ज्ञान अर्थातच जो 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिती'चा असेल त्यासच होतें आणि त्याच्याच चित्शक्तीला त्या 'स्वरसंगमां'तील सुंदरतेचा साक्षात्कार घडतो. तेव्हां ज्याला तो साक्षात्कार व्हावा असें वाटत असेल त्यानें ती मनःस्थिति प्राप्त करणें आवश्यक आहे.

या कडव्यांत 'प्रत ती ज्ञाता' बद्दल 'प्रत ती व्यक्ता' व 'वाडेंकोडें गा आतां' ऐवजीं 'गुंगत ही गा अव्यक्ता' अशीं पाठांतरें आहेत. तीं अर्थदृष्ट्या अधिक सरस आहेत. प्रकृति आणि पुरुष यांच्या क्रीडेंतील स्वरसंगमांत जी अव्यक्त सुंदरता आहे ती फक्त 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिती'लाच व्यक्त होऊं शकते. आणि ती व्यक्त झाली म्हणजे मग त्यानें आनंदांत आणि कौतुकांत गुंग होऊन त्या अव्यक्ताला गाण्याचें रूप द्यावें. शेक्सपियरच्या A Midsummer Night's Dream मधील

The poet's eye in a fine frenzy rolling
Doth glance from heaven to earth, from earth to heaven;
And, as imagination bodies forth
The forms of things unknown, the poets pen
Turns them to shapes, and gives to airy nothing
A local habitation and a name.

या कल्पनेशीं समानार्थक अशी ही कल्पना आहे. केशवसुतांचें 'अव्यक्त' किंवा 'अज्ञात' म्हणजे शेक्सपियरचें 'airy nothing.' या कडव्यांत 'प्रकृति', 'पुरुष' व 'वाडेंकोडें' हे शब्द आले आहेत. त्यांवरून केशवसुत ज्ञानेश्वरी चाळीत असावेत असें वाटतें.

सहाव्या म्हणजे शेवटच्या कडव्यांत सांसारिक संताप, ऐहिक उपाधी आणि व्यावहारिक विवंचना यांच्यापासून मुक्त असलेल्या 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिती'च्या तन्मयतेचें व परमानंदाचें वर्णन आहे. या कडव्यांत सूर्य, चंद्र व तारे यांच्या अज्ञात प्रदेशाचा व तेथील आनंदाचा जो निर्देश आहे तो इमर्सन्च्या The Daemonic and the Celestial Love मध्यें आढळतो.

Higher far,
Upward into the pure realm,
Over sun and star,
Over the flickering Daemon film
Thou must mount for love :

'खपुष्पा'च्या संकेतानें केशवसुतांनीं 'अप्राप्य अज्ञात' सूचित केलें आहे. आणि 'निःसंगपणा' या एकाच शब्दानें 'निर्विशेष निरहंकार मनःस्थिति' ध्वनित केली आहे. वस्तुतः हा 'निःसंगपणा' संपूर्ण हवा. परंतु केशवसुतांनीं त्याला 'जरा' म्हणजे 'थोडा' हें विशेषण अकारण जोडलें आहे. तें बहुधा 'धरा'शीं अनुप्रास साधण्यासाठीं आलें आहे. मात्र यापुढले 'मारा गिरके, मारा फिरके' किंवा 'नाचत गुंगत' हे संगीतात्मक चरण त्या परमानंदाच्या मनःस्थितीला सर्वथा अनुरूप व पोषक असे साधले आहेत.

केशवसुतांची प्रस्तुत चिंतनिका त्यांचे मित्र रेव्हरंड टिळक यांच्या फार आवडीची होती. केशवसुतांच्या निधनावरील कवितेंत त्यांनीं तिचा 'सोडीं पाहूं पुनरपि गड्या ! गोड तूझा झपूर्झा' असा उल्लेख केला आहे. Bee यांची 'पिंगा' ही चिंतनिका स्वतंत्र असली, तरी 'पिंग्या'ची कल्पना त्यांना 'झिम्म्या'वरून सुचली व स्फुरली आहे हें उघड आहे. केशवसुतांनीं आपल्या टीपेंत झपूर्झा ही दुर्बोध वाटूं नये अशी जी अपेक्षा प्रकट केली आहे, तिच्यामागें त्यांच्या मनांतील संशय व भय आहेत. केशवसुतांना

मनांतून या चिंतनिकेंत निर्विशेष निरहंकार मन:स्थिति, तिची चित्शक्ति, तिचें अज्ञातप्रदेश शोधण्याचें सामर्थ्य, तिला तेथें घडणारा सुंदरतेचा साक्षात्कार, त्यासाठीं आवश्यक असणारा नि:संगपणा हा विषय मांडावयाचा होता. तो मांडण्यासाठीं त्यांनीं मात्रिक पद्याचा अवलंब केला. आणि त्यांत नादमधुरता निर्माण व्हावी याकरितां पदोपदीं यमकांचा आश्रय घेतला. त्यामुळें पद्यांत आकर्षक संगीत निर्माण झालें. परंतु चिंतनिकेच्या सरळ अर्थामध्यें अडथळे उत्पन्न झाले. गोविंदाग्रज 'कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्रदेशा' असें म्हणतात तें अर्थातच चूक आहे. पुन्हां केशवसुतांनीं या चिंतनिकेंत इंग्रजी पद्धतीप्रमाणें प्रत्येक कडव्यांत नव्या व निराळ्या प्रतिमांची योजना केली आहे. Bee यांचा 'पिंगा' जसा सलग आहे, तसा केशवसुतांचा 'झिम्मा' सलग नाहीं. तो विलग आहे. आपल्याकडे अशा तऱ्हेची विलग रचनेची पद्धति नवीनच असल्यामुळें या चिंतनिकेच्या अर्थावर वादंग माजलें. ही चिंतनिका विचारपर असली, तरी तिचा आविष्कार भावनामय आहे. तो चित्तवेधक व्हावा यासाठीं तिला 'चाल' दिली आहे, आणि पालुपद जोडलें आहे. परंतु हा भावाविष्कार पहिल्या तीन कडव्यांच्या शेवटीं शेवटीं 'त्या अर्थाचे बोल कसे ?', 'त्या गीताचे ध्वनि निघति' आणि 'मात्र गात हा मंत्र चला' असा गद्यसदृश झाला आहे. शिवाय या चिंतनिकेमागील केशवसुतांची भूमिका कांहींशी शिक्षकी थाटाची झाली आहे. त्यामुळें तिच्यांत जागोजागीं 'मंत्र म्हणा' 'चला,' 'गा,' 'नाचा, 'गिरके मारा,' 'नि:संगपणा धरा' असे हुकूम आले आहेत. आणि अर्थबोधाबाबत या सर्वांपेक्षां अधिक अडचण निर्माण करणारी भानगड म्हणजे 'झपूर्झा' हा नवखा व अनोखा शब्द. टीपेंत त्याचा उलगडा आवश्यक होता. परंतु हे दोष जमेस धरूनदेखील केशवसुतांची ही चिंतनिका अपूर्व आहे. तिनें आधुनिक मराठी कवितेच्या क्षेत्रांत चिंतनिकांची मुहूर्तमेढ रोंवली. वस्तुतः तिच्या अर्थामध्यें कूटपर किंवा गूढपर असें कांहींहि नाहीं !

## सतारीचे बोल

[आधीं केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तींतला पाठ दिला असून तळटीपांत अनुक्रमें 'म' म्हणजे मासिक मनोरंजन, 'का' म्हणजे काव्यरत्नावलि व 'अ' म्हणजे अभिनव काव्यमाला यांच्यांतील पाठभेद नमूद केले आहेत.]

काळोखाची रजनी होती,
हृदयीं भरल्या होत्या खंती;
अंधारांतचि गढलें सारें
लक्ष्य, न लक्षी वरचे तारे;
विमनस्कपणें स्वपदें उचलित
रस्त्यांतुनि मी होतों हिंडत;

एका खिडकींतुनि सूर तदा
पडले–दिडदा, दिडदा, दिडदा !

जड हृदयीं जग जड हें याचा;
प्रत्यय होता प्रगटत साचा;
जड तें खोटें हें मात्र कसें
तें न कळे; मज जडलेंच पिसें
काय करावें, कोठें जावें,
तुमजे मजला कीं विष खावें !
मग मज कैसे रुचतील वदा
ध्वनि ते – दिडदा, दिडदा, दिडदा !

सोंसाट्याचें वादळ येतें,
तरि तें तेव्हां मज मानवतें;
भुतें भोंवतीं जरि आरडतीं
तरि तीं खचितचि मज आवडतीं;[१]
कारण आंतिल विषण्ण वृत्ती[२]
बाह्य भैरवीं धरिते प्रीति;[३]
सहज कसे तिज करणार फिदा
रव ते–दिडदा, दिडदा, दिडदा !

ऐकुनि ते मज जो त्वेष चढे,
त्यासरशीं त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मी हात हिसकला;
पुटपुटलोंही अपशब्दांला;[४]

---

१ तरि खचितचि तीं मज आवडतीं: } म.
,, ,, } का.
तरि तेव्हां तीं मज आवडतीं; अ.
२ कारण आन्तर विषण्ण वृत्ती अ.
३ बाह्य भैरवीं वृत्ती, प्रीती; का.
४ पुटपुटलों किति अपशब्दांला. अ

म्हटलें –" आटप, आटप मूर्खा ![५]
सतार फोडुनि टाकिसी न कां ?
पिरपिर कसली खुशालचंदा,
करिसी – दिडदा, दिडदा, दिडदा !"

सरलों पुढता चार पावलें;[६]
तों मज न कळे काय जाहलें;
रुष्ट जरी मी सतारीवरी
गति मम वळली तरि माघारी;
ध्वनिजालीं त्या जणूं गुतलों
असा स्ववशता विसरुनि बसलों —
एका ओव्यावरी स्थिर तदा
ऐकत–दिडदा, दिडदा, दिडदा.

तेथ कोंपरें अंकीं टेंकुनि
करांजलीला मस्तक देऊनि[७]
बसलों ; इतुक्यामाजी करुणा—
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां
आकर्षुन घे ; हृदय निवालें,
तन्मय झालें, द्रवलें ; आलें—
लोचनांतुनी तोय कितिकदां
ऐकत असतां–दिडदा, दिडदा !

स्कंधीं माझ्या हात ठेवुनी
आश्वासी मज गमलें कोणी,
म्हणे–" खेद कां इतुका करिसी ?
जिवास कां बा असा त्राससी ?
धीर धरी रे ! – धीरा पोटीं
असतीं मोठीं फळें गोमटीं !

---

५ वदलों –" आटप ! आटप मूर्खा ! अ.
६ सरलों पुरता चार पावलें अ.
७ करयुगलतलीं मस्तक देउन स. व का.

ऐक, मनींच्या हरितील गदा
ध्वनि हे–दिडदा, दिडदा, दिडदा ! ”

आशाप्रेरक निघूं लागले
सूर तधीं मीं डोळे पुशिले ;
वरती मग मीं नजर फिरविली,
नक्षत्रें तों अगणित दिसलीं ;[८]
अस्तित्वाची त्यांच्या नव्हती
हा वेळवरी दादच मज ती !
“ तम अल्प–द्युति बहु ” या शब्दां
वदती रव ते–दिडदा, दिडदा !

वाद्यांतुनि त्या निघती नंतर[९]
उदात्ततेचे पोषक सुस्वर ;[१०]
तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी ;
दिक्कालांसहि अतीत झालों;
उगमीं विलयीं अनंत उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां
ऐकत असतां दिडदा, दिडदा !

प्रेमरसाचे गोड बोल ते
वाद्य लागतां बोलायातें,
भुललों देखुनि सकलहि सुंदर;
सुरांगना तों नाचति भूवर
स्वर्गधरेला चुंबायाला
खालीं लवला–मजला गमला
अशा वितरिती अत्यानंदा
ध्वनि ते दिडदा, दिडदा, दिडदा !

---

८ नक्षत्रें तों असंख्य दिसलीं; का.
९ उदात्ततेसी पोषक नंतर
१० वाद्यांतुनि त्या निघती सुस्वर } म.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३८९ ...... वि: ............

शान्त वाजली गती शेवटीं
शान्त धरित्री, शान्त निशा ती,[११]
शान्तच वारे, शान्तच तारे,
शान्तच हृदयीं झालें सारें !
असा सुखें मीं सदना आलों,[१२]
शान्तींत अहा ! झोंपीं गेलों
बोल बोलल्ों परी कितिकदां
स्वप्नीं–दिडदा, दिडदा, दिडदा.

'सतारीचे बोल' ही केशवसुतांची दुसरी चिंतनिका. तिच्याखालीं २० मार्च १९०० असा कालनिर्देश आहे. परंतु स्थलनिर्देश नाहीं. ही चिंतनिका प्रथम फेब्रुवारी १९०० च्या 'मासिक मनोरंजनां'त, नंतर फेब्रुवारी १९०२ च्या 'काव्यरत्नावलीं'त व पुढें केशवसुतांच्या निधनानंतर १९०९ मध्यें ल. ग. लेले यांनीं संपादिलेल्या 'अभिनव काव्यमाले'च्या पहिल्या भागांत प्रसिद्ध झाली आहे. केशवसुतांच्या कवितासंग्रहांतील या चिंतनिकेच्या पाठांत आणि वरील तीन प्रकाशनांच्या पाठांत क्वचित् थोडें अंतर आहे. त्याला कारण त्या त्या प्रकाशनांच्या संपादकांचा अधिकार असावा. परंतु हीं पाठांतरें अर्थबोधाच्या दृष्टीनें महत्त्वाचीं नसल्यामुळें प्रस्तुत त्यांची चर्चा टाळली आहे. मार्चमध्यें लिहिलेली चिंतनिका फेब्रुवारीच्या 'मनोरंजनां'त आली याला कारण तत्कालीन नियतकालिकांचा अनियमितपणा. 'मनोरंजना'च्या १९०० च्या बांधील पुस्तकाच्या प्रारंभीं लेखकांची नामग्रामसूचि आहे. तिच्यांत 'कृष्णाजी केशव दामले–भडगांव,' असा निर्देश आहे. तेव्हां ही चिंतनिका भडगांवला लिहिली गेली हें उघड आहे. 'केशवसुत' या काव्यनामानें 'मनोरंजनां'त प्रसिद्ध झाली अशी हीच पहिली कविता. हिच्यापूर्वींच्या कविता निनांवी आहेत. झ पू र्झा या पहिल्या चिंतनिकेच्या आणि या दुसऱ्या चिंतनिकेच्या लेखनकाळांत जवळजवळ सात वर्षांचें अंतर आहे. या सात वर्षांच्या अवधींत केशवसुतांचें मन अधिकाधिक तत्त्वप्रवण आणि चिंतनशील झालें आहे. मात्र त्यांच्या चिंतनाची आविष्कृति काव्यमय असल्यामुळें त्यांची 'कवि' ही भूमिका कायम आहे. ते 'एक चिंतक कवि' (A thinker poet) आहेत. झ पू र्झा पेक्षां सतारीचे बोल ही चिंतनिका अधिक वेधक, उद्बोधक व प्रभावोत्पादक आहे.

इंग्रजी वाङ्मयांत जॉन ड्रायडनच्या 'A Song For Cecilias Day; 22 November 1687 आणि 'Alexander's Feast or, The Power of Music–A Song In Honour of Cecilias Day 1697' या संगीतमहोत्सवाप्रीत्यर्थ रचलेल्या दोन प्रासंगिक कविता अंतर्गत

---

११ शान्त धरित्री, शान्त निशीथी. का.

१२ शान्त सुखें मी सदना आलों. अ.

संगीतामुळें अतिशय लोकप्रिय आहेत. यांपैकीं दुसऱ्या कवितेवरून केशवसुतांना ' सतारीचे बोल ' ही चिंतनिका स्फुरली असें प्रि. राजवाडे यांचें म्हणणें आहे. [मनो. ७|८|१०|११|१९२०] परंतु ती कविता वाचून पाहिल्यास केशवसुतांच्या चिंतनिकेशीं तिचा संबंध तिळमात्र आढळत नाहीं. ड्रायडनच्या

' Happy, happy, happy pair !
None but the brave
None but the brave
None but the brave
Deserves the fair '

कवितेंतलें हें त्याच त्या शब्दांच्या पुनरावृत्तीचें पालुपद आणि केशवसुतांच्या कवितेचें त्याच्यासारखेंच ' दिडदा दिडदा दिडदा दिडदा ' हें पाक्षुपद आणि त्या व या कवितेमधले ' Now strike the golden lyre again ' व ' शान्त वाजली गती शेवटीं ' हे कांहींसे सारखे चरण यांपेक्षां या दोन कवितांत अधिक साम्य नाहीं. ड्रायडनच्या कवितेचा विषय ' वाद्यवादनाचा भिन्न भिन्न श्रोत्यांच्या मनावरचा प्रभाव व त्यामुळें त्यांचे उचंबळलेले हृदयभाव ' हा आहे. केशवसुतांच्या चिंतनिकेचा विषय ' अव्यक्त व अरूप अशा आत्मतत्त्वाचा साक्षात्कार ' हा आहे. मूळ कवितेंत वाद्यवादन प्रमुख आहे. केशवसुतांच्या चिंतनिकेंत तें केवळ निमित्तमात्र आहे. ड्रायडनची कविता केशवसुतांनीं कदाचित् वाचलीहि असेल. परंतु त्यांची चिंतनिका पूर्णतया स्वानुभूतिपूर्ण व मौलिक आहे.

केशवसुतांच्या चिंतनिकेचा मुख्य विषय ' आत्मतत्त्वाचा साक्षात्कार ' हा असला, तरी त्याच्या अनुषंगानें तिच्यांत ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या,' ' अद्वैतानन्द,' ' तत्त्वमसि ' आणि आत्म्याचें अमृतत्व हे विषयहि ओघांत आले आहेत. हे विषय गीतेंत आहेत. परंतु केशवसुतांना ते इमर्सनच्या ' Nature ', ' The Method of Nature,' 'Self-Reliance' 'The Over-Soul,' 'Immortality' इत्यादि निबंधांवरून स्फुरले आहेत. वस्तुतः या विषयांच्या विवेचनांत आशा, निराशा व धैर्य यांचें प्रतिपादन येण्याचें कारण नाहीं. परंतु केशवसुतांनीं चिंतनिकेचा कांहीं भाग त्याला दिला आहे. त्यामुळें या चिंतनिकेचा विषय ' निराशेंतून आशेचा दउय ' हा आहे, असा कांहीं विमर्शकांचा अपसमज झाला आहे.

या चिंतनिकेचे स्वाभाविक चार भाग पडतात. पहिला भाग पहिल्या चार कडव्यांचा आहे. या भागांत केशवसुतांचा ' विषादयोग ' आहे. जीवनांतील कोणत्यातरी अन्याय्य घटनेमुळें त्यांची वृत्ति विषण्ण झाली आहे.) ते उद्विग्न होऊन उद्गारतात, ' काय करावें ? कोठें जावें ? तुमजे मजला कीं विष खावें ! ' परंतु या विमनस्कपणाचें कारण ते सांगत नाहींत. तें त्यांच्या चरित्रांत त्यांचे बंधु सी. के. दामले सांगतात;— " खानदेशांत म्युनिसिपालिट्यांच्या अँग्लो व्हर्नाक्युलर शाळांमध्यें केशवसुतांची नोकरी असल्यामुळें लहानसहान गांवांतील म्युनिसीपालिटीचे मेंबर कधीं

कधीं त्यांच्यावर बारीकसारीक बाबतींत बराच जुलूम करीत असत. शाळेंतील मास्तरांनीं आपल्या मुलांना घरीं येऊन फुकट जादा शिकविण्याचें काम करावें अशीदेखील कांहीं मेंबरांची इच्छा असे. परंतु अशा तऱ्हेचें काम करून मेंबरसाहेबांची मर्जी संपादण्याइतका मृदु व गुलामगिरीस शोभणारा केशवसुतांचा स्वभाव नव्हता. यामुळें कित्येक वजनदार परंतु क्षुद्र मनोवृत्तीचे स्थानिक गृहस्थ त्यांच्यावर नाराज असत. त्यामुळें नौकरींत बढती मिळण्याचा संभव कधीं आला तर तो नाहींसा होत असे. एक्दोनदां तर नौकरीहि जाण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला." [ केशवसुत--कवितासंग्रह व चरित्र; १९२१ ची आवृत्ति; पृ. १३ ] केशवसुतांच्या आयुष्यांत, योगक्षेमाच्या शोधांत केलेलीं स्थलांतरें बरींच आहेत. वरील त्रागयाच्या उद्‌गारांनंतर त्यांना भडगांवाहून फैजपुराला व फैजपुराहून धारवाडला स्थलांतर करावें लागलें. 'धन न करीं, वणवण करितों। जम कोठें नीट जमेना', अशी त्यांची 'फिर्याद' आहे. तेव्हां भडगांवच्या वास्तव्यांत या चिंतनिकेच्या लेखनकालीं त्यांच्यावर कोणता तरी कठोर प्रसंग गुदरला असावा असा कयास केला, तर तो चुकेल का? त्या विमनस्क स्थितींत वणवणत असतांना सतारीचे सुस्वर त्यांच्या कानीं पडतात. पण त्यामुळें विसंवाद उत्पन्न होऊन त्यांना विषाद वाटतो. त्या अस्वस्थ व संत्रस्त मनःस्थितींतहि त्यांच्या 'जडहृदयां'त 'जड तें खोटें हें मात्र कसें?' हा विचार चालू असतो. विचार करतां करतां त्यांना वेड लागण्याची पाळी येते!

। या ठिकाणीं केशवसुतांनीं 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सिद्धान्ताचाच भावानुवाद केला आहे. 'जगा'ला त्यांनीं आधीं 'जड' म्हटलें असून पुढें 'जड तें खोटें हें मात्र कसें?' असा प्रश्न उपस्थित केला आहे. 'जड' हा शब्द त्यांना उघड उघड इंग्रजींतील जडवादापासून ( materialism ) सुचला आहे. 'जड हृदयीं, जग जड हें याचा' या एकाच ओळींत त्यांनीं 'जड' हें विशेषण अगोदर 'मूढ' या अर्थीं योजिलें असून नंतर 'नाशिवंत' या अर्थीं योजिलें आहे. जग हें 'नाशिवंत' असलें, तरी 'खोटें' कसें? हा त्यांच्यापुढें प्रश्न आहे. आणि म्हणून ते हॅमलेटच्या 'To be or not to be' प्रमाणें 'नुमजे मजला कीं विष खावें' अशी वैतागाची भाषा बोलत आहेत.) केशवसुतांनीं हॅमलेट नाटक वाचलें होतें, हें 'कल्पकता' या त्यांच्या कवितेवरील टीपेवरून उघड आहे. 'जड जग हें खोटें कसें?' हा प्रश्न केशवसुतांना सुटला नाहीं, याचें कारण, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सिद्धान्तांतील 'मिथ्या' या शब्दाचा खरा अर्थ त्यांच्या ध्यानांत आला नसावा. 'मिथ्या'चे चार प्रकार संभवतात; पहिला प्रकार शशशृंगाचा; म्हणजे ज्याचें अस्तित्वच नाहीं असा. दुसरा प्रकार स्वप्नाचा; म्हणजे सुषुप्तींत ज्याचें अस्तित्व जाणवतें परंतु जागृतींत नष्ट होतें असा. तिसरा प्रकार मृगजलाचा; म्हणजे निव्वळ आभासात्मक असा. आणि चवथा प्रकार म्हणजे ज्याच्या मनाची जशी कल्पना असेल असा।'जग हें मिथ्या आहे' याचा अर्थ एवढाच कीं, त्याला परब्रह्माशिवाय ( म्हणजे आत्मतत्त्वाशिवाय ) स्वतंत्र असें निराळें अस्तित्व नाहीं. परब्रह्म हेंच एकमेव सत्य आहे, आणि नामरूपात्मक जग हें विकारी व विनाशी असल्यामुळें मिथ्या आहे.।

यानंतर केशवसुतांनीं 'कारण आंतिल विषण्ण वृत्ति। बाह्य भैरवीं धरिते प्रीति' या सुभाषितासारख्या दिसणाऱ्या चरणयुग्मांत 'सुसंवादांत आनंद आहे' हा सिद्धान्त मांडला आहे. परंतु तो विशद करतांना सोसाट्याचें वादळ व भुतें यांचे जे दृष्टान्त दिले आहेत, ते क्षणिक विकारांचे आहेत. किंबहुना जो सिद्धान्त मांडला आहे, तोच विषण्णतेसारख्या क्षणिक विकृतीला उपमान करून मांडला आहे. वस्तुतः त्यांना द्वैतामुळें विषाद व अद्वैतामुळें आनंद उत्पन्न होतो हा सिद्धान्त विशद करावयाचा होता. परंतु तो स्पष्ट करतांना त्यांनीं सतारवादनाच्या प्रसंगाचें निमित्त केल्यामुळें त्यांचें लक्ष वादनांतील सुसंवादाच्या ( harmnoy ) तत्त्वाकडे वेधलें गेलें, आणि सुसंवादालाच ते चुकून अद्वैत ( unity ) समजले. वस्तुतः 'सुसंवाद' हा दोन विभिन्न वस्तूंच्या एकतेंत असतो; आणि 'अद्वैत' हें एकाच वस्तूच्या भिन्न भिन्न अंशांत असतें. 'सुसंवाद' व 'अद्वैत' यांच्यांतला हा सूक्ष्म भेद बाजूस ठेवला, तर केशवसुतांनीं या ठिकाणीं सुसंवादाच्या सिद्धान्ताच्या निमित्तानें अप्रत्यक्षरीत्या अद्वैतदर्शन घडवलें आहे !

केशवसुतांच्या पिढींत श्रीशंकराचार्यांच्या 'चर्पटपंजरिका' व 'मोहमुद्गर' या काव्यमय तात्त्विक स्तोत्रांचा पाठ करण्याचा परिपाठ होता. आचार्यांनीं हीं स्तोत्रें 'पादाकुलक' वृत्तांत रचिलीं आहेत. केशवसुतांनींहि आपली चिंतनिका 'पादाकुलकां'त लिहिली आहे. 'भज गोविंदं भज गोविंदं भज गोविंदं मूढमते !' या आचार्यांच्या ध्रुवपदाप्रमाणेंच 'दिडदा दिडदा दिडदा दिडदा !' हें केशवसुतांच्या चिंतनिकेचें ध्रुवपद आहे.केशवसुतांना कदाचित् आचार्यांचीं हीं स्तोत्रें ऐकूनच 'पादाकुलक' वृत्ताचें व ध्रुवपदाचें अनुकरण करण्याची स्फूर्ति झाली असावी. परंतु आचार्यांचे सिद्धान्त मांडतांना केशवसुत 'ब्रह्म', 'मिथ्या', 'द्वैताद्वैत' इत्यादि परिभाषेचा उपयोग कां करीत नाहींत असा प्रश्न पडतो. गीतेंतलेच सिद्धान्त परंतु ते मांडतांना केशवसुत 'जडवाद' ( materialism ) आणि 'सुसंवाद' ( harmony ) या पाश्चात्य सिद्धान्तांचा अवलंब करतात, आणि अर्जुनाप्रमाणें 'कर्म' व 'अकर्म' यांची भाषा न बोलतां हॅमलेटप्रमाणें आत्महत्येची भाषा बोलतात. म्हणून असें वाटतें कीं, त्यांच्या या चिंतनिकेचें मूळ त्यांच्या इंग्रजी विद्याव्यासंगांत–विशेषतः इमर्सनच्या निबंधांत असावें.

या चिंतनिकेचा दुसरा भाग पांच ते सात या कडव्यांचा आहे. पहिल्या भागांतील विषण्ण मनःस्थितीशीं तो संबद्ध आहे. या भागांत केशवसुतांच्या विमनस्कतेची प्रसन्नतेंत परिणति होते. 'काय करावें ? कोठें जावें ?' असें त्यांच्या मनांत द्वंद्व असतें. तें क्षणिक विकृतीचें असल्यामुळें लवकरच लोप पावतें, आणि सतारीचे सुस्वर स्वर त्यांचें निर्मळ व निरामय मन आकर्षून तें आपल्या 'ध्वनिजालां'त गुंतवून ठेवतात. अशा रीतीनें 'संगीतं परिमार्ष्टि मानसमलं संसारकर्मोद्भवम्' या उक्तीची सार्थकता त्यांच्या प्रत्ययास येते. केशवसुतांनीं या ठिकाणीं 'स्ववशतेच्या विस्मृती'चें आणि 'वृत्तीच्या तन्मयते'चें वर्णन केलें आहे, तें झपूर्झामधील 'स्वरसंगमा'शीं आणि 'निरहंकार निर्विशेष मनःस्थिती'शीं समान आहे. 'असा स्ववशता विसरुनि बसलों' व 'हृदय निवालें, तन्मय

झालें ' या शब्दांत केशवसुतांनीं आपल्या ठिकाणच्या ' अहम् ' चा ( ego ) लोप होऊन आपणांस ' अद्वैता ' ची अनुभूति कशी आली हें अतिशय कुशलतेनें ध्वनित केलें आहे. ' अहम् ' चा निरास झाल्याशिवाय ' परब्रह्मा 'चा म्हणजे ' आत्मतत्त्वा 'चा साक्षात्कार होत नाहीं हें त्यांनीं ' ध्वनिजाल ' या विशिष्ट शब्दानें सूचित केलें आहे. ' ध्वनिजाला 'ची कल्पना त्यांना कदाचित् इमर्सनच्या ' circles ' या निबंधावरून स्फुरली असावी. ' अखण्डमण्डलाकारं व्याप्ताव्याप्त–चराचरम् ' ही परब्रह्मासंबंधींची उक्ति तर सर्वश्रुत आहे.

या दुसऱ्या भागाच्या अखेरीस केशवसुतांनीं ' धीर धरी रे ! धीरा पोटीं । असतीं मोठीं फळें गोमटीं ' आणि ' तम अल्प–द्युति बहु ' असा थोडा व्यावहारिक वेदान्तहि आणला आहे. त्याचें विवेचन करतांना न कळत त्यांचा शिक्षकी थाट प्रकट झाला आहे. ' धीर ' हा शब्द त्यांनीं ' चिकाटी ' करितां ( perseverance ) योजिला आहे. ' तम ' व ' द्युति ' हीं त्यांचीं उपमानें ' विकृति ' व ' प्रकृति ' यांच्यासाठीं निर्माण झालीं असावीं. कारण ' विकृति ' ही ' अल्पकालीन, व ' प्रकृति ' ही चिरकालीन असते. परंतु त्यांत कालवाचक शब्द नसल्यानें तीं उपमानें अनुक्रमें ' निराशा ' व ' आशा ' यांचीं द्योतक बनलीं असावीं. वस्तुतः व्यवहारांतला अनुभव तुकारामांच्या ' सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ' या वचनानुसार असावयास हवा. परंतु केशवसुतांचें लक्ष जीवनाकडे पाहण्याचा जो एक निकोप दृष्टिकोन त्याकडे वळल्यामुळें त्यांच्या मुखानें मध्येंच सहजगत्या ' आशावादा ' ची आणि त्यास विरोधी असणाऱ्या ' निराशावादा ' ची काव्यमय मीमांसा बाहेर पडली असावी. तत्त्वदृष्ट्या पाहिल्यास ' आशा ' व ' आनंद ' याच वृत्ति जगाच्या मुळाशीं आहेत. तेव्हां खोट्या निराशेकरितां ' अल्प ' व खऱ्या आशेकरितां ' बहु ' हीं विशेषणें अनावश्यक आहेत ! परंतु केशवसुतांची भावना आतुर व उत्कट असल्यामुळें हें व्यावहारिक चिंतनहि हृदयंगम झालें आहे.

या चिंतनिकेचा तिसरा भाग नऊ व दहा या दोन कडव्यांचा आहे. त्यांपैकीं नवव्या कडव्यांतील तीन ते सात या अनुभूतिगर्भ ओळी तर या चिंतनिकेस केवळ प्राणभूत आहेत. त्या उदात्त ओळींत केशवसुतांनीं आपल्या ठिकाणचा संकुचित, स्वार्थी व क्षुद्र ' अहम् ' पूर्णतया गळून जातांच हृदयाच्या अंतर्गत वसणाऱ्या ' विभूतिमत्त्वा 'चा म्हणजे ईश्वरीय अंशाचा उदय कसा झाला हें कथन केलें आहे. ईश्वरीय अंशाचा उदय म्हणजेच ' आत्मतत्त्वा 'ची प्रतीति होय. त्या आत्मतत्त्वाला दिशा आणि काळ यांचें बंधन नाहीं. त्याला आदि नाहीं आणि अन्त नाहीं. तें सर्वत्र सतत आहे. केशवसुतांना त्याचा ओझरता स्पर्श होतांच त्यांच्या अंतःकरणामधले सारे भेदभाव पार वितळून गेले : आणि त्यांना अभेदाची म्हणजे ' अद्वैता ' ची ओळख पटली. अमर आशा, अखंड आनंद आणि अविचल शांति यांचें वितरण करणाऱ्या या आपल्या आत्मसाक्षात्काराचें निवेदन केशवसुतांनीं सुस्पष्टपणें फारच थोड्या शब्दांत अत्यंत परिणामकारक रीतीनें केलें आहे. त्या निवेदनांतील उत्कट आवेग व अमोघ ओघ प्रेक्षणीय आहेत ;

वायांतुन त्या निघती नंतर
उदात्ततेचे पोषक सुस्वर;
तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी;
दिक्कालांसहि अतीत झालों;
उगमीं विलयीं अनंत उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां

केशवसुतांच्या आत्मसाक्षात्काराच्या या निवेदनांत 'अहं ब्रह्मास्मि' किंवा 'तत्त्वमसि', 'आत्म्याचें अमृतत्व' आणि 'अद्वैत' या सिद्धांतांचा सन्निवेश झाला आहे. 'विभूति', 'विश्व' 'दिक्काल', 'अतीत', 'अनंत', 'अखिल' इत्यादि शब्दहि कळत न कळत वेदांताच्या परिभाषेंतील पडले आहेत. केशवसुतांची हीच अनुभूति इमर्सन पुढील प्रकारें सांगतो;—'Standing on the bare ground, my head bathed by the blithe air, and uplifted into infinite space, all mean egotism vanishes. I become a transparent eyeball. I am nothing; I see all; the current of the universal Being circulated through me. I am part and parcel of God. The name of the nearest friend sounds then foreign and accidental; to be brothers, to be acquaintances—master or servant, is then a trifle and disturbance. I am the lover of uncontained and immortal... हें 'तत्त्वमसि'-संबंधीं झालें. आत्म्याच्या अमरत्वासंबंधीं तो म्हणतो;—'The soul is not born; it does not die; it was not produced from anyone; nor, was any produced from it. Unborn, eternal, it is not slain, though the body is slain.......'[1] 'तों मज गमलें विभूति माझी । स्फुरत पसरली विश्वामाजी' हा केशवसुतांचा अनुभव 'अणोरणीयान्' या उक्तींत सांठवला आहे. यासंबंधीं इमर्सन म्हणतो, 'Universe is represented in atom in a moment of time...'[2] 'उगमीं विलयीं अनंत उरलों' ही केशवसुतांची आत्म्याच्या अमृतत्वाविषयींची अल्पाक्षरबह्वर्थक कल्पना वाचतांना ज्ञानेश्वरांच्या पुढील ओवीचें स्मरण होते;—

'जे आदि, स्थिति, अंतु । हा निरंतर असे नित्यु । जैसा प्रवाहो अनस्यूतु । गंगाजलाचा' ॥ २/५३

---

१ यासंबंधींचे गीतेंतले श्लोक :—
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः । उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ २/१६
य एनं वेत्ति हतारं यश्चैनं मन्यते हतम् । उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ २/१९

दहाव्या कडव्यांत केशवसुतांनीं अद्वैताच्या आनंदाचें रसाळ वर्णन केलें आहे. 'वाद्यांतुन त्या निघती नंतर । उदात्ततेचे पोषक सुस्वर' असें नववें कडवें 'उदात्त' (sublime) आहे. तर 'भुललों देखुन सकलहि सुंदर' असें दहावें कडवें 'सुंदर' (beautiful) आहे. अद्वयाच्या आनंदाची परिसीमा दाखवतांना केशवसुतांनीं सुरांगनांच्या नर्तनाचा उल्लेख केला असून स्वर्ग धरेचें चुंबन घेण्यासाठीं खालीं लवला असें अद्‌भुत वर्णन केलें आहे. आनंदाच्या अभिव्यक्तीसाठीं केशवसुतांनीं थोडी अतिशयोक्ति पत्करून जुन्या प्रतिमांचा अवलंब केला असला, तरी तो नव्या कल्पनांनीं आणि निराळ्या अभिव्यक्तींनीं अधिक आकर्षक व हृदयंगम झाला आहे !

या चिंतनिकेचा चवथा भाग अकराव्या कडव्याचा आहे. त्यांत केशवसुतांनीं मन:शांतीचें वर्णन सतारीच्या शेवटच्या गतीप्रमाणें शांततेनें केलें आहे. 'ॐ शांतिः शांतिः शांतिः' या त्रिवार घोषणेचा परिणाम जसा मन:शांतींत होतो, तसाच तो या कडव्यांतील पुनरुच्चारित 'शांत' या विशेषणानें होतो.

केशवसुतांची ही चिंतनिका केवळ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेंच नव्हे, तर कलेच्या दृष्टीनेंहि अतिशय सरस व सुंदर साधली आहे. केशवसुतांना कलेचें वावडें होतें. परंतु या चिंतनिकेचा आरंभ विषण्ण मन:स्थितीला उठाव मिळेल अशा काळोख्या रजनीच्या अंधाराच्या वर्णनानें झाला आहे. चिंतनिकेच्या मध्यभागीं विषण्णतेला कलाटणी मिळते व प्रसन्नतेचा उदय होतो. सुरुवातीस 'अंधारांतच गढलें सारें । लक्ष्य न लक्षी वरचे तारे' असें जें वर्णन आहे, त्याला त्या ठिकाणीं 'वरती मग मीं नजर फिरविली । नक्षत्रें तों अगणित दिसलीं' अशी अत्यंत सूचक कलाटणी मिळाली आहे. चिंतनिकेचा शेवट 'शांत वाजली गती शेवटीं । शांत धरित्री, शांत निशा ती । शांतच तारे, शांतच वारे । शांतच हृदयीं झालें सारें' अशा रीतीनें पायरी-पायरीनें शांत वातवरणांत व शांत मन:स्थितींत झाला आहे. त्यामुळें ही एकंदर चिंतनिका मोठी प्रभावी झाली आहे.

केशवसुतांची वाणी अनलंकृत आहे असा जो कांहीं समीक्षकांचा दावा आहे तो या चिंतनिकेनें खोटा ठरतो. 'ऐकुनी तो मज जो लेष चढे' व 'तेथ कोपरें अंकीं टेकुनि' या दोन स्थळीं केशवसुतांनीं साध्या म्हणून सरस अशा स्वभावोक्ति साधल्या असून 'स्कंधीं माझ्या हात ठेवुनी । आश्वासी मज गमलें कोणी', आणि 'प्रेमरसाचे गोड बोल ते । वाच लागतां बोलायातें' या दोन स्थळीं चेतनारोपोक्ति निर्मिल्या आहेत. 'ध्वनिजालीं त्या जणूं गुंतलों' आणि 'उगमी विलयीं अनंत उरलों' या दोन्ही चरणांत रूपकांच्या छायाछटा असून पहिल्यांत तर थोडी उत्प्रेक्षेचीहि छटा आहे. 'हृदय निवालें, तन्मय झालें', 'स्वर्ग धरेला चुंबायाला' आणि 'शांत वाजली गती' या चरणांतून सहजगत्या अनुप्रास साधल्यामुळें त्यांच्या शब्दरचनेंत एक प्रकारचें सुरेल संगीत संचारित झालें

---

२ ह्याच अनुभव तुकारामांच्या अभंगवाणींत आहे,—
'अणू हूनी थोकडा । तुका ब्रह्मांडायेवढा ।'

आहे. या चिंतनिकेकरितां योजलेलें 'पादाकुलक' हें वृत्त सोळा मात्रांचें असल्यामुळें स्वभावतः त्यांचे चारचार मात्रांचे तुकडे पडून शब्दरचनेंत सौष्ठव व संगीत उत्पन्न झालें आहे. या वृत्ताच्या प्रत्येक कडव्यांत आठ समचरण योजल्यामुळें त्याच्या आकृतीस एका प्रकारचें प्रमाणबद्ध सौंदर्य प्राप्त झालें आहे. यांशिवाय 'पुटपुटलों,' 'पिरपिर' व 'डिडदा' या ध्वन्यनुकारी शब्दांनींहि संगीतांत भर पडली आहे. 'संगीतात्मक विचार म्हणजे काव्य' असें कार्लाइल म्हणतो तें या चिंतनिकेबाबत सार्थ झालें आहे.

या चिंतनिकेंत रसांच्याहि अंशात्मक छायाछटा कांहीं कमी नाहींत. 'सोसाट्याचें वादळ येतें' यांत विषण्ण मनःस्थितीला पोषक असा भयानक रस आहे. 'करुणारसपूर्ण गती' यांत करुणरस आहे. मात्र तो रडका नसून 'कारुण्या'च्या ( compassion ) स्वरूपाचा आहे. 'वाद्यांतुन त्या निघती नंतर' यांत उदात्त रस आहे. 'प्रेमरसाचे गोड बोलते' यांत प्रारंभीं प्रेयोरस असून पुढें अद्भुतरस आहे. आणि 'शांत वाजली' यांत शांतरस आहे.

या चिंतनिकेचा एक विशेष असा कीं, ती ऐकत असतांना कांहीं पूर्वपरिचित सुभाषितांचें, शब्दांचें व कल्पनांचें स्मरण होऊन सुसंस्कृत मनास एक तऱ्हेचा विशेष आनंद होतो. उदाहरणार्थ, 'धीर धरी रे ! धीरापोटीं । असतीं मोठीं फळें गोमटीं' हे चरण तुकारामांच्या 'शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं' या अभंगवाणीची आठवण करून देतात, तर 'खुशालचंद' हा शब्द आगरकरांच्या लेखांची स्मृति करून देतो. आगरकरांनीं 'easy-going' ला 'खुशालचंद' हा प्रतिशब्द म्हणून वापरला आहे. या चिंतनिकेंतील 'तम अल्प घति बहु,' 'कारण आंतिल विषण्ण वृत्ती । बाह्य भैरवीं धरिते प्रीती' इत्यादि चरण सुंदर सुभाषितांसारखे आहेत.

केशवसुतांची ही चिंतनिका लक्ष्मणशास्त्री लेले, विनायक व बालकवि यांना फार प्रिय होती. 'अभिनव काव्यमाले'च्या पहिल्या भागांत या चिंतनिकेचा अंतर्भाव केला आहे. विनायकांची 'सुवास' ही कविता उघड उघड प्रस्तुत चिंतनिकेवरून स्फुरली आहे. केशवसुतांचा आरंभ 'विमनस्कपणें स्वपदें उचलित । रस्त्यांतुन मी होतों हिंडत' असा आहे, तर विनायकांचा आरंभ 'हिंडत असतां निर्जन रानीं । स्वैरगतीनें गुंगत गाणीं' असा आहे. केशवसुतांच्या कानीं सतारीचे स्वर पडतात, तर विनायकांच्या 'घ्राणीं मधुर सुवास' येतो. केशवसुत 'काय करावें कोठें जावें ?' असें पुसतात, तर विनायक 'काय पहावें ? काय पहावें ?' असा प्रश्न करतात. केशवसुतांच्या कवितेंत 'डिडदा डिडदा' अशी जशी पुनरावृत्ति आहे, तशीच ती 'व्यर्थ हिंडलों झालों वेडा । वेडा वेडा वेडा वेडा' अशी विनायकांच्या कवितेंत दृष्टीस पडते. बालकवींच्या 'फुलराणी'चा 'लग्न लागतें सावध सारे । सावध पक्षी, सावध वारे' हा शेवट आणि केशवसुतांचा 'शांतच तारे, शांतच वारे । शांतच हृदयीं झालें सारें' हा शेवट यांत विलक्षण साम्य आहे !

केशवसुतांची ही चिंतनिका सर्वथैव निर्दोष आहे असें नाहीं. 'सतारीचे बोल' हा प्रयोग चुकीचा आहे. 'बोल' तबल्याचे असतात. सतारीचे स्वर असतात. प्रस्तुत चिंतनिकेंत एक दोन ठिकाणीं त्यांनीं 'स्वर' व 'गति' हे पारिभाषिक शब्द योजिले आहेत.

परंतु ' स्वर ' या शब्दाला प्रतिशब्द म्हणून ' बोल ', ' सूर ' ' ध्वनि ' आणि ' रव ' व ' विषण्णते 'ला प्रतिशब्द म्हणून ' खंती ', ' विमनस्कपणा ', ' रुष्टता ', ' खेद ' आणि ' त्रास ' ही जी शब्दांची मनमुराद पखरण केली आहे, ती ते शब्दयोजनेच्या बाबतींत चोखंदळ नव्हते हेंच दाखविते. दुसरा दोष असा कीं, ही चिंतनिका आदिपासून अन्तापर्यंत एकसंध नाहीं. चवथ्या व पांचव्या कडव्यांचा संबंध निराशेकडून आशेकडे म्हणून कसाबसा जुळला तरी आहे; परंतु आठव्या व नवव्या कडव्यांचा संबंध ' वाघांतुन त्या निघती नंतर ' अशा रीतीनें ओढून ताणून जोडावा लागला आहे. पुन्हां ' आश्वासी मज गमलें कोणी ', ' तों मज गमलें विभूति माझी ', ' खालीं लवला, मजला गमला ' इत्यादि ठिकाणीं ' गमणें ' हें क्रियापद योजल्यामुळें वृत्तीच्या एकतानतेचा कांहीं अंशीं भंग झाला आहे. परंतु चिंतनिकेच्या एकंदर गुणवत्तेचा विचार करतांना हे दोष अगदींच उपेक्षणीय आहेत. आधुनिक मराठी कवितेंत ज्या थोड्या सर्वोत्तम व सर्वोत्कृष्ट कविता आहेत, त्यांत या चिंतनिकेचा अन्तर्भाव निःसंशय आहे. तिचा विषय जितका उदात्त, तितकीच त्याची मांडणी कलापूर्ण असून, आविष्कार उत्कट आहे. त्यामुळें ही चिंतनिका चिररमणीय व अविस्मरणीय झाली आहे!

## ' कोणीकडून ? कोणीकडे ? '

[ आधीं केशवसुतांच्या कवितासंग्रहांतील पाठ दिला असून तळटीपांत अनुक्रमें ' म ' म्हणजे मासिक मनोरंजन व ' का ' काव्यरत्नावलि यांचे पाठभेद दिले आहेत. ]

कोणीकडून ? कोणीकडे ?
इकडून तिकडे, म्हणती गडे;
येथुनि तेथें, मागुनि पुढें,
हें तर नित्यच कानीं पडे;
पण समाधान कां कधीं तयानें घडे ?
जिवलगे !

कोणीकडे ग ?—कोणीकडून् ?
तिमिरामधेंच तिमिरामधून्;
घडीभर पडे मध्येंच ऊन्;
अभ्रीं तेंही जातें उडून्,
हृदय हें उले त्यामुळें निराशा जडून्![1]
जिवलगे !

---

1 त्यामुळें हृदय हें उलें...म. व का.



के. ७

भोगांचीं अवशिष्टें तुसें
घशांत खुपतीं, लागे पिसें ;
मागें पुढें न कांहीं दिसे ;
संशयडोहीं नौका फसे ;
मग वदे—हरे राम रे ! करावें कसें ?
जिवलगे !

गोत्यांत अशा आलों कुठून ?
कोठें जाइन कैसा सुटून ?—
असें विचारी जेव्हां झटून, [२]
भ्रमबुद्‌बुद तो जातो फुटून् ; [२]
मग अहा ! विभिन्नच दिसे दृष्टि पालटून !
जिवलगे !

शून्य म्हणूं जें मागें पुढें,
त्यांतुनि दीप्ती दृष्टी पडे,
मधला उजेड तिमिरीं दडे ;
निजधामाहुनि आलों, गडे !
तर ऋणें फेड, चल सुखें स्वधामाकडे !
जिवलगे !

'कोणीकडून ? कोणीकडे ?' ही केशवसुतांची तिसरी चिंतनिका. तिच्याखालीं भडगांव, १७ आक्टोबर १९०० असा स्थलकालनिर्देश आहे. ही चिंतनिका अगोदर जानेवारी १९०२ च्या मासिक मनोरंजनांत व नंतर मार्च १९०२ च्या काव्यरत्नावलींत प्रकाशित झाली आहे. केशवसुतांच्या कविता-संग्रहांतील या चिंतनिकेच्या पाठांत आणि वरील दोन नियतकालिकांतील पाठांत फारच थोडें अंतर आहे. तेंहि पद्यरचनेच्या सोयिस्कर मोडणीचें आहे. त्यामुळें चिंतनिकेच्या अर्थामध्यें कोणताहि फरक पडत नाहीं. तेव्हां प्रस्तुत पाठभेदांचा विचार केलेला नाहीं. 'सतारीचे बोल' या दुसऱ्या चिंतनिकेनंतर लगोलग 'कोणीकडून ? कोणीकडे ?' ही चिंतनिका जवळजवळ सात महिन्यांच्या अवधीनें लिहिण्यांत आली आहे. त्यामुळें त्या चिंतनिकेंतील 'अव्यक्त व अरूप अशा आत्मतत्त्वाचा साक्षात्कार' याच विषयाच्या अन्य एका अंगाचा म्हणजे 'आत्म्याच्या चिरंतनत्वा' चा या चिंतनिकेंत विचार व विस्तार आहे. दुसऱ्या चिंतनिकेंतील 'आत्मतत्त्वाच्या साक्षात्कारा' नंतर या

---

२ भ्रमबुद्‌बुद जातो फुटून् ; का.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७३/१२ वि:
क्रमांक नों: दि: २२-११-८८

तिसऱ्या चिंतनिकेंत केशवसुतांचें जात्याच चिंतनशील असलेलें मन जवळ जवळ 'साक्षात्कारी' बनलें आहे. साक्षात्कारी व्यक्तींत (mystic) आणि तत्त्वज्ञांत (philosopher) भेद असतो. तो असा कीं, साक्षात्कारी व्यक्तीस जें प्रत्यक्ष दिसतें, तें तत्त्वज्ञास केवळ ज्ञात असतें; उलट तत्त्वज्ञास जें ज्ञात असतें, तें साक्षात्कारी व्यक्तीस साक्षात् दिसत असतें. केशवसुत पूर्णतया साक्षात्कारीहि नाहींत किंवा तत्त्वज्ञहि नाहींत. ते मुख्यतः 'कवि' आहेत. मात्र प्रस्तुत चिंतनिकेंत त्यांच्या कवित्वानें साक्षात्कारी व्यक्तीच्या भूमिकेपर्यंत पोंचण्याचा व तिला ओझरता स्पर्श करण्याचा पुष्कळ प्रमाणांत प्रयत्न केला आहे.

'सतारीचे बोल' या दुसऱ्या चिंतनिकेंतील 'उगमीं विलयीं अनंत उरलों' हा चरण गुणगुणत असतांनाच 'कोणीकडून? कोणीकडे?' ही तिसरी चिंतनिका केशवसुतांना स्फुरली असावी. 'आत्मा अमर खरा. परंतु तो 'देहीं' असेल, तरच अनुभवाला येतो. देह आकारास येतो त्यापूर्वी तो कोठें असतो आणि देह नाश पावला म्हणजे मग तो कुठें जातो? –' हा केशवसुतांपुढें प्रमुख प्रश्न आहे; आणि त्याचें उत्तर देण्याचा त्यांनीं या चिंतनिकेंत यशस्वी यत्न केला आहे.

या चिंतनिकेचे स्वाभाविक तीन भाग पडतात. पहिला भाग फक्त पहिल्या कडव्याचा आहे. त्यांत 'जन्ममरणाच्या चक्रनेमिक्रमाचें तत्त्व' मांडलें असून केवळ तेवढ्यानेंच जिज्ञासु मनोवृत्तीचें समाधान होत नाहीं असें सुचविलें आहे. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं। पुनरपि जननीजठरे शयनम्' या सूत्रमय चरणांत श्रीशंकराचार्यांनीं 'पुनर्जन्मवादा'चें जें तत्त्व परिपुष्ट केलें आहे, तेंच तत्त्व केशवसुतांनीं 'इकडुन तिकडे, येथुन तेथें, मागुन पुढें' या त्याच अर्थाच्या शब्दांनीं वाचकांच्या मनांवर ठसविण्याची पराकाष्ठा केली आहे.

केशवसुत 'जनन–मरण' किंवा 'पुनर्जन्म' हे शब्द योजीत नाहींत. परंतु वरील वेगवेगळ्या शब्दांच्या जोड्या योजतात. याचें कारण त्यांच्या मनावरला इमर्सनच्या विचारांचा प्रभाव असावा. मनुष्याला आत्म्याच्या अमरत्वाचें ज्ञान होत नाहीं. कारण तो क्षणभंगुर देहालाच नसतें महत्त्व देऊन स्वतःला दुःखी करून घेतो. हें सांगत असतांना इमर्सन मनुष्याची व निसर्गाची तुलना करतो. आणि त्यांच्यांतला विरोध स्पष्ट करून निसर्ग हा मनुष्यापेक्षां कसा श्रेष्ठ आहे हें दाखवितो. Self–reliance या आपल्या निबंधांत तो म्हणतो —

"Man is ashamed before the blade of grass or the blowing rose. The rose is perfect in every moment of its existence. Before a leaf-bud has burst, its whole life acts; in the full-blown flower there is no more; in the leaf-less root there is no less. Its nature is satisfied, and it satisfies nature, in all moments alike. But man postpones or remembers; he does not live in the

present, but with reverted eye laments the past, or, heedless of the riches that surround him, stands on tiptoe to foresee future. He cannot be happy and strong until he too lives with nature in the present above time."

इमर्सनला 'आत्म्याच्या चिरंतनत्त्वा'चें दर्शन निसर्गांत घडलें आहे. त्याच्या या विचारसरणीचा प्रभाव केशवसुतांच्या मनावर अनेक दिवसांपासून असावा असें वाटतें. कारण १६ मार्च १८९२ रोजीं रचलेल्या 'पुष्पाप्रत' या आपल्या कवितेंत त्यांनीं पुष्पाची तुलना मनुष्याशीं केली असून त्याला 'चिर तरुणा रे! चिर रुचिरा रे!' म्हणून संबोधिलें आहे. 'सतारीचे बोल' व 'कोणीकडून? कोणीकडे?' या दोन चिंतनिकांच्या जरा अगोदर नोव्हेंबर १९०० च्या मासिक मनोरंजनांत त्यांची 'फुलपांखरूं' ही कविता आहे. तिच्यांत त्यांनीं फुलपांखराला अनुलक्षून 'सर्व विनाशी असती प्राणी। ही मज खोटी वाटे वाणी' असे उद्गार काढले आहेत. तेव्हां या सुमारास त्यांच्या मनांत 'आत्म्याच्या अविनाशित्त्वा'चें चिंतन चालू होतें हें उघड आहे. 'उपजणें-मरणें न चुके नरा। भ्रमत नित्य असे भव-भोंवरा' असें देहाच्या विनाशाचें सरळ सत्य न सांगतां केशवसुत तें 'कोणीकडून? कोणीकडे?' असें काव्यमय करून सांगतात आणि आत्म्याचें अविनाशित्त्व ध्वनित करतात हा त्यांच्या कवित्वाचा एक विलोभनीय विशेष आहे.

या चिंतनिकेचा दुसरा विभाग मधल्या तीन कडव्यांचा आहे. दुसऱ्या कडव्याच्या आरंभीं केशवसुतांनीं —

'कोणीकडे ग? कोणीकडून्?
तिमिरामधेंच तिमिरामधून्
घडीभर पडे मध्येंच ऊन्
अभ्रीं तेंही जातें उडून्'

हा जो अनुभव काव्यमय वाणीनें कथन केला आहे, तोच अनुभव गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील २८ व्या व ३० व्या श्लोकांत श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितला आहे.[1] 'देह हा मनुष्याच्या जन्माच्या पूर्वीं अव्यक्त असतो, मध्यें व्यक्त होतो आणि शेवटीं अव्यक्तांतच विलीन होतो. परंतु भूतमात्रांच्या देहीं असणारा 'देही' (म्हणजेच आत्मा) हा भाव कधींहि नष्ट होत नाहीं.' परंतु मनुष्याला 'आत्म्याच्या अमृतत्वा'चें हें ज्ञान नसल्यामुळें तो मधून मधून खिन्न व निराश होत असतो. त्याच्या खिन्नतेचें व निराशेचें कारण त्याच्या सुखोपभोगांत आहे हें सत्य केशवसुतांनीं तिसऱ्या कडव्याच्या सुरवातीस सांगितलें आहे. विषयोपभोग

---

१. अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत। अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ गीता ॥ २/२८
देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत। तस्मात् सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ २/३०

११५५६

हे अनित्य आहेत. इंद्रियें व विषय यांचे संयोग हे क्षणार्धांत उत्पन्न होतात आणि क्षणार्धांत विलय पावतात. तेव्हां सुख आणि दुःख यांचे भोग भोगणें मनुष्याला क्रमप्राप्तच आहे[२].' परंतु दुःखाच्या अतिरेकाशिवाय मनुष्याला 'आत्म्याच्या अमृतत्वा'ची प्रतीति येत नाहीं. 'मागें पुढें न कांहीं दिसे। संशयडोहीं नौका फसे। मग वदे-हरे राम रे! करावें कसें?।' –अशी जेव्हां त्याच्या मनाची स्थिति होते, तेव्हां मात्र तो अनित्य अशा आत्मतत्त्वाचा विचार करूं लागतो. 'झपूर्झा' व 'सतारीचे बोल' या चिंतनिकांतील केशवसुतांच्या 'पिसें लागण्या'च्या कल्पनेची आणि 'काय करावें? कोठें जावें?' या पेंचप्रसंगाची प्रस्तुत चिंतनिकेंतहि या ठिकाणीं पुनरावृत्ति झाली आहे. केशवसुतांच्या अस्वस्थ, संत्रस्त व संशयग्रस्त मनाचें चित्र या त्यांच्या निरनिराळ्या चिंतनिकांतून सारख्याच उत्कटतेनें उमटलें आहे. त्यामुळें त्यांच्या या चिंतनिकाहि भावोत्कट उतरल्या आहेत.

मनुष्य हा आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं व अमरत्वविषयीं उगाच साशंक राहतो, आणि अकारण अनित्य अशा मागील व पुढील परिस्थितीचा शुष्क विचार करीत बसतो. त्यामुळें तो उद्विग्न होतो.[३] जो अज्ञ, अश्रद्ध व संशयग्रस्त असतो, त्याचें ज्ञान अनिश्चित (vague) असल्यामुळें त्याला आधि, व्याधि व उपाधि यांचा त्रास होतो. त्याचें संशयग्रस्त जीवित नेहमींच गोत्यांत (dilemma) गुंतून राहतें. या विकल्पामधून विमोचन व्हावें याकरितां 'आत्मज्ञान' आवश्यक आहे.

'सतारीच्या बोलां'त केशवसुतांचा 'विषादयोग' आहे तर 'कोणीकडून? कोणीकडे?' मध्यें त्यांचा 'ज्ञानयोग' आहे. तो त्यांच्या 'मग अहा? विभिन्नच दिसे दृष्टि पालटून' या चरणांत प्रकट झाला आहे. 'संशया'चा अस्त होऊन 'श्रद्धे'चा (faith) उदय झाला म्हणजे मग 'ज्ञान' कांहीं दूर राहत नाहीं.[४] मात्र हें ज्ञान स्वानुभूतिपूर्ण हवें. तें जर तसें नसेल, तर केवळ युक्तिवादानें 'आत्म्याचें अस्तित्व' सिद्ध होणार नाहीं. या अनुभूतिपूर्ण ज्ञानाविषयीं Immortality या आपल्या निबंधांत नचिकेता व यम यांची कथा सांगत असतांना इमर्सन म्हणतोः—

"The knowledge of soul is not to be obtained by argument. The soul cannot be gained by knowledge, not by under-

---

२. मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः। आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्वभारत ॥ २/१४

३. या ठिकाणीं P. B. Shelly च्या Skylark मधील या ओळी आठवतात.

We look before and after
And pine for what is not:

४. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ गीता ४/३८
श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः। ज्ञानं लब्ध्वां परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥ ४/३९
अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति। नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४/४०

standing, not by manifold science. It can be obtained by the soul by which it is desired. It reveals its own truths."

या चिंतनिकेचा तिसरा विभाग शेवटच्या एकुलत्या एक कडव्याचा आहे. त्यांत 'ज्ञानोदया'-नंतर होणाऱ्या 'आत्मतत्त्वा'च्या जाणिवेचें वर्णन आहे. तें आत्मतत्त्व दीप्त व अनित्य असून येथें, तेथें, सर्वत्र सतत उपस्थित आहे. तेव्हां 'आत्मज्ञानी' मनुष्यानें आपण त्या 'अविनाशी तत्त्वा' कडून (म्हणजेच परमेश्वराकडून) आलों असून पुन्हां परत तिकडेच जात आहों हें लक्षांत ठेवावें; आणि फलवासनारहित कर्म (disinterested action) करून इहलोकीं आनृण्य जोडावें असा केशवसुतांच्या या काव्यमय चिंतनिकेच्या भावगर्भ आशय आहे. या आशयावरून केशवसुत आयुष्याच्या अखेरी-अखेरीस आस्तिक बनत चालले होते असें दिसतें. यासंबंधीं त्यांचे निकटवर्ती कविमित्र किरात सांगतात,—'ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा फारसा भरवसा असल्याचें दिसत नसे, परंतु हें मत अलीकडे अलीकडे एक दोन वर्षांत किंचित् बदललें असावें असें दिसतें. कारण ते अलीकडे आपल्या पत्राच्या आरंभीं 'श्रीराम' नाम लिहीत असत. ज्या मंजुळ नादश्रवणानुभवाचा उल्लेख बऱ्याच भगवद्भक्तांकडून जागजागीं झाल्याचा आढळतो, त्याच दिव्य आणि मधुर नादाचा अनुभव केशवसुतांस होत असल्याचें त्यांच्याच तोंडानें एकदां बाहेर पडलें होतें' [मासिक मनोरंजन, पु. ११, भा. ७]. या संदर्भांत 'आहे जीवित काय?' या केशवसुतांच्या कवितेंतील

नाहीं स्वप्न, न भास, वा बुडबुडा; जीवित्व साचें असे!
प्रेमानें परमेश्वरास भजतो जो निर्मलें मानसें!
लोटी निर्मल सौख्यसिंधुलहरी त्याच्यावरी जीवित,
तो आनंदनिधान शैलशिखरीं क्रीडा करी संतत!

या ओळी लक्षणीय आहेत.

या चिंतनिकेंत भोग, संशय, भ्रम, शून्य, दीप्ति, स्वधाम आणि ऋण हे गीतेंतले शब्द आले आहेत. त्याचप्रमाणें कोंड्याच्या अर्थासाठीं 'तुषें' हा ज्ञानेश्वरींतला शब्द आला आहे. यावरून केशवसुत मधूनमधून गीता व ज्ञानेश्वरी चाळीत असावेत असें वाटतें. या शब्दांपैकीं 'धामा'च्या आणि 'ऋणा'च्या कल्पनांचा उपयोग इमर्सननेंहि केला आहे. Immortality या आपल्या निबंधांत 'आत्म्याच्या अमृतत्वा'ची (The Doctrine of Eternity) ओळख करून देतांना तो म्हणतो,—

For thee, O Nachiketa! I believe, that there is a **house** whose door is open to Brahma. त्याचप्रमाणें The Past या आपल्या कवितेंत तो उद्गारतो —

“The debt is paid,
The verdict said,
The furies laid,
The plague stayed,
All fortune made,
Turn the key and bolt the door,
Sweet is death forever more.”

केशवसुत या चिंतनिकेंत ‘पुनर्जन्मा’ चें किंवा ‘आत्म्याच्या चिरंतनत्वा’ चें तत्त्व मांडतांना कोठेंहि आपल्याकडल्या परिभाषेची योजना करीत नाहींत, तेव्हां त्यांना ही चिंतनिका इमर्सनच्या वाचनानें स्फुरली असावी असें वाटतें.

केशवसुतांच्या प्रस्तुत चिंतनिकेची भाषा अतिशय सूचक आहे, आणि अनुरूप अलंकारांच्या योजनेमुळें तिचा भावार्थ जितका सरस तितकाच सुंदर साधला आहे. अव्यक्त भूत आणि अव्यक्त भविष्य यांच्यासाठीं तिच्यांत तिमिराच्या सूचक प्रतिमेची योजना झाली असून व्यक्त परंतु क्षणिक वर्तमानासाठीं ‘ऊन’ आणि ‘अभ्र’ यांच्या यथार्थ प्रतिमांची योजना झाली आहे. अवशिष्ट भोगांवर तुषाघ्राचें, आयुष्यांत मधून मधून उत्पन्न होणाऱ्या संशयावर डोहाचें, मानवजीवितावर नौकेचें, विकल्पावर गोत्याचें आणि भ्रमावर म्हणजेच अज्ञानावर बुडबुड्याचें—अशी अन्वर्थक रूपकांची एक मालाच या चिंतनिकेंत गुंफली गेल्यामुळें तिचा आशय स्वच्छ व स्पष्ट झाला आहे. मात्र हीं रूपकें नवीन नाहींत. ‘गोता’ या शब्दावर कळत नकळत श्लेष साधला आहे. ‘गोत्यांत अशा आलों कुठून ?’ या चरणाचा अर्थ जसा ‘या संसाराच्या विवर्तांत मी कुठून सांपडलों ?’ असा होऊं शकेल, तसा ‘या नात्यागोत्यांत मी कुठून गुंतलों ?’ असाहि होऊं शकेल. शेवटच्या चार कडव्यांत केशवसुतांनीं अलंकारांचा अवलंब केल्यामुळें त्यांच्यांतील सखोल आशय सुबोध व सुगम झाला आहे. परंतु पहिल्या कडव्यांत केवळ मोघम भाषा वापरल्यामुळें त्यांतला ‘पुनर्जन्म-वादा’चा आशय अंधुक व अस्पष्ट राहिला आहे.

केशवसुतांची ही चिंतनिका पहिल्या दोन चिंतनिकांप्रमाणेंच गेय आहे. परंतु या चिंतनिकेचें वृत्त त्यांनीं ‘पादाकुलका’ला किंचित् नवें वळण देऊन बदललें आहे. या चिंतनिकेच्या कडव्यांतील पहिल्या चार चरणांत प्रत्येकीं ८+७ अशा मात्रांचे दोन चरणक असून पांचव्या चरणांत८+८+५ अशा मात्रांचे तीन चरणक आणि सहावा तोकडा चरण हा फक्त पांच मात्रांचा आहे. दुसऱ्या व चवथ्या कडव्यांत पहिल्या पांच चरणांच्या अंतींच्या ‘न्’ या वर्णाचा उच्चार इंग्रजी पद्यांतील मूकोच्चाराप्रमाणें ( silent pronounciation ) घसरता-निसरता आहे. भावना-नुकूल अशा वृत्ताची निर्मिति करण्याचा केशवसुतांचा हा एक बुद्धिपुरस्सर प्रयत्न आहे, आणि त्यांत त्यांना उदंड यश लाभलें आहे. मात्र त्यांत त्यांनीं कोठेंहि मात्रांची, अनुप्रासांची किंवा यमकांची उपेक्षा केलेली नाहीं.

या चिंतनिकेंत केशवसुतांनीं स्वतःच्या अध्यात्मप्रवण प्रवृत्तीशीं तात्त्विक सुसंवाद केला आहे. त्यांनीं तिला 'जिवलगे !' असें संबोधून 'कोणीकडून ? कोणीकडे ?' असा प्रश्न पुसला आहे, आणि आपणच 'निजधामाहुन आलों, गडे, । तर, ऋणें फेड, चल सुखें स्वधामाकडे । जिवलगे !'—असें त्या प्रश्नाचें उत्तर देऊन टाकलें आहे. मनोवृत्तीशीं केलेल्या या सुसंवादामुळें ही चिंतनिका नाट्यात्मक बनली असून तिच्यांत एक प्रकारची आत्मीयता आविर्भूत झाली आहे. पुन्हां तिच्यांत विषयाची मांडणी सलग व सरळ आहे. त्यामुळें अर्थबोधाच्या मार्गांत अडथळे येत नाहींत.

केशवसुतांची ही चिंतनिका तांब्यांच्या अत्यंत आवडीची असे. गीतेंतील 'अव्यक्तादीनि भूतानि' या सुप्रसिद्ध श्लोकाच्या आधारें ते या चिंतनिकेवर त्यांच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें अभिनय करीत इंग्रजीमध्यें रसाळ भाषण करीत. 'कोणीकडून ? कोणीकडे ?' हा चरण म्हणतांना ते भुंवया उंच उचलून प्रश्नार्थक करीत आणि उजवा पंजा तोंडासमोर उभारून तो डावीकडून उजवीकडे नेत; आणि उद्गारत, —'where art thou going, oh my beloved?' 'हें तर नित्यच कानीं पडे' हा चरण उच्चारतांना त्यांचा चेहेरा किंचित् त्रासिक होई, आणि मग त्यांचें तत्त्वविवेचन इंग्रजींतून बाहेर पडूं लागे, —"Beings are unmanifest in their origin, manifest in their midmost state. Oh beloved! unmanifest likewise are they in dissolution. What is therein all then to grieve over." 'मग वदे, —हरे राम रे ! करावें कसें ?,' हा चरण म्हणतांना तर तांबे भावपूर्ण नाट्याची कमाल करीत. 'हरे राम रे !' हे उद्गार काढतांना ते आवाज अगदीं खोल नेत, 'करावें कसें ?' हें संत्रस्त होऊन विचारत आणि 'जिवलगे !' हें संबोधन उच्चारतांना डोळ्यांत पाणी आणीत.

केशवसुतांची ही चिंतनिका पूर्णतया निर्दोष आहे. तिच्यांत त्यांची वाणी क्वचित् अटपट आहे. परंतु गीतेंतील 'परं ब्रह्म परं धाम' किंवा 'तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम्' या प्रकारच्या कल्पनांशीं ज्यांचा परिचय आहे, त्यांना ती अस्पष्ट वाटण्याचें कारण नाहीं. तिच्यांत आशावादी हिंदु समाजाचा जीवनाकडे पाहण्याचा निर्मळ व निरामय दृष्टिकोन प्रकट झाला आहे. निराशा ही तात्कालिक आहे. जगाच्या मुळाशीं मंगलमय आनंद आहे. मात्र त्याच्या आस्वादनाकरितां श्रद्धा हवी. आत्म्याच्या चिरंतनत्वाच्या विवरणाचें निमित्त करून केशवसुतांनीं हाच संदेश या चिंतनिकेच्या द्वारें दिला आहे.

## म्हातारी

[ आधीं केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तींतला पाठ दिला आहे; आणि मग तळटीपेंत मनोरंजनांतला पाठभेद दिला आहे. ]

घेउन हृदयाशीं सुतेला, स्थित मी दाराशीं
म्हातारी आली तरंगत; मुलगीला दिसली
हात पुढें केले धराया तिला तिनें अपुले;
तिच्या शिरावरुनी तथीं ती गिरक्या घे उडुनी;
हासत वरि करुनी[1] हात, तीं धरूं झटे फिरुनी;
त्या चलनें वरती उडाली म्हातारी परती;
खिदळत तें बघतां उडाया पाहे मम दुहिता !
दडपण संसृतिचें निघालें मम चित्तावरचें;
मन्मनही लागे तरंगूं म्हातारीसंगें !
वारा तो तिजला लागला दूरच न्यायाला.

चुंबुनि वत्सेला
वदे मी मग म्हातारीला —

"थांब, थांब ! जाशी अशी कां ? फिर ये गे मजशीं;
वयस्कता माझी म्हणुनि जर करिसी इतराजी,
तर माझी सोनी पाहुनी, ये गे परतोनी !
तुजला पाहूं दे तियेला, खिदळत राहूं दे !
मज वय विसरूं दे, मुग्ध-मधु-बाल्यीं उतरूं दे !
ते दिन पुष्पांचे, कोंवळ्या किरणीं खेळाचे !
हे दिन–हाय !—
हे दिन चिंतांचे परंतु लटिकें हसण्याचे !

हे दिन ........ जाऊं दे !
मला तुज गाणें गाऊं दे.

" म्हणती म्हातारी तुज, कधीं होतिस तरुण परी ?
तव जनि-मृति न दिसे अजामर रूप तुझें भासे !
कोठुनि तूं येशी, न वदवे कोठें तूं जाशी;

स्वैरपणें भ्रमसी,
यदृच्छा मूर्तच तूं गमसी !

---

१. हंसत वरी करुनी–मनोरंजन.

" येशी तूं कां गे ! यक्षिणी कुंजांतुन ?–सांगे,
कैशा वागुनिया मिळविती अक्षय यौवन त्या
झिजवत नित्य जिणें तयांला पडतें कां मरणें ?
वद त्यांची रीती
ध्यावया आम्ही लागूं ती.

" वा गंधर्वांचें विमानच सूक्ष्मरूप साचें
वद असशी का तूं तरंगत वातावरणांतून् ?
सूक्ष्म देह धरुनी असति कां तुजवरि ते बसुनी ?
दिव्य असें गाणें गात ते असतिल सौख्यानें,
तें मज पाप्याला कशाचें ये ऐकायाला !
परि मम वत्सेतें गमे तें परिसाया मिळतें;
म्हणुनिच उल्हासें
अशी ही वेडावुनि हांसे !

" अज्ञातामधला मूर्त तूं गमसी ध्वनि मजला;
अर्थ तुझा कोण मला तो देइल सांगोन ?
कळेल जर मज तो तर जगीं भरला जो दिसतो–
मी तो अंधार
लोपवूं झटेन साचार !

" खपुष्प तूं अससी काय गे–सांगुनि दे मजसी.
तुझे रंग वास न कळती मर्त्य मानवास ;
जर ते कळतील तर इथें स्वर्गच होईल !
मग तुज धरण्यातें
मुलांपरि मोठे झटतिल ते !

" स्वरूप सत्य तुझें मुळींही तें मजला नुमजे ;
तरी तुझ्या ठायीं वसतसे अद्‌भुत तें कांहीं ;
प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें ;
तेथें स्वच्छन्दें विचरतां मोद मनीं कोंदे
मग गणमात्रांतें
जोडणें केशवपुत्रातें."

'म्हातारी' ही केशवसुतांची चवथी चिन्तनिका. तिच्याखालीं २५ जानेवारी १९०१ असा कालनिर्देश आहे. परंतु स्थलनिर्देश नाहीं. त्यांचा कवितासंग्रह चाळला असतांना असें दिसतें कीं, १८९९ च्या अखेरपासून त्यांच्या चिंतनशील मनोवृत्तीला चिरंतनत्वाचा निदिध्यास लागला होता. कारण 'वातचक्र', 'सतारीचे बोल', 'कोणीकडून ? कोणीकडे ?' आणि 'फुलपांखरूं' या लागोपाठ लिहिलेल्या त्यांच्या चिंतनपर कवितांत ती वृत्ति विशेष प्रबल आहे. या साऱ्या चिंतनपर कविता भडगांवला उत्स्फूर्त झाल्या असल्यामुळें प्रस्तुत चिंतनिका त्यांना तेथेंच स्फुरली असावी. ही चिंननिका लिहिल्यावर चार पांच महिन्यांच्या अवधींत ते भडगांवहून फैजपूरला गेले असावेत. कारण या चिंतनिकेनंतरच्या 'आम्ही कोण ?' या सुनीताखालीं फैजपूर, २९ नोव्हेंबर १९०१, असा स्थलकालनिर्देश आहे. मेच्या सुट्टीनंतर जूनमध्यें शाळा उघडतात. तेव्हां त्या सुमारास केशवसुत भडगांवच्या शाळेचा राजिनामा देऊन फैजपूरला नव्या जागीं रुजू झाले असावेत. ही चिंतनिका जून १९०२ च्या मासिकमनोरंजनाशिवाय इतर कोणत्याहि नियतकालिकांत प्रसिद्ध झालेली नाहीं. केशवसुतांच्या कवितासंग्रहांतील या चिंतनिकेचा पांचव्या चरणाचा पाठ 'हासत वरि करुनी' असा आहे, तो पाठ मनोरंजनांत 'हंसत वरी करुनी' असा आहे. या पाठभेदामुळें चिंतनिकेच्या अर्थामध्यें कोणताहि फरक पडत नाहीं. तेव्हां त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं. ही चिंतनिका 'कोणीकडून ? कोणीकडे ?' या चिंतनिकेनंतर बरोबर सव्वाचार महिन्यांच्या अवधीनें लिहिण्यांत आली आहे. या दोन चिंतनिकांच्या मधल्या लेखनकालांत 'फुलपांखरूं' ही एक अधिक कविता लिहिण्यांत आली आहे. तिच्यांत

> 'सर्व विनाशी असती प्राणी' । ही मज खोटी वाटे वाणी
> फूलपांखरूं – मरण पाहिलें । आहे का कोणीं ?

असा एक चिंतनपर विचार व्यक्त झाला आहे. तेव्हां 'कोणीकडून ? कोणीकडे ?' या तिसऱ्या चिंतनिकेंतील विषयाचें चिंतन चालू असतांनाच केशवसुतांना 'सर्वांच्या ठिकाणीं एकस्वरूपानें वास्तव्य करणारा अंतःस्थायी आत्मा आहे तरी कसा ?' हा विषय सुचला असावा; आणि त्या विषयाच्या चिंतनाचें फळ म्हणून 'म्हातारी' ही चिंतनिका निर्माण झाली असावी. केशवसुत मनानें तत्त्वज्ञ व हृदयानें कवि असल्यामुळें या चिंतनिकेंत आत्म्याच्या स्वरूपासंबंधींचें तत्त्वज्ञान आणि तदनुषंगिक काव्यमय कल्पना यांचें मनोज्ञ मीलन झालें आहे. The poet differs from the philosopher only herein, that one proposes BEAUTY as his main end, the other TRUTH' असें जें इमर्सन म्हणतो, त्याप्रमाणें केशवसुतांची भूमिका मुख्यतः कवीची आहे. तेव्हां त्या मीलनांत सुंदर सत्यापेक्षां मधुर काव्याचाच अंश अधिक आहे.

आत्मा अज आणि अमर आहे खरा. परंतु त्याची सत्ता देह असेल तरच जाणवते. 'देहांत ती चैतन्यमय शक्ति ( Spiritual power ) कोठून येते आणि देह नष्ट झाला म्हणजे

ती कोठें जाते ? ज्यानें नित्य आपल्या नियतकर्मांचें आचरण करून यज्ञ चालवला आहे, त्याला मृत्यु येतो का ? जनन आणि मरण नसलेल्या या आत्म्याचें स्वरूप आहे तरी कसें ? '—या प्रश्नांनीं केशवसुत अस्वस्थ झाले आहेत. या प्रश्नांचीं उत्तरें गीतेंत आहेत. परंतु प्रस्तुत चिंतनिकेंत तीं केशवसुतांनीं दिलेलीं नाहींत. आत्म्याच्या स्वरूपांत कांहींतरी अद्भुत खास आहे. आणि त्या अद्भुताच्या चिंतनांत आपलें मन अपरोक्षांतून परोक्षांत ( Invisible ) जातें व त्या चिंतनानें आपणांस एक प्रकारचा अनिर्वचनीय आनंद होतो एवढेंच काय तें निवेदन या चिंतनिकेच्या शेवटीं केशवसुतांनीं ' कवि ' या भूमिकेवरून केलें आहे.

आत्म्याच्या स्वरूपासंबंधींचे हे विचार गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील २० व्या व २९ व्या श्लोकांत आणि चवथ्या अध्यायांतील ९ व्या, २२ व्या व २४ व्या श्लोकांत आले आहेत. परंतु केशवसुतांना ते इमर्सनच्या Immortality म्हणजे ' अमृतत्व ' या निबंधावरून स्फुरले असावेत. या निबंधांत आत्म्याचें अमरत्व व त्याचें स्वरूप यांचें विवेचन करतांना इमर्सन म्हणतो;—

" The soul is not born; it does not die; it was not produced from anyone; nor was any produced from it; unborn, eternal, it does not slay, though the body is slain. Subtler than what is subtle, greater than what is great, sitting it goes far, sleeping it goes everywhere. Thinking the soul as unbodily among bodies, firm among feeling things, the wise man casts off all grief.........The name of death was never terrible to him that knew to live.........A man of thought is willing to die, and willing to live.........The real evidence about soul is too subtle, or is higher than we can write down in propositions."

केशवसुतांच्या प्रस्तुत चिंतनिकेंत जवळ जवळ याच विचारांचा स्वैर अनुवाद आहे. तेव्हां तिचें मूळ इमर्सनच्या निबंधांत असावें.

या चिंतनिकेचे स्वभावतःच तीन विभाग पडतात. पहिला विभाग पहिल्या दोन कडव्यांत आहे. त्यांत सुरुवातीला केशवसुतांनीं हवेंत स्वच्छंद संचार करणाऱ्या 'म्हातारी'चें म्हणजे रुईच्या अगर कापसाच्या बोंडाचें व त्याला धरूं पाहणाऱ्या आपल्या उडत्या बागडत्या लहानग्या 'वत्सले'चें शब्दांच्या सहज कुंचल्यानें एक ठसठशीत रेखाचित्र रेखाटलें आहे;[२] आणि मग म्हातारीशीं तात्त्विक सुसंवाद केला आहे. त्या संवादांत केशवसुतांनीं स्वतःच्या आधि, व्याधि, उपाधि आदि चिंतांनीं व्याकुल असलेल्या वयस्कतेची आणि आपल्या कन्येच्या निरागस बालवयाची वैषम्यनिदर्शक काव्यमय तुलना केली आहे. मुलें निष्पाप असतात, तीं देवाला आवडतात, त्यांचें जीवन निरामय व आनंदमय असतें;

---

२ केशवसुतांच्या मधल्या मुलीचें नांव ' वत्सला, ' ती यावेळीं सुमारें तीन चार वर्षांची असावी. [ मा. मनो. पु. ११, भा. ७ ]

उलट मोठीं माणसें पापी असतात, चिंतांनीं त्यांचीं मनें पोखरलेलीं असतात, त्यांचें जीवन कष्टप्रद व दुःखमय असतें इत्यादि संकेत केशवसुतांनीं इंग्रजी साहित्यापासून उचलले आहेत. आपल्याकडे क्वचित् 'पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत' असें बाल्याचें गौरव असलें, तरी तज्जन्य 'अज्ञान' संस्कारहीन म्हणून तुच्छ लेखलें आहे. आपल्याकडे संस्कारयुक्त 'ज्ञाना'ला महत्त्व आहे. तें 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' या गीताचरणांत व्यक्त झालें आहे. केशवसुतांच्या 'नैर्ऋत्येकडील वारा' व 'पुष्पाप्रत' या कवितांतहि अजाणत्या बालवयाचें कौतुक व जाणत्या मोठ्या वयाचें विडंबन दृष्टीस पडतें.[३] अजाण मुलें परमेश्वरस्वरूप असतात हा पाश्चात्त्यांच्या साहित्यांतील संकेत आवडल्यामुळेंच बहुधा केशवसुतांनीं या चिंतनिकेंतील तात्त्विक विषयाशीं निष्पाप बाल्याचा संबंध जोडला असावा. इमर्सन्‌नें आपल्या Domestic Life या निबंधांत कोलरिजचें एक अवतरण दिलें आहे. त्यावरून पाश्चात्त्य समाजांत बाल्याला किती शुद्ध व पवित्र मानतात हें लक्षांत येईल;— "Infancy," said Coleridge, "presents body and spirit in unity. The body is all animated." इमर्सन्‌नें Nature, Old Age, Domestic Life इत्यादि आपल्या निबंधांत जागजागीं लहान मुलांच्या भाबडेपणाचे गोडवे गाइले आहेत. एके ठिकाणीं त्यानें लहान मुलाला 'लहानगा देवदूत' (Little Angel) आणि बड्याबड्या बादशहांची दाढी ओढणारा 'जुलमी राजा' (Little Tyrant) म्हटलें आहे; आणि दुसऱ्या एके ठिकाणीं बालपणासंबंधीं पुढील उद्‌गार काढले आहेत; The lover of Nature is he, whose inward and outward senses are still truely adjusted to each other; who has retained the spirit ot infancy even into the era of manhood. 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे' हा केशवसुतांचा सर्वश्रुत चरण इमर्सन्‌च्या याच विचाराचा प्रतिध्वनि आहे. तेव्हां केशवसुतांनीं प्रस्तुत चिंतनिकेंत 'आत्म्याचें सत्य स्वरूप' आणि 'निष्पाप बाल्य' या दोन भिन्नभिन्न विषयांची जी सांगड घातली आहे, तिचा झरा त्यांनीं इमर्सन्‌च्या निबंधांचीं जीं पारायणें केलीं, त्यांत असावा.

या चिंतनिकेच्या दुसऱ्या विभागांत तीन ते सात या एकूण पांच कडव्यांचा अन्तर्भाव होतो. त्यांत 'म्हातारी'ला उपलक्ष्य करून केशवसुतांनीं मधूनमधून 'आत्म्या'च्या सत्य स्वरूपासंबंधींचे त्रुटित विचार प्रस्फुटित केले आहेत. तिसऱ्या कडव्याच्या आरंभीं ते एक चमत्कृतिपूर्ण कोटि करतात आणि 'म्हातारी'ला विचारतात;—

---

३ आईच्या नयनांत नित्य मग मी स्वर्गास त्या पाहतों
तातांकावर नित्य मी मग जगद्राज्यासना भावितों
कां हो यापरि वाढलों फुकट मी ? हा-हंत ! मी नष्ट हा !
तान्हा बाळचि राहतों तर किती तें गोड होतें-अहा ! ( नैर्ऋत्येकडील वारा. )
मुग्धमधुरता चित्तीं घेतां,
पूर्वीं अपुली होती समता;
गेला गेला काळ अहह तो—फेर किती आतां. (पुष्पाप्रत)

"म्हणती म्हातारी तुज, कधीं होतिस तरुण परी ?"

या ओळींत केशवसुतांनीं 'आत्म्याचें पुराणत्व' सूचित केलें आहे. पुढें ते 'म्हातारी 'ला आणखी विचारतात—

"तव जनि–मृति न दिसे अजामर रूप तुझें भासे !
कोठुन तूं येशी, न वदवे, कोठें तूं जाशी;"[४]

केशवसुतांच्या या उद्‌गारांत आत्म्याचें सत्य स्वरूप कळत नाहीं याविषयींची शंकाकुलता आहे. मनुष्य जन्माला येतो व मरतो यांत विशेष कांहीं नाहीं. परंतु शरीर आकारास येण्यापूर्वी व शरीर नष्ट झाल्यावर त्यांतलें चैतन्य कोठें जातें हें केशवसुतांपुढें एक कोडें आहे. या कडव्याचा शेवट केशवसुतांनीं

"स्वैरपणें भ्रमसी 'यदृच्छा' मूर्तच तूं गमसी !"

या अटपट वाणीनें केला आहे. म्हातारी 'च्या स्वैरसंचाराचें साम्य केशवसुतांनीं सहजगत्या जें मिळेल त्यांत संतुष्ट राहणाऱ्या, सुखदुःखादि द्वंद्वांपासून अलिप्त असणाऱ्या, सिद्धि आणि असिद्धि यांना समान लेखणाऱ्या व पापपुण्यांच्या बंधनांपासून मुक्त असणाऱ्या 'कर्मयोग्या 'शीं दाखविलें आहे; आणि 'म्हातारी 'वर 'यदृच्छे' ची उत्प्रेक्षा केली आहे.[५]

या पुढच्या चवथ्या कडव्यांत —
"झिजवत नित्य जिणें तयाला पडतें कां मरणें ?"

असा एक शंकाकुल प्रश्न केशवसुतांनीं विचारला आहे. 'ज्यानें नित्य जीवनाचा यज्ञ चालवला आहे, तो कर्मयोगी जीवनमरणापासून मुक्त आहे' असें त्याचें सूचक उत्तर त्या प्रश्नांतच प्रच्छन्न आहे. 'जो देवाचें दिव्य जन्म व दिव्य कर्म तत्त्वतः जाणतो, तो देहत्यागानंतर पुन्हां जन्मास न येतां देवाच्या स्वरूपांतच विलीन होतो' असें यावर गीतेचें भाष्य आहे.[६] 'सतारीच्या बोलां'त केशवसुतांचा 'विषादयोग' आहे, 'कोणीकडून ? कोणीकडे ?' मध्यें 'ज्ञानयोग' आहे, तर 'म्हातारीं'त 'कर्मयोग' आहे. केशवसुतांना आपल्या तत्त्वज्ञानाचा परिचय इंग्रजीच्या माध्यमांतून झाला होता. त्यामुळें या चिंतनिकेंत 'कर्म', 'यज्ञ', 'ब्रह्मार्पण' इत्यादि आपली परिभाषा आढळत नाहीं.

---

४ न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ गीता २.२०

५ यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥ गीता ४।२२

६ जन्मकर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन. ४।९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३७०३८९ ...... दि: ..........

'ब्रह्म' म्हणजेच 'कर्म'[७] तेव्हां ज्यानें विहित कर्में आचरिलीं, त्याला ब्रह्माची प्राप्ति झाली. म्हणजेच त्याला आत्म्याच्या स्वरूपाचा उलगडा झाला. केशवसुतांच्या अस्फुट कविताचरणांत या साऱ्या गोष्टी ध्वनित होत असूनसुद्धां ते सहाव्या आणि सातव्या कडव्यांत "अर्थ तुझा कोण। मला तो देइल सांगोन?" किंवा "तुझे रंगवास। न कळती मर्त्य मानवास" असे कुंठित उद्गार काढतात, याला कारण त्यांनीं हें तत्त्वज्ञान सरळ गीतेवरून न घेतां इमर्सन्‌वरून घेतलें होतें.

या चिंतनिकेचा तिसरा विभाग एकुलत्या एका आठव्या कडव्याचा आहे. त्यांत केशवसुत म्हणतात ;—

"स्वरूप सत्य तुझें मुळींही तें मजला नुमजे;
तरी तुझ्या ठायीं वसतसे अद्भुत तें कांहीं;
प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें;
तेथें स्वच्छंदें विचरतां मोद मनीं कोंदे"

यावरून असें दिसतें कीं, आत्म्याच्या स्वरूपाचा केशवसुतांना प्रत्यक्ष बोध होत नसला, तरी त्यांच्या चिंतनांत त्यांना अद्भुतता प्रतीत होई व तिच्यांत ते रमत; कारण त्या रमण्यांत त्यांचें मन अपरोक्षांतून परोक्षांत जाई, आणि त्यामुळें त्यांना मुहूर्तमात्र आत्मानंदाची प्रतीति येई.[९]

केशवसुतांनीं या चिंतनिकेंत अकारण बाल्याचें महत्त्व आणि आत्म्याचें स्वरूप यांचा संबंध जोडला आहे, आणि उपमेय व उपमान यांची परावृत्ति करणाऱ्या शेलेच्या शैलीचें अनुकरण करून 'म्हातारी' वर अनुक्रमें स्वैरसंचारी यदृच्छा, चिरयौवना यक्षिणी, गायक गंधर्वविमान, अज्ञानांतला ध्वनि आणि खपुष्प या अमूर्त उपमानांचा आरोप केला आहे. या चिंतनिकेपूर्वीं दोनतीन महिने त्यांनीं 'फुलपांखरूं' ही चिंतनपर कविता लिहिली आहे. त्या कवितेंत त्यांनीं शेलेच्या याच शैलीचा अवलंब केला आहे. तेव्हां बहुधा या सुमारास त्यांच्या पठनांत शेलेची कविता आली असावी.

---

७ ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गंतव्य ब्रह्मकर्मसमाधिना ४।२४

८ आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २।२९

९ 'वातचक्र' यां चिंतनपर कवितेंत त्यांनीं या आत्मानंदाला 'सच्चिदानंद' म्हटलें आहे.
'मीहि यशाला येथ रहावें ?
काय असे ज्या मीं चिकटावें ?
वाटे गिरक्या घेत मिळावें—
या पवनाच्या चक्रीं, होउनि लीन सच्चिदानंदांत;

वस्तुतः अव्यक्त आत्म्याच्या सत्यस्वरूपाची कल्पना निःसंदिग्धपणें स्पष्ट व्हावी म्हणून केशवसुतांनीं 'म्हातारी'चा प्रतिमानाप्रमाणें उपयोग केला आहे. परंतु 'म्हातारी'च्या त्याच प्रतिमानाला पुन्हां प्रतिमेय कल्पून त्यांनीं त्यावर भिन्नभिन्न प्रतिमानांचा आरोप केला आहे. त्यामुळें या चिंतनिकेचें स्वरूप आदिपासून अंतापर्यंत एकसंध राहिलें नाहीं.

केशवसुतांनीं 'आत्मा' या प्रतिमेयासाठीं 'म्हातारी' या प्रतिमानाची निवड उचित केली आहे. कारण आत्मा हा म्हातारीप्रमाणेंच जुनापुराणा आहे. पुढें त्यांनीं 'म्हातारी' वर 'यदृच्छे'चा आरोप केला आहे. परंतु 'यदृच्छे'ची कल्पना 'आत्म्या'पेक्षां त्याचें ज्ञान प्राप्त करणाऱ्या 'कर्मयोग्या'शीं अधिक सुसंगत आहे. यापुढील 'अक्षययौवना यक्षिणी' ची कल्पना तर 'आत्मा' व 'म्हातारी'या दोघांशींहि विसंगत आहे. कारण आत्मा हा सनातन व पुरातन आहे. तो कांहीं 'अक्षय युवा' नाहीं ; आणि 'म्हातारी' हि कांहीं 'अक्षय यौवना' नाहीं. यक्षिणीची रमणीय कल्पना पुराणांत आहे. परंतु मराठी माणसाच्या कल्पनेनुसार 'यक्ष' जख्ख आहेत, आणि 'यक्षिणी' जखिणी आहेत. या संदर्भांत 'यक्षिणीची कांडी'हा प्रयोग लक्षणीय आहे. केशवसुतांनीं या चिंतनिकेच्या आरंभीं स्वतःच्या 'वयस्कते'चा सखेद निर्देश केला आहे. कदाचित् त्या 'वयस्कते'शीं 'अक्षय यौवना'च्या कल्पनेचा विरोधी संबंध असावा. यानंतरच्या कडव्यांत केशवसुतांनीं 'म्हातारी'वर अगोदर 'गाणाऱ्या गांधर्व विमाना'ची आणि नंतर 'अज्ञातांतल्या ध्वनी'ची कल्पना केली आहे. कदाचित् या दोन्ही कल्पना आत्म्याच्या अनाकलनीय स्वरूपाकडे संकेत करीत असाव्या. 'अज्ञात' हा शब्द केशवसुतांनीं कदाचित् Mystic या अर्थी योजला असावा. परंतु त्यापेक्षां अव्यक्त ( Invisible ) हा शब्द अधिक अन्वर्थक ठरला असता. आपल्याकडे गंधर्वांच्या स्वर्गीय गायनाचा संकेत आहे, आणि पाश्चात्त्यांत स्वर्गीय मूक संगीताचा ( celestial mute music ) संकेत आहे. संगीताच्या या सूक्ष्म व तरल संकेतांचा केशवसुतांनीं आत्म्याच्या गूढ व गहन स्वरूपाशीं संबंध जुळविण्याचा प्रयत्न केला आहे. निष्पाप बालकांच्या कानांवर त्या संगीताचे सूर पडतात. परंतु प्रौढ माणसें पापी असल्यामुळें त्यांना तें संगीत ऐकूं येत नाहीं. शेवटीं 'म्हातारी'वर खपुष्पाची उत्प्रेक्षा केली आहे. 'खपुष्पा'ची कल्पना 'झपूर्झा'त आली आहे. 'खपुष्पा'चे रंग व सुवास यांचा जर आपणांस उमज पडेल, तर आपण जगांतलें अज्ञान दूर घालवूं आणि आत्म्याच्या सत्य स्वरूपावर प्रकाश पाडूं अशी मनीषा या सुरस व चमत्कारिक कल्पनाविलासाच्या अंतीं केशवसुतांनीं प्रकट केली आहे.

'म्हातारी' ही केशवसुतांची चिंतनिका सुंदर असली, तरी ती 'सतारीचे बोल' किंवा 'कोणीकडून ? कोणीकडे ?' या चिंतनिकांच्या तोडीची नाहीं. या एकाच चिंतनिकेंत 'रम्य बाल्य,' 'आत्म्याच्या सत्य स्वरूपाचें संशोधन' आणि 'म्हातारी'वरील भिन्नभिन्न उत्प्रेक्षांचें आरोपण' या तीन विषयांची गुंतागुंत झाली आहे. त्यामुळें तिच्यांत विषयांतर, कल्पनासंकर व भिन्नभिन्न विषयांच्या आणि कल्पनांच्या संबंधांवर हेतुपुरस्सर कृत्रिम भर हे दोष जाणवतात.

केशवसुतांच्या अन्य चिंतनिकांप्रमाणें ही चिंतनिकादेखील गेय आहे. या चिंतनिकेच्या शिरोभागीं तिच्या ‘चाली’ चा निर्देश नाहीं. परंतु त्याकाळीं मराठी रंगभूमीवर गाजत असलेल्या ‘शारदा’ या नाटकांतील ‘माया जळली का ? । इजला पतिसुख न लगे का ?’ या साध्या, सोप्या व सरळ ‘चाली’ची योजना या चिंतनिकेसाठीं झाली आहे. या चालीच्या सम चरणांत १० व विषमचरणांत १५ अशा एकूण २५ मात्रा असतात. ही चाल गद्यसदृश असल्यामुळें

ते दिन पुष्पांचे, कोंवळ्या किरणीं खेळाचे
हे दिन-हाय !—
हे दिन चिंतांचे परंतू लटिकें हसण्याचे.

या ठिकाणीं केशवसुतांनीं मध्येंच सात मात्रांचा एक तोकडा चरण योजून चिंतनिकेंतील आपली विषण्णवृत्ति अधिक करुण व उत्कट केली आहे. आणि लगेच ‘हे दिन ...... जाऊं दे’ या ठिकाणीं मात्रादृष्ट्या यत्किंचितहि सवलत न घेतां केवळ बिन्दुमालेच्या चिन्हानें ईषदेक विराम सूचित करून उत्कटतेचा भर विशेष वाढवला आहे. ‘वद अससी कां तूं । तरंगत वातावरणांतून् ?’ या ठिकाणीं केशवसुतांनीं अन्त्ययमक साधून विषम चरणांतील शेवटच्या ‘न्’ या सानुनासिक व्यंजनाचा उच्चार इंग्रजींतील पद्याप्रमाणें मूक (silent) ठेवला आहे. भावनेला पोषक अशी रचना करण्याचा केशवसुतांचा हा सहेतुक प्रयत्न आहे. परंतु ‘कवीच्या निरंकुशत्वा’चा (poetic license) उपयोग त्यांनीं मर्यादेनें व अत्यंत सावधतेनें केला आहे. त्यांत त्यांनीं पद्याच्या प्रकृतीला व आकृतीला कोठेंहि ढळ लावला नाहीं किंवा गेयतेला आवश्यक असलेल्या मात्रांची, अनुप्रासांची व यमकांची उपेक्षाहि केली नाहीं. त्यांनीं स्वतः या गोष्टीचा कबुलीजबाब या चिंतनिकेच्या शेवटच्या चरणांत ‘मग गणमात्रांतें । जोडणें केशवपुत्रातें’ या शब्दांत देऊन टाकला आहे. पद्याच्या अखेरच्या ओळींत स्वतःचें नांव गुंफण्यांत केशवसुतांनीं प्राचीन पद्यपद्धतीचें अनुसरण केलें आहे. केशवसुत परंपरागत पद्यरचनेच्या विरुद्ध नव्हते. त्यांना परंपरा तोडून मोडून फेकून द्यावयाची नव्हती. त्यांना तिच्यांत आवश्यक व सोयीची सुधारणा हवी होती इतकेंच !

केशवसुतांची ही चिंतनिका गोविंदाग्रजांच्या विशेष प्रीतीची होती. केशवसुतांनीं “म्हणती म्हातारी । तुज, कधीं होतिस तरुण परी ?” अशी ‘म्हातारी’ वर कोटि केली आहे, तर गोविंदाग्रजांनीं ‘हो चिरंजीव म्हातारी’ अशी तिच्यावर प्रतिकोटि केली आहे. गोविंदाग्रजांना कल्पना अतिशय प्रिय होती. ‘म्हातारी’ला बघून केशवसुतांचें मन ‘तिच्यासवें तरंगूं’ लागलें, तर ‘हलत्या पिंपळपानाला’ला पाहून गोविंदाग्रजांची ‘कल्पना हलूं’ लागली. कल्पनानावीन्याच्या या आकर्षणामुळेंच बहुधा शेलेच्या शैलीच्या अनुकरणानें लिहिलेली ही केशवसुतांची कल्पनाप्रचुर चिंतनिका त्यांना आवडत असावी; आणि त्यांनीं केशवसुतांना उद्देशून, ‘अवतरुनी फिरुनी शेले ।

केशवसुत गाउनि गेले ' असे धन्योद्गार काढले असावेत. रेंदाळकरांनींदेखील आधुनिक 'कवि-कुलचक्रवर्तीच्या या कवितेंत दिसून येणारें कल्पनाप्रभुत्व कोणासहि मोहवील ' या शब्दांत या चिंतनिकेंतील कल्पनाशालित्वाची स्तुति केली आहे. [ रेंदाळकरांची कविता. प्रथम खंड. पृ. ४०४ ] श्री. म. वर्दे यांना ही चिंतनिका तिच्यांतील अज्ञेयवाद ( Mysticism ), गूढ प्रमेयें व सूचक शब्द यांमुळें आवडत असे. [ मनोरंजन, जाने. १९२०. ]

केशवसुतांची ही चिंतनिका त्यांच्या इतर चिंतनिकांइतकी प्रभावी नाहीं. 'आत्म्याच्या स्वरूपाचा शोध ' हा तिच्यांतला मुख्य विषय बाजूला राहून तिच्यांत गौण कल्पनांचें अवडंबर माजलें आहे. त्यामुळें कित्येक रसिकांचीहि दिशाभूल झाली आहे. त्यांना ही चिंतनिका म्हणजे केवळ एक कल्पनाकलित कविता वाटते. परंतु केशवसुतांच्या अन्य चिंतनिकांप्रमाणें ही चिंतनिकाहि गहनगंभीर आहे. मात्र हिच्यांत ' कंद चिमुकला, पण पालापाचोळा मात्र भला थोरला ' असा कांहींसा प्रकार झाला आहे.

## 'हरपलें श्रेय'

[ आधीं केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तींतला पाठ दिला आहे व मग तळटीपेंत अनुक्रमें 'का' म्हणजे काव्यरत्नावलि व 'म' म्हणजे मासिक मनोरंजन यांच्यांतील पाठभेद नमूद केले आहेत. ]

( चाल—पाहुं चला हरि कोणिकडे )

( उदात्तबुद्धीला संसारांत राम नाहीं. अलौकिक असें जें कांहीं तिला पाहिजे असतें, तें तिच्या हक्काचें असूनदेखील, त्याच्या प्राप्तीकरितां तिला झुरत पडावें लागत नाहीं काय ? )

त्रिखंड हिंडुनि धुंडितसें
न पारि हरपलें तें गवसे ! । ध्रु० ।

होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळल्यें परोपरी,
लट्टूपुटीच्या घरदारीं
लटकीच जाहल्यें संसारी,
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घराहि न ये हातां !

चुकचुकल्यापरि, वाटे अन्तरिं,
होउनि बावरि
निजश्रेय मी पाहतसें
न परि हरपलें तें गवसे ! १

प्राप्त जाहलें तें तुजला
तूं मागितलें जें देवाला,
ज्याचें मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें.–
या वचनें चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा
दिलें हिरण्मय, हातीं मृण्मय;
हा हतविनिमय !
परत मला मम मिळे कसें ?
न परि हरपलें तें गवसे ! २

किरण झरोक्यांतुनी पडे
अणूंसवें त्यांतून उडे
परोक्षविषयीं मन माझें
विसरुनियां अवघीं काजें !
हयगय त्यांची मज जाची,
परि न मला पर्वा त्याची !
वेडी होउन, बसल्यें अनुदिन
एकच घेउन–
मज माझें लाभेल कसें ?
न परि हरपलें तें गवसे ! ३

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी,
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते;
म्हणुनी विजनीं मी जात्यें
स्वच्छन्दें त्या आळवित्यें

[1]स्वभाव दावुनि, परि तें झटदिनिं
जाई लोपुनि
मग मी हांका मारितसें,
न परि हरपलें तें गवसे ! ४

[2]भीडभाड माझी फिटली,
जग म्हणतें कीं 'ही उठली !'
जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे ?
एक शब्द बोलेन जरी
सकलां कुण्ठित करिन तरी;
अशी आगळी, परी बावळी
आहे दुबळी;
कां कीं त्याविण सुचत नसे
न परि हरपलें तें गवसे ! ५

स्वपतिचितेवरि उडी सती
संसृतिविमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो;
मी न करिन का तेंवि तधीं ?
माझें मज लाभेल जधीं ?
मजपासोनी, हाय ! हिरोनी
नेलें कोणीं ! —
म्हणुनि जीव पांखडीतसें
न परि हरपलें तें गवसे ! ६

---

[1]स्व–भास– का. व म.

| | |
|---|---|
| [2]जन म्हणती कीं 'ही उठली' | माझी मर्यादा फिटली |
| माझी मर्यादा फिटली | जन म्हणती कीं 'ही उठली' |
| ती धरुनि कसें तें मिळतें | ती धरुनि कसें तें मिळतें |
| न असे मर्यादा ज्यातें ? – का. | न असे मर्यादा ज्यातें ? – म. |

‘ हरपलें श्रेय ’ ही केशवसुतांची पांचवी चिंतनिका. ती त्यांनीं चिपळूणला २५ मे १९०५ रोजीं लिहिली. या सुमारास ते उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त धारवाडहून कोंकणांत वळणें या आपल्या गांवीं गेले असावेत. वाटेंत चिपळूणजवळच्या एका खेडेगांवांत त्यांचें सासुरवाड होतें. कोंकणांत वळणें या गांवीं जातांना किंवा तेथून परततांना त्या ठिकाणीं त्यांचा मुक्काम झाला असावा. त्या मुक्कामांत त्यांना चिपळूणला आल्यावर ही चिंतनिका स्फुरली असावी. ही चिंतनिका आधीं १७ जून १९०५ च्या ‘ काव्यरत्नावलीं ’त प्रसिद्ध झाली आहे, आणि मग ऑगस्ट १९०५ च्या ‘मासिक-मनोरंजनां’त आली आहे. केशवसुतांच्या कवितासंग्रहाच्या पांचव्या आवृत्तीच्या पाठांत आणि वरील दोन नियतकालिकांतील पाठांत– विशेषतः चवथ्या व पांचव्या कडव्यांत अंतर आहे. तें अर्थबोधाच्या दृष्टीनें महत्त्वाचें असल्यामुळें त्याचा आवश्यक त्या स्थळीं यथावकाश विचार केला आहे.

‘म्हातारी’ ही चवथी चिंतनिका लिहिल्यावर तब्बल सव्वा पांच वर्षांच्या प्रदीर्घ अवधीनंतर केशवसुतांनीं ‘हरपलें श्रेय ’ ही पांचवी चिंतनिका लिहिली आहे. या मधल्या काळांत केशवसुतांचें चिंतन चालूच होतें.* या चिंतनिकेचा विषय ‘ सान्तानें चालवलेला अनन्ताचा शोध ’ हा आहे. केशवसुतांची, वाचा जात्याच अटपट आहे. या चिंतनिकेंत ती बहुतेक ठिकाणीं अस्फुट, अस्पष्ट आणि संदिग्ध आहे. केशवसुतांनाहि ही जाणीव असावी. म्हणूनच या चिंतनिकेचा अर्थबोध व्हावा, या हेतूनें त्यांनीं तिच्या आरंभीं प्रश्नार्थक टीप दिली आहे;—

‘उदात्त बुद्धीला संसारांत राम नाहीं. अलौकिक असें जें कांहीं तिला पाहिजे असतें, तें तिच्या हक्काचें असूनदेखील, त्याच्या प्राप्तीकरितां तिला झुरत पडावें लागत नाहीं काय ?’ ही टीपहि असावी तशी स्पष्टार्थबोधक नाहीं. तिच्याद्वारें त्यांना असें सुचवावयाचें आहे कीं, लौकिक अशी सांसारिक बुद्धि संकुचित असते; उलट अलौकिक अशी उदात्त बुद्धि व्यापक असते. संकुचित बुद्धि आधि, व्याधि व उपाधि या त्रिविध तापांनीं गांजलेली असते. तिला निर्विकल्प असा आनंद मिळत नाहीं. परंतु व्यापक बुद्धि त्रिविध तापांपासून मुक्त असते. तिला अनिर्वचनीय अशा चिरंतन आनंदाचा लाभ झालेला असतो. याच चिरंतन आनंदाला केशवसुतांची अस्वस्थ, संत्रस्त व संशयग्रस्त मनोवृत्ति त्रिखंड हिंडून धुंडीत आहे.

प्रस्तुत चिंतनिकेंतला हा विषय अध्यात्मवादाला अनोळखा किंवा नवखा नाहीं. सान्ताला अनन्ताची जी ओढ लागते, जीवात्म्याला परमात्म्याच्या प्राप्तीची जी तळमळ वाटते किंवा बद्धावस्थेंतून सुटूं पाहणाऱ्या मुमुक्षूची जी विकल मनःस्थिति असते, तिची काव्यमय आविष्कृति या करुण चिंतनिकेंत अतिशय उत्कटतेनें झाली आहे. केशवसुतांना हा कविताविषय इमर्सनच्या

---

* जानेवारी १९०१ च्या ‘सुविचारसमागमां’तील ‘ कर्तव्य आणि प्रीति ’ कवितेच्या पुढील पाठांतरावरून ही कविता केशवसुतांच्या मनांत चार वर्षें घोळत होती असें वाटतें. ‘जिथें तो विश्वात्मा वरुनि कवितेलागुनि वसे। अशा ठायीं माझें मज हरपलें श्रेय गवसे.’

Literary Ethics, Immortality, the Transcendentalist, the Domestic Life, Oversoul, Spiritual laws इत्यादि निबंधांवरून स्फुरला आहे. त्यामुळें साहजिकच त्यांत आपल्या अध्यात्मवादांतील रूढ परिभाषा आढळत नाहीं. उलट क्वचित् ती परिभाषा उलट अर्थानें योजलेली दिसते. पुन्हां ही चिंतनिका लिहितांना केशवसुतांची जी भूमिका आहे, ती कांहीं वीतराग साधकाची नाहीं. ती एका भावोत्कट कवीची आहे. त्यामुळें या चिंतनिकेंत विचाराच्या एकाग्रतेपेक्षां भावनेचा आवेग अधिक आहे. ही चिंतनिका 'मनोरंजनां'त प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच काळानें केशवसुतांनीं आपले निकटवर्ती कविमित्र किरात यांना एक पत्र पाठविलें होतें. तें प्रसिद्ध आहे. त्यांत ते लिहितात;— You can guess my state of mind from my piece in the last issue of MANORANJAN. A crack in the heart ! – But, alas ! Where is the restorative ?' [ मनो. पु. ११ भा. ७] या पत्रावरून केशवसुत सहजगत्या इंग्रजींत विचार कसा करीत आणि अध्यात्मासारखा गहन विषय देखील भावनेच्या भरांत कसा हाताळीत तें लक्षांत येईल. 'हरपलें श्रेय' या कवितेंत आपली संत्रस्त मनःस्थिति प्रतिबिंबित झाली आहे, आपलें अंतःकरण द्विधा झालें आहे. त्यावर सुख व शांति यांचा लाभ हाच एकमेव उपाय आहे. 'तो आपणांस कधीं मिळेल का ?' – अशी शंका त्यांनीं प्रस्तुत पत्रांत प्रकट केली आहे. त्यावर सश्रद्ध ज्ञान हाच एकमेव उपाय आहे.× परंतु केशवसुतांची मनोवृत्ति संशयग्रस्त आहे. ज्ञानाच्या शस्त्रानें संशयाचा विच्छेद करण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं नाहीं. म्हणूनच ती भावनेच्या भरांत आपल्या शंकाकुल उत्कंठेचें दर्शन घडवीत आहे.

केशवसुतांच्या या चिंतनिकेचे भिन्नभिन्न अर्थ लावण्यांत आले आहेत. कारण समीक्षकांनीं ते अर्थ लावतांना केशवसुतांच्या भावनिक भूमिकेचा, इंग्रजी विचारसरणीचा, वेगळ्या परिभाषेचा व तोकड्या वाणीचा नीटपणें विचार केलेला नाहीं. केशवसुतांच्या या चिंतनिकेंत एकूण सहा कडवीं आहेत. तीं परस्परांपासून पूर्णतया विभक्त आहेत. मात्र त्यांचा संबंध पालुपदाशीं स्वाभाविक रीत्या सांधण्यांत आला आहे. सान्ताला अनन्ताचा शोध घ्यावयाचा आहे. तें त्याला

---

× 'A crack in the heart !' या केशवसुतांच्या कल्पनेशीं जुळेल अशी कल्पना ज्ञानेश्वरींत आली आहे.

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ अ. ४ श्लो. ४२ यावर भाष्य करतांना श्रीज्ञानदेव म्हणतात :–

तरि तेणें ज्ञानशस्त्रें तीखटें । निखळु हा निवटे ।
मग निःशेष क्षत फिटे । मानसींचें ॥' अ. ४ ओ. २०६

( तीक्ष्ण अशा ज्ञानरूपी शस्त्रानें हा संशय समूळ छेदून टाकतां येतो. आणि मग मनाला झालेला संशयाचा घाव आपोआप नाहींसा होतो. )

सांपडत नाहीं. म्हणून ज्या ज्या स्थळीं त्याची प्रतीति येण्याचा संभव आहे, त्या त्या स्थळीं सान्ताचें 'हिंडणें' चालू आहे. हें हिंडणें सुरू असतांना बालवयांत अनन्त आपल्या समीप असल्याची त्याला आठवण येते, वाढत्या वयांत केवळ कर्मभोग म्हणून तें आपल्यापासून दूर गेलें आहे याची त्याला खेदपूर्ण जाणीव होते, त्याची वृत्ति अनासक्त असल्यामुळें तें पुढें परोक्षविषयक चिंतनांत रमतें, सृष्टीच्या स्निग्ध सहवासांत त्याला अनंताच्या अस्तित्वाचा क्षणिक आभास होतो, आपलें सान्तत्व नष्ट झाल्याशिवाय आपल्याला अनन्तत्वाची प्राप्ति होणार नाहीं हें सत्य मग त्याला पटतें आणि शेवटीं त्याच्या संपादनासाठीं तें आत्मोत्सर्गाचें दिव्य करण्यास सिद्ध होतें. या चिंतनिकेंतील हे निरनिराळे टप्पे लक्षांत घेतले आणि तिच्यांतल्या वेगवेगळ्या प्रतिमानांच्या मागला आशय ध्यानांत घेतला, तर मग तिचा अर्थ उलगडण्यास अडचण पडणार नाहीं.

केशवसुतांना मिल्टनच्या Paradise Lost ( नष्टनन्दन ) या काव्याच्या नांवावरून बहुधा आपल्या चिंतनिकेला 'हरपलें श्रेय' हें नांव देण्याची प्रेरणा झाली असावी. 'श्रेय' हा शब्द गीतेंत अ० ३।३५, ४।३३, ५।२२, १२।२ व १८।४७ या ठिकाणीं आला आहे. 'कल्याण,' 'मांगल्य' 'आनंद,' 'प्रसाद,' 'पारिपूर्णत्व' 'मोक्ष,' इत्यादि त्याचे भिन्नभिन्न अर्थ आहेत. केशवसुतांना ते सर्व अर्थ अभिप्रेत असावेत. प्रस्तुत शीर्षकांत बहुधा त्यांनीं 'श्रेय' हा शब्द 'मोक्ष' या अर्थानें योजिला असावा, कारण बद्धावस्थेंतून सुटूं पाहणाऱ्या मुमुक्षूला मोक्षाशिवाय दुसरें श्रेयस्कर तें काय असणार? सान्ताला शेवटीं अनन्तांतच विलीन व्हावयाचें आहे. तेंव्हां तेंच त्याचें श्रेय आहे. तें हरवलें आहे. अपूर्ण जीवात्म्याला परिपूर्णत्त्व साधून परमात्मा व्हावयाचें आहे. त्या श्रेयाच्या तो शोधांत आहे.

मिल्टनच्या 'नष्टनंदनां'त आदम आणि ईव्ह हीं जोंपर्यंत अव्याज अशा अज्ञानांत होतीं, तोंपर्यंत स्वर्ग त्यांना जवळ होता. परंतु पापपूर्ण असें ज्ञान प्राप्त होतांच तो त्यांना दुरावला, ही बायबलांतली कथा त्यांत गुंफण्यांत आली आहे. या कथेंतील कल्पनेचा उपयोग वर्डस्वर्थनें 'Ode on Intimations of Immortality from Recollections of Early Childhood' या आपल्या सुविख्यात 'अमरत्वावरील स्तोत्रां'त केला आहे. केशवसुतांच्या काळीं वर्डस्वर्थचें स्तोत्र अनेक रसिकांच्या आदराचा व कौतुकाचा विषय होतें. केशवसुतांनीं तें वाचलें असावें. परंतु त्यांना तें वाचावयाची स्फूर्ति इमर्सन्च्या Immortality या निबंधावरून झाली असावी. कारण त्या निबंधांत आत्म्याच्या सत्य स्वरूपासंबंधींचें विवेचन करतांना त्यानें वर्डस्वर्थच्या या स्तोत्राची पुढील शब्दांत प्रशंसा केली आहे;—' The real evidence about immortality is too subtle, and therefore, Wordsworth's " Ode " is the best modern essay on the subject.' वर्ड्स्वर्थच्या स्तोत्राला 'Essay' म्हणण्यांत इमर्सन्नें त्याचें वैचारिक स्वरूप ध्वनित केलें आहे. वर्ड्स्वर्थच्या स्तोत्रांतलाच विषय केशवसुतांच्या चिंतनिकेंत असला, तरी तिचें स्वरूप भावनामय आहे. वर्ड्स्वर्थनें आपल्या स्तोत्रांत त्याचा कविमित्र कोलरिज याच्या सहा

वर्षें वयाच्या मुलाचा निर्देश केला आहे*, व त्याच्या बालवयाच्या द्वारें पापपूर्ण ज्ञानापेक्षां पुण्यप्रद्म अज्ञान श्रेयस्कर असल्याचें सूचित केलें आहे. याच त्याच्या कल्पनेचा अवलंब केशवसुतांनीं प्रस्तुत चिंतनिकेच्या पहिल्या कडव्यांत अनन्ताचा शोध घेतांना लहान मुलीच्या ‘ लटक्या संसारीपणाचें व लटुपटीच्या घरदारा ’चें प्रतिमान योजून केला आहे.† कारण लहान मूल निष्पाप असल्यामुळें ‘ स्वर्गाची वसति ’ त्याच्या आसपास असते अशी पाश्चिमात्यांची भावना आहे. वर्ड्स्वर्थच्या स्तोत्रांत ती भावना व्यक्त झाली आहे.§ तिच्यावर भाष्य करतांना वर्ड्स्वर्थच्या कवितेचा एक टीकाकार म्हणतो; — ‘it may be, the poet suggests, that our present existence here on earth, with all its distractions and pleasures, has dulled in us, the memory of the "imperial palace" or heaven, whence our souls have come; just as the experiences of manhood and age certainly dull in us the memories of our childhood. इमर्सनच्या Old Age, The Domestic Love इत्यादि निबंधांत याच भावनेचें दर्शन होतें. या दृष्टीनें त्यानें The Domestic Love या आपल्या निबंधांत शैशवाच्या निरागसपणाचे गोडवे

---

*Behold the child among his new-born blisses.
A six years' Darling of a pigmy size !
See, at his feet, some little plan or chart,
Some fragment from his dream of human life,
Shaped by himself with newly-learned art;
    A wedding or a festival,
    A mourning or a funeral,— W. Wordsworth.

† केशवसुतांप्रमाणेंच दत्तांची ‘ बाललेखन ’ ही १८९९ सालीं लिहिलेली कविता याच कल्पनेवर आधारली आहे. केशवसुतांनीं ती ‘ सुविचारसमागमां ’त पाहिली असावी. कारण दोघांच्याहि कवितांत ‘ लट्टूपटीच्या घरदारा’ची कल्पना समान आहे;—

‘ पुढें खेळामधिं चित्त गुंग झालें
लट्टूपटिचें घरदार गळीं आलें ’—दत्त

§ Our birth is but a sleep and a forgetting ;
The Soul that rises with us, our life's star,
Hath had elsewhere its setting,
    And cometh from afar;
Not in entire forgetfulness,
And not in utter nakedness,
But trailing clouds of glory do we come
    From God, who is our home;
Heaven lies about us in our infancy !– W. Wordsworth.

अनुक्रम ३६३८९ ...... वि: ......
क्रमांक ...... नों दि: १२-१२-६४

गातांना त्यासंबंधीं निरनिराळ्या कवींचीं अवतरणें उद्धृत केलीं आहेत. त्यांपैकीं कोलरिजचें हें अवतरण स्मरणीय आहे: —' His ignorance is more charming than all knowledge. His flesh is angels' flesh all alive. " Infancy " said Coleridge, presents body and spirit in unity. The body is all animated. ' इमर्सन्च्या या प्रकारच्या निबंधांच्या परिशीलनानें केशवसुतांच्या अंतःकरणावर या भावनेचा ठसा फार खोलवर उमटला होता. ' Innocence is bliss ' या पाश्चात्यांच्या संकेताचा ' नैर्ऋत्येकडील वारा', ' पुष्पाप्रत ', ' म्हातारी ' इत्यादि त्यांच्या कवितांवर फार मोठा प्रभाव पडला आहे. तोच प्रभाव या चिंतनिकेच्या पहिल्या कडव्यांत दृष्टीस पडतो.

वर्ड्स्वर्थनें आपल्या अमरत्वावरील स्तोत्रांत लहान मुलाला पूर्वजन्माची स्मृति असते व एकदां आपण सर्वांचें परंधाम अशा परमेश्वरापाशीं होतों हें स्मरतें, असें म्हटलें आहे. * केशवसुतांनीं पहिल्या कडव्यांतील

'चुकचुकल्यापरि
वाटे अंतरिं
होउनि बावरि'

या अंतऱ्यांत पूर्वजन्माची तीच आनंददायक आठवण आतां तापदायक होत असल्याचें ध्वनित केलें आहे. वर्ड्स्वर्थनें ही पूर्वजन्माची कल्पना भारतीय साहित्यावरून घेतली आहे. परंतु नवल असें कीं, केशवसुतांनीं तीच कल्पना इमर्सन्च्या निबंधांवरून उसनी घेतली आहे. या कल्पनेसंबंधीं वर्ड्स्वर्थच्या कवितेचा एक समालोचक म्हणतो, – 'But we are to remember that the poet never asserts as a fact that he believes in a past existence. The idea is a very old one and is a feature of some religions, × such as Buddhism and the poet suggests it only for a poetic purpose.

---

*Thomas hood च्या ' I Remember Remember ' मध्यें हीच कल्पना आहे;

I remember, I remember
The fir trees dark and high,
I used to think their slender tops
Were close against the sky.
It was a childish ignorance,
But now 'tis little joy
To know I am farther off from heav'n
Than when I was a boy—

× 'बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ अ. ४ श्लो ५. गीता.

केशवसुतांच्या या चिंतनिकेच्या पहिल्या कडव्याचा अर्थ लावतांना थोडें कठिण वाटतें. कारण केशवसुतांनीं यांत आपल्याकडील रूढ परिभाषा क्वचित् उलट अर्थानें योजिली आहे. ‘ कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे’ या तुकारामांच्या अभंगांत, हे किंवा ‘ मला येथला लागला लळा । सासरिं निघण्या दाटतो गळा ’ या तांब्यांच्या गीतांत ‘ सासर ’ हा शब्द परमेश्वराच्या गृहासाठीं प्रयुक्त केला आहे. परमेश्वराशीं परिणय झालेल्या जीवात्म्याच्या दृष्टीनें ‘ खरें घर ’ तेंच आहे. ‘ कळ पळभर मात्र खरें घर तें ’ या चरणांत तांबे सांगतात. परंतु केशवसुत पूर्वजन्मीं जीवात्मा परमेश्वरापाशीं वास्तव्य करीत होता या संकेताचा आधार घेऊन त्या घराला ‘सासर’ असें म्हणत नाहींत. उलट ‘ माहेर ’ असें म्हणतात. आणि इहलोकांतील या क्षणभंगुर संसारास ‘ खरें घर ’ मानतात व ‘ तेव्हांचें सुख तें आतां । खऱ्या घरींहि न ये हातां ’ अशी काकुळतीला येऊन कुरकुर करतात. वस्तुतः परिणय झालेल्या जीवात्म्याच्या दृष्टीनें परमेश्वररूपी पतीचें घरच खरें घर म्हणजे सासर आहे. आणि ऐहिक संसार म्हणजे खोटें घर आहे. या कडव्यांत ‘ सुख ’ हा शब्दहि ते ‘ सच्चिदानंद ’ या अर्थानें प्रयुक्त करतात. यापूर्वीं ‘ वातचक्रां ’त त्यांनीं ‘ वाटे गिरक्या घेत मिळावें—। या पवनाच्या चक्रीं, होउनि लीन सच्चिदानंदांत ! ’ अशी मनीषा प्रकट केलीच आहे. तेव्हां प्रस्तुत कडव्याचा अर्थ लावतांना तेवढें अवधान ठेवलें पाहिजे.

जीवात्मा हा पूर्वजन्मीं देवासन्निध असतांना पुण्यवान् व सुखी होता. परंतु इहलोकीं जन्म घेतांच तो पापी व दुःखी बनला, हा संकेत वास्तविक बायबलांतला आहे. परंतु अशाच तऱ्हेचा संकेत गीतेंतहि आढळतो. ‘त्या विशाल स्वर्गाचा उपभोग घेऊन पुण्याची पुंजी संपली म्हणजे मानव मृत्युलोकांत पुनश्च येतात’.+ तेव्हां पहिल्या कडव्याचा अर्थ आकळतांना बायबलांतला परका संकेत आड येण्याचें कारण नाहीं.

या चिंतनिकेच्या पहिल्या कडव्यांत ‘ पूर्वजन्मा ’चा सिद्धान्त आहे, तर दुसऱ्या कडव्यांत ‘ पूर्वकर्मा ’चा किंवा ‘ पूर्वसंचिता ’ चा सिद्धान्त आहे. ‘ जसें कर्म तसें फळ ’ हा निसर्गाचा न्याय आहे. ‘ As you sow, so you reap ’ हें निष्ठुर सत्य कुणास माहीत नाहीं ? †

---

\+ ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं । क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ॥
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना । गतागतं कामकामा लभन्ते ॥ गीता. अ ९. श्लो. २१

† गीतेंत आणि ज्ञानेश्वरींत हें तत्त्व पुढीलप्रमाणें प्रतिपादन केलें आहे ;—
कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ अ. ४ श्लो. १२
तेथें जें जें कांहीं अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त ।
परि तें कर्मसिद्ध निश्चित । ओळख तूं ॥ ज्ञानेश्वरी. अ. ४ ओ. ७१
वांचूनि दें तें घे तें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक
येथें कर्मचि फलसूचक । मनुष्यलोकीं ॥ ७२ ॥
जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तें वांचौनि आन न निफजे ॥

‘प्राप्त जाहलें तें तुजला
तूं मागितलें जें देवाला,
ज्याचें मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें’

या ओळी लिहितांना केशवसुतांच्या समोर ‘मना! त्वांचि रे, पूर्वसंचीत केलें। तयासारिखें भोगणें प्राप्त झालें’ हे समर्थांचे चरण तर नसतील ना? केशवसुतांनीं हें ‘कर्मफला’चें तत्त्व स्पष्ट करतांना मोल, सौदा, हिरण्मय, विनिमय इत्यादि शब्दांनीं व्यापारव्यवहारांतील देवीघेवी-संबंधींचीं प्रतिमानें योजिलीं आहेत. कारण वाढत्या वयाबरोबर मनुष्याच्या बाल्यांतील निर्व्याजता हळुहळू लोपूं लागते आणि तो दिवसेंदिवस अधिकाधिक कुटिल व व्यवहारी बनूं लागतो. सान्ताचें आजपर्यंतचें आयुष्य व्यर्थ गेलें. त्यानें अनन्ताशीं सायुज्यत्व साधलें नाहीं. अविनाशी आत्म्याच्या विकासाकडे त्यानें दुर्लक्ष केलें. उलट ज्या शरीराची माती होणार आहे त्याला नसतें महत्त्व दिलें. हें त्यांनीं

‘दिलें हिरण्मय
हातीं मृण्मय;
हा हतविनिमय’

या अंतऱ्यांत अत्यंत दीनवाणीनें सूचित केलें आहे. आणि हें सूचित करतांना पूर्वी एकदां आपण ज्या सच्चिदानंदाचा अनुभव घेत होतों, तो अनुभव आपणांस पुन्हां कसा प्राप्त होईल याबद्दल ‘परत मला मम मिळे कसें?’ या आर्त शब्दांत चिंतातुरता प्रकट केली आहे.

या चिंतनिकेच्या तिसऱ्या कडव्यांत केशवसुतांसारख्या मनस्वी कवीचा ‘ध्यानयोग’ किंवा ‘अभ्यासयोग’ आहे. आणि त्याला ‘अनासक्तियोगा’ची जोड मिळाली आहे. सान्ताला या संसारांत राम वाटत नाहीं म्हणून तें अनन्ताचा शोध घेत असतें. हा शोध परोक्षांत ( invisible ) म्हणजे अव्यक्तांत लागेल असा त्याला संभव वाटत असल्यामुळें अणोरणीयांस असें त्याचें सूक्ष्म मन त्या परोक्षाच्या चिंतनांत रमत असतें. जड शरीर जरी बसल्याजागीं असलें, तरी सूक्ष्म मन त्या विशाल परमात्म्याचा शोध घेत असतें. हें सूक्ष्म मन म्हणजेच लिंगदेहांतला जीवात्मा. हा आत्मा अंतःकरणाच्या आंत तंडुलकणापेक्षां, यवाच्या दाण्यापेक्षां किंवा मोहरीपेक्षां सूक्ष्म आहे*, तर बाहेरच्या सृष्टींत पृथ्वीपेक्षां, वातावरणापेक्षां, आकाशापेक्षां व सर्व ग्रहांपेक्षां मोठा आहे. आत्म्याचें हें दुहेरी स्वरूप लक्षांत घेऊनच बहुधा केशवसुतांनीं जीवात्मा हा परमात्म्याच्या ध्यानधारणेंत मग्न होत असतो, हें सांगतांना किरणाच्या प्रकाशांत उडतांना दृष्टिगोचर होणाऱ्या सूक्ष्मातिसूक्ष्म अणूंची

* अणोयान्व्रीहेर्वा यवाद्वा सर्षपाद्वा श्यामकाद्वा श्यामाकतंडुलाद्वा एवम् आत्मा–छांदोग्य उपनिषद् ३–१४

प्रतिमा योजिली असावी. आत्म्याच्या या द्विविध स्वरूपाची कल्पना इमर्सन्‌च्या The over-soul या निबंधांतहि आढळते:—'The universe is represented in atom in a moment of time......The beauty of soul is immense.'

आपली ही ध्यानधारणा सांसारिक व्यवहारांत अडथळे उत्पन्न करते. परंतु आपलें लक्ष प्रेयाकडे नसून श्रेयाकडे असतें हें सांगतांना पुढें केशवसुतांनीं आपला 'अनासक्तियोग' सूचित केला आहे. लौकिकांत अपूर्णत्व आहे, तेव्हां मनोवृत्तीला त्याची हयगय केलेली चालते. परंतु अलौकिकांत पूर्णत्व व निःश्रेयस् आहे, म्हणून त्याच्या प्राप्तीसाठीं ती वेडी झाली आहे.

या चिंतनिकेचें चवथें कडवें निसर्गपूजेविषयींचें (Nature-Worship) आहे. ही सृष्टि म्हणजे परमेश्वराचें स्वरूप आहे. हिच्या रूपानें तो विश्वात्मा प्रत्यक्ष दर्शन देत असतो, ही कल्पना वेदकालाइतकी प्राचीन आहे. गीतेंतहि सातव्या, नवव्या व पंधराव्या अध्यायांत सृष्टि व ईश्वर यांच्या अभिन्नतेचे सिद्धान्त आहेत. उदाहरणार्थ, नवव्या अध्यायांतलें आठव्या श्लोकांतलें हें कृष्णवचन पहा;—

'प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥' +

निसर्गांतील या ईश्वरीय तत्त्वाचा प्रभाव वर्ड्स्वर्थ व इमर्सन् यांच्या साहित्यांत विशेष प्रमाणांत दृष्टीस पडतो. केशवसुतांवर या तत्त्वाचा संस्कार घडण्यास इमर्सन्‌च्या ग्रंथांचें वाचन कारण असावें. कारण या कडव्यांतील

'जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटतें;

या ओळी त्यांना इमर्सन्‌च्या पुढील उताऱ्यावरून सुचल्या असाव्यात—'At a call of a noble sentiment, again the woods wave, the pines murmer, the rivers roll and shine and the cattle low upon the mountains, as he saw and heard them in his infancy.' अनन्ताचा साक्षात्कार निसर्गांत घडेल अशी सान्ताची अपेक्षा असते. परंतु साक्षात्काराऐवजीं त्याला अनन्ताचा केवळ आभास होतो व मग तो निराशेनें अनन्ताच्या नांवानें हांका मारीत सुटतो. केशवसुतांनीं या रीतीनें या कडव्याचा शेवट हृदयस्फोटक केला आहे. केशवसुतांच्या कवितासंग्रहांत या कडव्यांतील अंतऱ्याच्या पहिल्या चरणाचा पाठ 'स्वभाव दाउनि' असा आहे. तो वस्तुतः 'स्व-भास दाउनि' असा हवा. त्यानें अर्थ अधिक खुलतो. केशवसुतांच्या

---

+ 'मी आपल्या प्रकृतीचा आश्रय करून प्रकृतीच्या आधीन असा हा भूतसमुदाय पुन्हां पुन्हां त्याच्या कर्मानुसार निर्माण करीत असतों.' प्रकृति म्हणजे निसर्ग. (Nature)

'फुलपांखरूं,' 'पुष्पाव्रत,' 'वातचक्र' इत्यादि चिंतनपर निसर्गकवितांत ते निसर्गांत ईश्वरीय अंश कसा पाहत याची प्रतीति पटते.

या चिंतनिकेंतला मुख्य विषय पांचव्या कडव्यांत आला आहे. सान्ताला अनन्ताची ओढ लागली आहे. परंतु सान्त जोंपर्यंत स्वतःचें अंतत्व सोडत नाहीं तोंपर्यंत त्याला अनन्तत्वाची प्राप्ति होणें शक्य नाहीं. केशवसुतांनीं हें तत्त्व मांडतांना जे शब्द योजिले आहेत, त्यांनीं अर्थबोध बरोबर होत नाहीं.

'भीडभाड माझी फिटली
जग म्हणतें कीं, 'ही उठली!'
जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे?'

या कडव्यांत 'भीडभाड' व 'जनमर्यादा,' या शब्दांनीं त्यांनीं जीवाचें सान्तत्व, 'जग' या शब्दानें लौकिकसंसार आणि 'अमर्याद' या शब्दानें 'अनन्तत्व' सुचविलें आहे. या मूळ कवितापाठापेक्षां 'काव्यरत्नावलीं' तील पाठ अर्थबोधाच्या दृष्टीनें अधिक सरस व सुंदर आहे:-

'जन म्हणती कीं, 'ही उठली'
माझी मर्यादा फिटली
ती धरुनि कसें तें मिळतें
न असे मर्यादा ज्यातें?'

'मासिक मनोरंजनां'त हाच पाठ आहे. परंतु दुसरी ओळ आरंभीं आहे व पहिली ओळ नंतर आहे असा थोडासा फरक आहे. सान्ताला अनन्तांत विलीन व्हावयाचें आहे, तेव्हां त्यानें लौकिक बंधनांकडे लक्ष देऊन कसें चालेल? लोकांनीं जरी त्याला हा संसारांतून उठला असें म्हटलें तरी चालेल. त्यानें त्याची पर्वा करतां कामा नये. त्याला जर अनन्तत्वाची प्राप्ति करून घ्यावयाची आहे, तर मग त्यानें हे सर्व लौकिक बंध झुगारले पाहिजेत. कारण या जीवितापासून जेव्हां जीवात्म्याची तातातूट होईल, तेव्हांच तो परमात्म्यांत विलीन होऊं शकेल. सान्त आणि अनन्त यांच्या परस्परसंबंधाचें हें तत्त्व विशद करतांना केशवसुतांच्या मनांत 'Boundless' हा इंग्रजी शब्द असावा. त्यासाठीं त्यांना 'अनंत' हा अन्वर्थक प्रतिशब्द आठवला नाहीं. त्याऐवजीं त्यांनीं त्यासाठीं 'अमर्याद' या भलताच प्रतिशब्द योजिला आणि त्याच्याच अनुषंगानें 'भीडभाड' व 'मर्यादा' हे शब्द योजिले. अशा रीतीनें शब्दयोजना भलतीच झाल्यामुळें या चिंतनिकेचा आशय अकारणच क्लिष्ट व दुर्बोध झाला. इमर्सननें सान्ता-अनन्ताचा हा आकर्षक संबंध आपल्या Immortality आणि Literary Ethics या निबंधांत मोजक्या शब्दांत पारिणामकारकतेनें सांगितला आहे;—'It is curious to find the selfsame feeling, that it is not immortality, but eternity—not

duration but a state of abandonment to the highest, and so the immortality, snaring of his perfection. ' किंवा ' When I see the daybreak I feel perhaps the pain of an alien world, a world not yet subdued by the thought,... or I am cheered by the moist, warm, glittering, budding, melodious hour, that takes down the narrow walls of my soul and extends its life and pulsation, to their very horizon. That is morning, to cease for a bright hour to be a prisoner of this sickly body, and to become as large as nature,

या कडव्याचा उत्तरार्ध पूर्वार्धाशीं कांहींसा विसंगत आहे. पूर्वार्धांत जीव हा सान्त म्हणजे अपूर्ण आहे, तो अनन्त म्हणजे पूर्ण होण्याची पराकाष्ठा करीत आहे, असा भाव आहे. त्यालाच जोडून केशवसुतांनीं आपण आपलें कवित्व परिपूर्णत्वाप्रत नेण्याचा प्रयत्न करीत आहोंत, परंतु तो सफल होत नाहीं असें निवेदन केलें आहे. आध्यात्मिक विषयाचें विवेचन चालू असतांना त्यांनीं मध्येंच लौकिक विषय आणला आहे. कदाचित् त्या दोन्ही विषयांत पूर्णत्त्वाची ओढ ही समान आहे, ती लक्षांत घेऊन त्यांनीं त्या दोन विषयांचा कसाबसा संबंध जोडला असावा. केशवसुतांना आपल्या कवित्वशक्तीविषयीं आत्मविश्वास होता आणि तो यथार्थ होता याची साक्ष

' एक शब्द बोलेन जरी। सकलां कुंठित करिन तरी '

किंवा

' हृदयांतून न जे बोल। निघती, ते सगळे फोल'

या त्यांच्या उक्ति देतील.

या चिंतनिकेच्या अखेरच्या कडव्यांत परमात्म्याच्या प्राप्तीकरितां उत्कंठित जीवात्मा आत्मोत्सर्गाचें दिव्य करण्यासहि कसा सिद्ध असतो, तें 'सती व तिचा मृत पति' आणि 'दीपशिखा व पतंग' यांच्या उज्ज्वल दृष्टान्तांनीं स्पष्ट केलें आहे. मात्र एका दृष्टान्तांत दिव्य करणारी व्यक्ति स्त्री आहे, तर दुसऱ्यांत ती पुरुषावाचक आहे. हा दुसरा दृष्टान्त केशवसुतांना इमर्सन्च्या पुढील कल्पनेवरून सुचला असावा;— 'There are thoughts beyond the reaches of ourselves. We are not the less drawn to them. The moth flies into the flame of the lamp. Then a light as if leaping from a fire, will on a sudden be enkindled in the soul, and will then itself, nourish itself.' या कडव्यांतील ' संसृतिविमुखी ' हें विशेषण केशवसुतांच्या तत्कालीन मनोवृत्तीच्या दृष्टीनें लक्षणीय आहे. या चिंतनीकेवरील टीपेंत ' संसारांत राम नाहीं ' असें ते म्हणतात, तिसऱ्या कडव्यांत ' हयगय त्यांची मज जांची । मज न परी पर्वा त्यांची ' असें बजावतात, ' म्हातारी ', ' क्षणांत नाहींसे होणारे दिव्यभास ', ' फुलपांखरूं ' ' पुष्पाप्रत ' ' वातचक्र ' इत्यादि कवितांत संसारांतील व्यावहारिक जीवनाविषयीं ते असेच त्राग्याचे व वैतागाचे उद्गार काढतात. तेव्हां त्यांना उच्च कोटीच्या कवितालेखनाकरितां शान्त व निर्वेध असें जीवन हवें होतें हें उघड आहे. केशवसुतांच्या या

चिंतनिकेंत अध्यात्म आणि लौकिक या दोन्ही विषयांची कळत नकळत भेसळ झाली आहे. त्यांच्या या चिंतनिकेंत लौकिकानें अलौकिकाचें व वैतागानें विरागाचें रूप घेण्याचा प्रयत्न केला आहे. बालवयांतला निर्मळ आनंद व निश्चिंत जीवन यांचा त्यांना वाढत्या वयाच्या विवंचनांत व वंचनांत प्रत्यय येत नव्हता. त्यामुळेंच त्यांनीं या शेवटच्या चिंतनिकेच्या शेवटीं

‘ मजपासोनी
हाय ! हिरोनी
नेलें कोणीं ! —
म्हणुनि जीव पाखडीतसें
न परि हरपलें तें गवसे

असे विषादपूर्ण उद्‌गार काढले आहेत. त्यांत सागरापासून दुरावलेल्या मासोळीची तगमग आहे, तळमळ आहे !

केशवसुतांच्या प्रस्तुत चिंतनिकेची वाणी मोघम आहे, कडवीं एकमेकांपासून स्वतंत्र आहेत आणि प्रतिमानांमागला अर्थ सूचक असला, तरी क्वचित् तो रूढ संकेतांविरुद्ध आहे. ‘न परि हरपलें तें गवसे ’ या पालुपदांतलें ‘ तें ’ हें सर्वनाम पूर्वजन्मीं जीवात्मा परमात्म्याच्या घरीं सुखरूप होता, तेथील त्याच्या सुखी व समाधानी जीवनास अनुलक्षून आहे. परंतु त्याची योजना एखाद्या कूट-प्रश्नाच्या स्वरूपाची झाली आहे. त्यामुळें त्याचें सूचक स्वरूप पार नष्ट झालें आहे. परमेश्वराच्या घरच्या जीवनाला ‘ लट्टूपटीचें घर ’, ‘ लटकासंसार ’ व ‘ माहेर ’ आणि येथील घरास ‘ खरें घर ’ म्हणण्यांत रूढ संकेतांची उलटापालट झाली आहे. मात्र ‘ पूर्वकर्म ’ व ‘ सूक्ष्म आत्मा ’ यांच्या-साठीं योजिलेलीं ‘ देवघेवीचा सौदा ‘ व ‘ अणु ’ यांचीं प्रतिमानें सर्वस्वी नवीं व निराळीं आहेत. पुन्हां त्यांत ‘ दिलें हिरण्मय। हातीं मृण्मय ’ या वैषम्ययुक्त विषम अलंकाराच्या योजनेमुळें एक प्रकारची हृदयंगम आर्तता उत्पन्न झाली आहे. ‘ म्हणुनी विजनीं मी जात्यें। स्वच्छंदें त्या आळवित्यें ’ या चरणांतील ‘ विजन ’ व ‘ स्वच्छंदें ’ या शब्दांवर कळत नकळत श्लेष साधले आहेत. ‘ विजन ’ या शब्दाचा अर्थ जसा ‘ अरण्य ’ हा होऊं शकेल, तसा ‘ जनसंमर्दापासून दूर ’ हाहि होऊं शकेल. त्याचप्रमाणें ‘ स्वच्छंदें ’ या शब्दाचा अर्थ जसा ‘ मुक्तपणें ’ तसा ‘ पद्यरचनेसाठीं स्वतः निर्माण केलेला छंद ’ असाहि होऊं शकेल. शेवटच्या कडव्यांत ‘ सती व तिचा मृत पति ’ आणि ‘ दीपशिखा व पतंग ’ यांचे भावानुरूप दृष्टान्त योजण्यांत आले आहेत. ज्ञानेश्वरींतील दृष्टान्तांप्रमाणें त्यांचें स्वरूप कांहींसें उपमामूलक आहे. मात्र त्यांचा भर केवळ साधर्म्यदर्शनावरच आहे.

या चिंतनिकेचा एक विशेष म्हणजे तिची भाषा घटलेली आहे. केशवसुतांनीं या चिंतनिके-नंतर लिहिलेली कविता उपलब्ध नाहीं. तेव्हां पुढें पुढें संस्करण व परिष्करण यांच्या द्वारें त्यांची भाषा कशी घडत होती त्याचें ही चिंतनिका प्रत्यक्ष प्रमाण आहे. या चिंतनिकेची भाषा ‘लट्टूपटीचें घरदार’, ‘हातास येणें’, ‘ चुकचुकल्यापरि वाटणें ’, पदरीं पडणें ’, ‘ हयगय करणें ’,

'एखाद्यासाठीं वेडें होणें', 'साक्ष पटणें', 'हांका मारणें', 'प्राणाहुति देणें', 'जीव पाखडणें' इत्यादि अर्थपूर्ण वाक्प्रचार व संप्रदाय यांनीं संपन्न असल्यामुळें अन्वर्थक व प्रभावोत्पादक झाली आहे.

केशवसुतांची ही चिंतनिका पहिल्या चिंतनिकांप्रमाणेंच गेय आहे. त्यांनीं तिला 'पाहुं चला हरि कोणिकडे' या एका जुन्या लोकप्रिय स्त्रीगीताची 'चाल' लाविली आहे. त्या 'चाली'चा त्यांनीं 'मनोरंजनां'त निर्देश केला आहे. केशवसुतांच्या कुमारकालांत मृदंगाच्या 'धिम्नाधिम्नक धिम्ना धी' या बोलांवर टिपऱ्या वाजवीत गोफ गुंफण्याची चाल असे. त्या बोलांच्या तालावर 'पाहुं चला हरि कोणिकडे' या स्त्रीगीताची उभारणी झाली आहे. केशवसुतांपूर्वी कै. वि. मो. महाजनि व कै. गो. वा. कानिटकर यांनीं आपल्या कवितांत या चालीचा उपयोग केला आहे. या चालींत सुरुवातीस प्रत्येकीं ८+६=१४ असे मात्रांचे सहा चरण असतात, मग अंतऱ्याचे प्रत्येकीं ४+४=८ मात्रांचे तीन चरण असतात व नंतर पुन्हां प्रत्येकीं ८ + ६ = १४ मात्रांचे दोन चरण असतात. ते पालुपदाच्या अन्त्य यमकाशीं जुळते असतात किंवा नसतात. केशवसुतांनीं ते जुळते–मिळते ठेवले आहेत. त्यामुळें चिंतनिका श्रुतिसुभग झाली आहे. या चालीच्या चरणांची संख्या ज्या त्या कवीच्या इच्छेप्रमाणें कमी जास्त असूं शकते.

या चिंतनिकेंत '**त्रिखंड हिंडुनि धुंडि**तसे । न **प**रि हर**प**लें तें गवसे' किंवा 'स्वपति-चि**ते**वरि उडी स**ती** । संसृ**ति**विमुखी घेई **ती**' यांसारखे अनुप्रास सहजगत्या साधले आहेत, आणि 'चुकल्याचुकल्याप**रि**, वाटे अंत**रिं**, होउनि बाव**रि**' यांसारखीं यमकें अगदीं सहज साधलीं आहेत; त्याचप्रमाणें 'लटुपटी,' 'चुकचुकणें,' 'हयगय,' 'झटदिनिं' यांसारखे ध्वन्यनुकारी शब्द आपोआप पडले आहेत; त्यामुळें तिच्यांत अन्तर्गत स्वाभाविक संगीत संचारित झालें आहे. बालकवि ठोंबरे यांच्या 'आनंदीआनंद गडे। इकडे तिकडे चोंहिकडे' या गीतामुळें ही चाल आधुनिक मराठी कवितेच्या क्षेत्रांत विशेष प्रसार पावली आहे.

प्रस्तुत चिंतनिकेंत केशवसुतांनीं आपल्या अध्यात्मप्रवण मनोवृत्तीवर एका वाढत्या वयाच्या प्रबुद्ध स्त्रीचा आरोप केला आहे. बालपणीं ती ज्या ठिकाणीं होती, त्या ठिकाणची ओढ तिला लागली असतांना तिच्या मनाची जी तगमग होते, तिचें तिनें या चिंतनिकेंत निवेदन केलें आहे. अर्थात् तें केशवसुतांचेंच आत्मनिवेदन आहे. आत्मनिवेदन हा भक्तीचा चरम प्रकार आहे. मनोवृत्तीनें आत्मनिवेदन केल्यामुळें या चिंतनिकेचें स्वरूप एखाद्या नाटकांतील स्वगत भाषणा-प्रमाणें ( monologue ) झालें आहे. अशा प्रकारच्या नाट्यनिवेदनामुळें ही चिंतनिका स्वाभाविकच भावोत्कट झाली आहे. या चिंतनिकेंत जिवाला झोंबणारा प्रबल व प्रखर जिव्हाला उतरला आहे.

कै० वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं या चिंतनिकेचें मूळ वर्ड्स्वर्थच्या सुप्रसिद्ध ODE मध्यें आहे असें म्हटलें आहे. या जगांत जन्मास येण्यापूर्वी जीव हा परमेश्वराच्या सन्निध असतो. परंतु येथें येतांच तो 'लटका संसारी' बनतो. त्यामुळें परमेश्वराच्या सान्निध्यांत त्याला जें सुख लाभलेलें असतें, तें हळुहळू लोपत लोपत पार नष्ट होतें. तें सुख म्हणजेच 'हरपलें श्रेय'

असें त्यांचें म्हणणें आहे. [ मनो. जुलै, ऑगस्ट, आक्टो, नोव्हें. १९२० ] कै. अनंततनयांनीं या चिंतनिकेवर टीप लिहिली आहेः–'बुद्धीनें ज्ञानाचा समाश्रय केल्यावर तिचा संकुचितपणा नाहींसा होतो. सान्तानें अनन्ताची प्राप्ति होणें शक्य नाहीं.' ही टीप प्रस्तुत चिंतनिकेवर प्रकाश पाडणारी दीपिका आहे यांत शंका नाहीं. [ केशवसुतांची निवडक कविता. संपादक – ना. म. भिडे. ] केशवसुतांचे कनिष्ठ बंधु कै. सीतारामपंत दामले यांनीं 'मनुष्याचा आत्मा हा जड देहांत गुरफटलेला असतो. त्याला आपण पुनरपि परमात्म्याशीं केव्हां संलग्न होऊं अशी तळमळ लागलेली असते. त्याची स्थिति' या चिंतनिकेंत आविष्कृत झाली आहे असें सांगितलें आहे, तें खरें आहे. [ केशवसुतांची कविता. आवृत्ति १९२१ ] 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाचे कर्ते कै. वर्तक यांना या चिंतनिकेचा अर्थ मुळींच उमगला नाहीं. 'ही स्त्रीविषयक एक सामाजिक कविता आहे' असें ते गृहीत धरून चालले आहेत. [ तुतारीचे पडसाद. ] कै. डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन यांच्या कल्पनेप्रमाणें केशवसुतांची प्रतिभा ही पुढें पुढें क्षीण होत चालली होती. तेव्हां तिला व तिच्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखाला उद्देशून ही चिंतनिका आहे. [ अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, भाग १ ला. ] परंतु त्यांचें हें मत अवास्तव आहे.

केशवसुतांची ही चिंतनिका वस्तुतः त्यांच्या चिंतनशील मनोवृत्तीची द्योतक आहे. त्यांच्या अस्थिर व अल्प आयुष्यांत त्यांच्या अस्वस्थ मनांत पुढेंपुढें लौकिक व पारलौकिक विषयांच्या चिंतनाची रस्सीखेंच चालू होती. त्यांनीं किरातांना पाठविलेल्या पत्रांत त्या मनःस्थितीचा उल्लेख आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ही चिंतनिका स्फुरल्यानंतर अवघ्या पांच महिन्यांनीं ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं प्लेगनें हुबळी येथें त्यांचा अंत झाला. ज्या परम सुखाच्या प्राप्तीकरितां त्यांचा मुक्त आत्मा आयुष्यभर तळमळत होता, तो शेवटीं आपल्या जड शरीराला येथेंच सोडून, त्या परमसुखाचा दाता जो परमात्मा, त्यांत विलीन झाला !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३८e वि: ...
क्रमांक ........ नों. दि. ...



के. ९

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36368........ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: 12-11-56

# बारा
# चिन्तनपर
# कविता — केशवसुत

□ □ □ □ □ □ □

**क्र. ६. सृष्टि आणि कवि.** [ शिखरिणी ]

वयस्या, गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुर,
कसा गाऊं तीच्यापुढतिं वद मी पामर नर ?
तशीं ती गातांना श्रुतिसुभग तीं पक्षिकवनें
कशासाठीं गावीं अरस कवनें मीं स्ववदनें ?

मिषानें वृष्टीच्या खळखळ अशी सृष्टि रडतां
कुणाची ढाळाया धजल तसले अश्रु कविता ?
निशीयीं ती तैशी हळु मृदु मरुच्छ्वास करितां
कवीची गा कोण्या त्यजिल तसले श्वास दुहिता ?

आक्टोबर १८८६ मासिक मनोरंजन. जून १९०३

[ क्रमांक ८७ ची ह्याच मथळ्याची एक कविता ह्यापूर्वी 'केशवसुत आणि इमर्सन' ह्या निबंधांत इमर्सन्‌च्या मूळ कवितेसह दिली आहे. केशवसुतांचे बंधु मोरो केशव दामले ह्यांचा 'ग्रंथमालें'त 'काव्यसुख' हा लेख आहे. त्यांत त्यांनीं काव्यसुखासंबंधींचे इमर्सन्‌चे धीरोदात्त उद्‌गार शिखरिणी वृत्तांत भाषांतरून दिले आहेत. तें भाषांतर ह्या स्थळीं अनुरूप म्हणून देत आहें,— ]

कवे ! भूलोकीं तूं अससि बलवान् ! इंद्रसम तूं !
पहा सृष्टीशोभा ! कथन कवनीं तीच करि तूं !
तुझ्या काव्यानंदें रसिक, रमणी नाणिति मनीं ;
मनीं त्यांच्या खेळे सकल वसुधा तीच रमणी !!

— ग्रंथमाला [ ? ]

## क्र. २८. रा. वा. ब. पटवर्धन, मु. नागपूर यांस

आहे तुला सर्वेहि सृष्टि मोकळी
व्योमांतली सर्वहि तेंवि पोकळी;
संचार कीजे तर तूं स्वमानसें,
कोठें जराही प्रतिबंध तो नसे. ४

या अन्तरालांतिल तारकांत
आत्मे कवीलागुनि दीसतात;
कांचेमधूनी दिसतें जनांला
धोंड्यामधूनीहि दिसे कवीला ! ५

निर्जीव वस्तु तर लाव वदावयाला,
जंतूंस लावहि विचार करावयाला,
आम्हां शिकीव सुवचीं सुर व्हावयाला,
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला ! ६

ऐकती न बघती न जें जन,
गम्य होयचि कवींस तें पण;
हे म्हणूनि नरजातिचे खरे,
नेत्रकर्णचि नव्हेत का बरें ? ७

पुणें १८८८

## क्र. ४१ पुष्पाप्रत × [ पंचचामर ]

फुला, सुरम्य त्या उषेचिया सुरेख रे मुला,
विकास पावुनी अतां प्रभाव दाव आपुला ;
जगांत दुष्ट दर्प जे भरून फार राहिले,
तयांस मार टाकुनी सुवासजाल आपलें

× पुष्पा ! का. र.

तुझ्याकडे पहावयास लागतील लोक ते,
प्रीतिचें तयांस सांग तत्त्व फार रम्य तें :—
जिथें दिसेल चारुता तिथें बसेल आवडी,
मेळवा म्हणून सत्य चारुतेस तांतडी.
तुझ्यांतल्या मधूस मक्षिकेस नेउं दे लुटून,
स्वोपयोगबद्धतेमधून जा तधीं सुटून ;
जगास सांग अल्प मी असूनिही, पराचिया
जागतों हिता स्वहृद्यदानही करूनियां.
बालिका तुला कुणी खुडील कोमलें करें,
त्वदीय हास्यभंग तो तधीं घडेल काय रे ?
मृत्युची घडी खुडी जधीं जगीं कृतार्थ ते
तधीं तिहीं न पोंचणें जराहि शोकपात्रते !
वा, लतेवरीच शीघ्र शुष्कतेस जाइं रे,
रम्य दिव्य जें तयास काल तूर्ण नेइं रे;
दुःख याविशीं कशास मन्मनास होतसे ?
उदात्त कृत्य दिव्य तें क्षणीं करून जातसे. +
जा परंतु मी तुला धरीन आपल्या मनीं
मुके त्वदीय बोल बोल्वीन सर्वही जनीं ;
अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया
जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया !

१८८९ मनोरंजन व निबंधचंद्रिका. डिसें. १८९९

काव्यरत्नावलि. मार्च १८९९

## क्र. ५२. प्रियेला सादर केलेली पुष्पमाला किंवा कर्तव्य आणि प्रीति.

[ शिखरिणी ]

स्वनांहीं तें होतें विपिन मधुरे ! फार गढलें, ×
मुलांच्या शब्दांहीं स्वसदन असे जेंवि भरलें;
सुगंधें तें होतें स्थल भरुनि गेलें अतिशय,
तुझ्या प्रेमानें हें भरुनि असतें जेंवि निलय ! १

---

+ हा श्लोक मनोरंजन व निबंधचंद्रिकेंत नाहीं.

× खगांच्या गानें तें विपिन मधुरे ! फार गढलें—सु.स.

तरीसुद्धां तेथें, मज गमतसे, लौकिक नव्हे,—
असें कांहीं होतें, कथन करण्या जें मज न ये;—
वसे तो विश्वात्मा वरुनि कवितादेविस तिथें
वसें जैसा मी हा मनुज तुजला घेउनि इथें ४
मनीं माझ्या व्हावी चलित कविताशक्ति, म्हणुनी
कशाला एकाकी फिरत असतों नित्य विपिनीं,—
ला, तूं त्या ठायीं असतिस तरी, हें समजतें;
कदाचित् तूं गाणें मधुर रचिलें तेथ असतें ! ५

करमणूक १५. ११. ९०
काव्यरत्नावलि जाने. १९००
सुविचारसमागम. जाने. १९०१

**क्र० ५४. भृंग** [ मणिबंध वृत्ताच्या चालीवर ]

भृंगा ! दंग अहा ! होसी,
गुंगत धांव वनीं घेसी ;
तुजमागुनि वाटे यावें,
गोड फुलें चुंबित गावें !

रवि येत असे उदयातें,
अरुणतेज विलसत दिसतें;
तरी तिमिर हें विरल असे,
धुकें भरुनि न स्पष्ट दिसे !
कविच्या हृदयीं उज्ज्वलता
आणिक मिळती अंधुकता;
तीच स्थिति ही भासतसे,
सृष्टी कवयित्रीच दिसे !
तिच्या कल्पना या गमती
कलिका येथें ज्या फुलती
सुगंध यांतुनि जो झुकतो
रस त्यांतिल जो पाझरतो !

---

जिथें तो विश्वात्मा वरुनि कवितेलागुनि वसे
अशा ठायीं माझें मज हरपलें श्रेय गवसे. — सु. स.

भृंगा ! आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन !
गा ! तूं गा ! नादी भ्रमरा !
मी गणमात्रा जुळणारा !

शुक पंजरबंधीं घालूं
त्या पढवूं नरवाग् बोलूं,
श्रुतिवैचित्र्या बघणारे
आम्ही मात्रा जुळणारे !

कवि, आम्हांलागुनि म्हणणें
+ कविशब्दार्था लोळवणें !
अस्मद्गान नव्हे 'गान'
तें गाना चिंध्यादान !

परंतु भृंगा ! तव गान
परमानंदें परिपूर्ण
* उदासीन ही जगाविशीं
तव तन्मयता सृष्टीशीं !

अस्मदीय हृदयीं ठरलें
कीं जग हें दुःखें भरलें !
म्हणुनी सुंदरतेलाही
कुसें अम्हां दिसती पाहीं
परि तव गानांतून, अले !
थबथबला हा भाव गळे :-

---

– करमणूक –
+ 'कविच्या अर्था लोळवणें !
अमुचें गान–कसचें गान !
भृंगा ! आणि तुझें गान

* बेफिकीर जगताविषयीं
तल्लिनता सृष्टीशीं ही !
जग हें दुःखानें भरलें
अमुच्या हृदयीं हें ठरलें.

– सुविचारसमागम –
'कवि' शब्दार्था लोळवणें
गानाला चिंध्यादान

उदासीन वा जगाविशीं
तादात्म्य तुझें सृष्टीशीं
जग हें दुःखानें भरलें
मनीं आमुच्या हें ठसलें !

“ गुङ्ग गुङ्ग गुङ्ग गुङ्ग !– भान नसे !
सृष्टि अहा ! गुङ्ग ! मधुर असे !
“ दुःख–वदा तें केंवि असे ?
अश्रू – तें हो काय ? कसें ?

फुलें फुलति, परिमल सुटती,
रस गळती गुङ्ग सौख्य किती ! ”
जाइ, जुई, मोगरी भली,
कमलिनीहि सुंदर फुलली;

मधु यांचा सेवुनि गोड
पुरवीं तूं अपुलें कोड !
प्रीति, चारुता, आनंद
सिंचिति सृष्टीचा कंद

वरुनि नभांतुनि चंडोल
ओतितसे हेची बोल
खालीं तव गुंजारव हा
प्रतिपादितसे तेंचि अहा !

[वसंततिलका]

होईल का रसिकता तव लब्ध मातें ?
गुंगी मिळेल मजला तव केधवां ते ? ×
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें !

खेड. १९ नोव्हेंबर १८९०

करमणूक २९.११.९०
सुविचारसमागम फेब्रुवारी १९०१
काव्यरत्नावलि डिसेंबर १९०४

**क्र. ६५. पुष्पाप्रत** [अंजनीगीत]

पुष्पा ! सुंदर किति तूं दिससी !
सौकुमार्य माधुर्यहि धरिसी !
तुजला बघतां मन माझें तूं–वेडें रे करिसी !

---

× गुंगी तुझी मज मिळेल कधीं तरी ते ?—सु. स.

तूं आणिक मी पूर्वी होतों
खेळगडी रे ! स्मरुनि अहा तो !
काळ सुखाचा, आतां चित्ता-खेद फार होतो ! ×
मुग्ध मधुरता चित्तीं घेतां,
पूर्वी अपुली होती समता;
गेला गेला काळ अहह तो !-फेर कित्ती आतां !
सौकुमार्य तव अजुनी आहे !
हंसतचि आहे हास्य तुझें हें;
परि मम भाळीं ढग अश्रूंचा-हाय ! डंवरला हे !
तुजला पाहुनि मीं नाचावें,
दुडदुड धांवत तुजशीं यावें,
प्रेमें तुजला स्वकरीं घेउनि-सखया चुंबावें !
आतांहि गमे घ्यावें तुजला,
परी सुटतसे कंप कराला !
दिव्यत्वाला स्पर्श कराया-भय वाटे मजला !
रम्य धुक्याची अद्भुत सृष्टि
तींत उघडिसी अपुली दृष्टि,
मग तो भास्वान् तुजवरि करितो-तेजाची वृष्टि !
मरुद्गण तुझ्या पाळणियाला
तत्पर आंदोलन द्यायाला,
पक्षिमुखांहीं स्वर्ग तुझ्यावरि-गाई गीतांला !
रम्य तुझें बा जिणें कितीतरि, +
परिमलयश तव जाय भूवरी,
कालहि तुझिया दिव्यत्वाला-वाटे नमन करी !
चिरतरुणा रे ! चिररुचिरा रे !
तुजसन्निध तो वास बरा रे !
तुजमजमध्यें परी केवढी-आहे रुंद दरा रे ! *

---

× देतो

+ धन्य तुझें गा ! जिणें कितीतरि
* रे ! चिरतरुणा रे ! चिररुचिरा !
तुझियाजवळीं वास तो बरा !
तुजमजमध्यें परी केवढी - आहे रुंद दरा ! } —का. र.

काळोखाच्या जगामधें या,
मृत आशांच्या चितांवरुनिया
पिशाच्च माझें भटकत आहे– शांति नसेचि तया !
मच्चित्ताच्या क्षितिजावरतीं
नृत्याला जीं स्वप्नें करिती
निदान, त्यांच्यामध्यें मजला–भासो तव मूर्ति !

[ इंद्रवज्रा ]

सौभाग्य पुष्पा ! तव गावयाला
मी पात्र नाहीं गमतें मनाला;
भृंगे तुझें स्तोत्र सुरेख गाती
ऐकूनि तें सर्व पळोत खंती !

१६ मार्च १८९२ — करमणूक २६ मार्च १८९२
काव्यरत्नावलि ऑगस्ट, १९०१

### क्र. ७४. आहे जीवित काय? [ शार्दूलविक्रीडित ]

आहे जीवित काय? केवळ असे निःसार भासापरी?
किंवा स्वप्न असे? उठे बुडबुडा कालप्रवाहावरी?
दुःखें काय अनंत त्यांत भरलीं? कीं कष्ट जीवा पडे?
सौख्याचें न तयांत नांव अगदीं ऐकावया सांपडे !
नाहीं स्वप्न–न भास–वा बुडबुडा जीवित्त्व साचें असे !
प्रेमानें परमेश्वरास भजतो जो निर्मलें मानसें
लोटी निर्मल सौख्य सिंधुलहरी त्याचेवरी जीवित,
तो आनंदनिधान शैलशिखरीं क्रीडा करी संतत !

करमणूक ११·३·९३

### क्र. ७६. क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास × [शार्दूलविक्रीडित]

[ कवि, चित्रकार आणि तानसेन यांस जीं अलौकिक स्वप्नें, ज्या दिव्याकृति आणि जे गंधर्वालाप भासमान होतात, अहह ! त्यांपैकीं किती थोडे मात्र त्यांस आपल्या करामतींत गोंवून ठेवितां येतात बरें ! आत्माराम आणि आका कोण हें सांगावयास नकोच. ]

आत्माराम सुखें वनामधुनि तो होता जरा हिंडत,
तों झाला बघता दूरुनि सहसा कोण्या सुमूर्तिप्रत;

× क्षणांत नाहींसे होणारे भास—क.

तीच्यामागुनि मोहुनी हळुहळू जायास तो लागला,
"आहे ही पण कोण ?" या क्षणभरी प्रश्नावरी थांबला.
"रंभे !" "उर्वशि गे !"–तशींच दुसरीं जीं त्यास होतीं प्रियें
नामें, त्यांतिल घेउनी फिरुनि तो बाही त्वरेनें तिये;
ती कांहीं तरिही वळे न, बघुनी तो विस्मया पावला; +
जातां सन्निध, " ही नवीनच अहा ! कोणी दिसे" बोलला !

कांहीं नांव नवीन देउनि तिला जेव्हां तयें बाहिलें,
तों तीनें वळुनी प्रसन्नवदनें त्याच्याकडे पाहिलें;
त्या रूपद्युतिनें दिपूनि नयनें निर्वाण तो पावला,
तों अन्तर्हित, दृष्टिचा विषय तो, एका क्षणीं जाहला !

आकाची इतुक्यांत हांक परिसे आत्मा घराला वळे;
आकाच्या हुकुमांत साक्ष अवधी तो विस्मरूनी, रुळे !
कोणेका दिवशीं तिथेंच फिरतां ती गोष्ट त्याला स्मरे,
तच्चित्तीं पण रूपनाम अथवा तीचें मुळींही नुरे !

आत्माराम सखेद होउनि वदे तो आपणाशीं असें—
" कांहीं सुंदर देखिलें खचित मीं, यामाजि शंका नसे !
हा ! हा !– हे जर सर्व भास धरतां येतील मातें, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर ! [१]"

मुंबई. २४ मार्च १८९३

करमणूक २२. ४. १८९३
काव्यरत्नावलि. एप्रिल १९०२

## क्र. ९५. स्फुट विचार

सृष्टिकेंद्र तो कवण्या ठायीं ?
ज्याच्या त्याच्या आहे हृदयीं.

## क्र. ११२. वातचक्र

पर्जन्याचे दिवस उलगले,
थंडीचेही बरेच गेले;
पिकें निघालीं; कारण नुरलें
सोसाट्यानें वहावयाचें; म्हणुनि मरुद्गण खेळांत—

---

+ ती कांहीं न वळे तरीहि, ...... का. र.

मग्न होउनी चक्रावरती
आरोहुनि, सांप्रत हे जाती
गर गर गर गर भर भर एका निमिषामध्यें गगनांत !
धूलीचे कण असंख्य उठती,
पक्ष्यांचे पर तयांत मिळती
गवताच्या त्या काड्याहि किती,
थंडीनें गळलेलीं पर्णें जीर्णें उडतींही त्यांत ;
सृष्टीचा हा जसा भोंवरा
फिरतो आहे पहा भरारां,
गर गर गर गर धरणीपासुनि चढत असे तो गगनांत !
वाग्देवी गे! दे शब्दांतें
भोंवऱ्यांत या फेंकुनि, त्यांतें
जरा जाउं दे निजधामातें
नरें मळविलें अहह ! तेज तें पूर्वीं होतें जें त्यांत !
म्हणुनी शाप न आतां मारी,
आशिर्वचहि न आतां तारी,
तर गर गर गर त्यांस चढूं दे ताजे व्हाया स्वर्गांत !
मींहि कशाला येथ रहावें ?
काय असे ज्यां मीं चिकटावें ?
वाटे गिरक्या घेत मिळावें—
या पवनाच्या चक्रीं, होउनि लीन सच्चिदानंदांत;
जगद्द्रुमाचें पिकलें पर्ण ;
गलित असे मी अगदीं जीर्ण ;
तर भर भर भर उडूं द्या मला शब्दांसंगें स्वर्गांत !

मासिकमनोरंजन जाने–फेब्रु. १८९९, काव्यरत्नावलि जून १९०१

## क्र. ११५. फूलपांखरूं [ अंजनीगीत ]

जेथें हिरवळ फार विलसते,
लताद्रुमांची शोभा दिसते,
तेथें फुलपांखरूं पहा हें —
सुंदर बागडतें !

कलिकांवरुनी, पुष्पांवरुनी,
गंधयुक्त अवकाशामधुनी,
पुष्पपरागा सेवित हिंडे—
मोदभरेंकरुनी !
तरल कल्पना जशी कवीची,
सुंदर विषयांवरुनी साची
भ्रमण करी, गति तशीच वाटे—
फूलपांखराची !
वा मुग्धेची जैशी वृत्ति
पतिसहवासस्वप्नावरती
विचरे फुलपांखराची तशी—
हालचालही ती !
निर्वेधपणें इकडे तिकडे
वनश्रींतुनी अहा ! बागडे ;
त्याचा हेवा हृदयीं उपजुनि
मन होई वेडें !
तिमिरीं आम्हीं नित्य रखडणें,
विवंचनांतचि जिणें कंठणें,
पुष्पपतंगस्थिति ही कोठुनि—
आम्हांला मिळणें !
असे यास का चिंता कांहीं ?
यास उद्यांचा विचार नाहीं,
अकालींच जो आम्हां न्याया—
मृत्युमुखीं पाही !
बहुसौख्याची कुसुमित सृष्टि,
तींत वसे हें, न कधीं कष्टी,
ग्रीष्माचें खर रूप विलोकी—
नच याची दृष्टि !
'सर्व विनाशी असती प्राणी,'
ही मज खोटी वाटे वाणी ;
फूलपांखरू – मरण पाहिलें—
आहे का कोणीं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम 36368 ...... दि: ......
क्रमांक ...... नों. दि. ......

[ वसंततिलका ]
जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे ;
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें ;
गातों म्हणून कवनीं फुलपांखरातें ;
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें

मासिक मनोरंजन नोव्हेंबर, १९००

### क्र. १२६ दूर कोठें एकला जाउनीयां [ दिंडी ]

आजवेरी बहु मनोभंग झाले,
बहुत आशांचे प्राण निघुनि गेले
तयां शोचाया निर्जनांत जावें
एक्तारी छेडीत मीं बसावें ! २
आजदेखिल मी तसा अस्तमानीं
वाद्य वेडेंवांकुडें वाजवूनी
दंग झालों स्वच्छंद गायनानें ;
खरें संगीतज्ञान कोण जाणे ! ३
हृदय आत्म्याला जधीं खेळवीतें
हृदय आत्म्याला जधीं आळवीतें ;
तधीं तुमचें तें नको कलाज्ञान,
तधीं हृदयासम नसे तानसेन ! ४
असो ; असतां मन गायनांत लीन,
रात्र झाल्याचें भान राहिलें न ;
जसें कलहंसा वाहतां प्रवाहीं
प्राप्त मरणाचें ज्ञान नसे कांहीं ५

२७ ऑगस्ट १९०३

### केशवसुत मेले ? — गोविंदाग्रज

( गोविंदाग्रजांच्या ह्या सर्वश्रुत कवितेंत त्यांनीं केशवसुतांच्या चिंतनिकांतील चिंतनपरता लक्षांत घेतली होती असें स्पष्ट दिसतें. ‘ कोणीकडून ? कोणीकडे ? ’ ही चिंतनिका वगळल्यास बाकीच्या चिंतनिकांचा निर्देशहि प्रस्तुत कवितेंत आहे. )

हे तुषार पडतां अंगीं बिंदूचे सिंधू झाले !
निजलेल्या जागृति आली, हो ताजें जें थकलेलें !
मरणासचि आलें मरणें, मग केलें त्यानें काळें !

तों शब्द मुक्याला सुचले !
गूढास रूप सांपडलें !
स्वच्छंद अचेतन हाले !
नश्वर तें ईश्वर केलें ! केशवसुत गाउनि गेले !
भेदभाव विलया गेला, सूक्ष्मांत स्थूल मिळालें !
गगनाचे फाटुनि पडदे दिसलें जें त्या पलिकडलें !
मरणाचें मूळच तुटलें, जन्मांचें नातें सुटलें !
वस्तूंत वस्तुपण भरलें,
जीवंत जीवही झाले,
आत्म्यास आत्मपद आलें,
ब्रह्महि ब्रह्मसें ठरलें ! केशवसुत गाउनि गेले !
कळलें कीं ' आम्ही कोण ? ' ' हरपलें श्रेय ' सांपडलें.
आत्मा हो ' वेडापीर ' सृष्टींत ' भृंग 'सा रंगे ;
मारुनिया ' गोफण ' काळा निज ' निशाण ' नाभिं फडकविलें !
ऐक्तांच विजयि ' तुतारी '
हो चिरंजीव ' म्हातारी '
मग वाजवितांच ' सतारी '
सर्वत्र ' झपूर्झा ' झालें ! केशवसुत गाउनि गेले !
या स्थितींत त्या ब्रह्माची ब्रह्माशीं मिळणी घडली.
जें चिरंतनाच्यासाठीं सांगता तयाची झाली.
परि जनता वेडी कुठली, " केशवसुत मेले " वदली !
परि जन्ममरण हें वारें
कल्पनाच नाचवि सारें !
मूर्खांनो, रडतां कां रे ?
कीं " केशवसुत ते मेले ! " केशवसुत गाउनि गेले !
जे एकाठायीं होते, ते सर्वांठायीं भरले ;
सर्वांच्या हृदयीं भरले सर्वांच्या जीवीं भिनले ;
विश्व स्थिर ज्यांनीं केलें, कां वदतां – तेच निमाले ;
लीलेनें त्यांनीं गातां
ही सजीव केली जडता ;
अणुरेणूंमधुनी आतां
निघतील तयांचे चेले ! केशवसुत गाउनि गेले !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. ११५५४
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३०३८२ ...... वि: ..........

REFBK-0011556
REFBK-0011556

रसिकांसाठीं
आमचीं
नवीं
प्रकाशनें

* * * * * * * * * *

महाराष्ट्र
प्रकाशन
अमरावती

* * * * * * * * * *

लोकमान्यतेबरोबर
राजमान्यता आणि
ज्ञानासमवेत
मनोरंजन साधणारीं
सुंदर पुस्तकें....

जळांतील मासा
जयवन्त दळवी

आला क्षण....गेला क्षण....
शंकर वि. वैद्य

निवारा
शान्ताराम

खजिन्याचें बेट
भा. रा. भागवत

मोरू आणि मैना
चिं. वि. जोशी

जादूगार रांझा
चंद्रशेखर माडखोलकर

आनंदवनभुवन
गो. नी. दाण्डेकर

अपराजित
चंद्रशेखर माडखोलकर

विलापिका
ग. त्र्यं. माडखोलकर

महाराष्ट्र प्रकाशन अमरावती द्वारा प्रकाशित